
# उद्या
# जेव्हा व्हिएतनाम
# पुन्हा एक होईल....



संपादक
श्री. ग. माजगावकर

१७ फेब्रुवारी १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा अंक : सदतीस

## अनिल बर्वे, लोकशाही आणि बंदुकीची नळी

या देशात लोकशाही आहे काय ? अशा नाटयमय शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेले श्री. अनिल बर्वे यांचे 'बारा जाहीर सवाल' माणूसच्या २६ जानेवारी विशेषांकात वाचले. बर्वे यांच्या आधीच्या काही लिखाणाप्रमाणेच हे लिखाणही विसंगत, गोंधळलेले व तुटक वाटले. एवढेच असते तर त्याची दखल घेण्याचे कारण नव्हते. पण बराच काळ न्यायखात्याच्या संपर्कात घालवल्यामुळे बर्वे यांच्या अंगात न्यायाधीशाचा संचार होऊन ते एकदम या देशातील लोकशाहीचाच निवाडा करण्यास बसले. तेव्हा त्यांच्या सवालांकडे चिकित्सक दृष्टिने पहाणे प्राप्त झाले आहे.

बर्वे यांना चिडूनच उत्तर द्यावयाचे तर या देशात लोकशाही नसती तर हे सवाल विचारण्यास ते जिवंत राहिले नसते असे सांगता येईल. पण तसे न करता त्यांची भूमिका व्यापक दृष्टीने तपासण्याचे ठरविले आहे. अर्थात बर्वे यांना अशा वैचारिक देवघेवीची कितपत सवय आहे हा एक प्रश्नच आहे. सशस्त्र क्रांतीबाबत त्यांना एक प्रकारचे भाबडे प्रेम वाटते हे त्यांच्या मागील लेखनावरून दिसून येते, म्हणून हा प्रश्न पडतो. ते स्वतःला पत्रकार म्हणव-

पृष्ठ ७६ वर

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



लेखक

व्हिएतनामचे स्वातंत्र्ययुद्ध निदान
मराठी माणसाला तरी ओळखीचे
वाटायला हरकत नाही. कारण
तीनशे वर्षापूर्वी आपण अशाच
जातीचे एक महान् युद्ध यशस्वीपणे
खेळलेले आहोत.

काबुल-कंदाहारपासून
कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या,
तात्कालिन जगातील एका
अतिबलाढ्य सत्तेला—मोगल
साम्राज्याला असेच कडवे आव्हान
मराठ्यांनी दिलेले होते आणि
एकाकीपणे, गनिमी पद्धतीने लढून
या प्रचंड साम्राज्याच्या ठिकऱ्या
उडविलेल्या होत्या.

काळ वेगळा, ध्येयवाद निराळा
पण दोन्हीही स्वातंत्र्ययुद्धे होती,
जनयुद्धे होती. घराघरातून,
डोंगरदऱ्यातून, जंगलातून, शेतातून
ती कडवेपणाने लढली गेली,
पिढ्यान्पिढ्या ती चालली,
साम्राज्यसत्ता अखेरीस कोसळून
पडली, मानवी स्वातंत्र्यभावना
विजयी ठरली.

यापैकी एका युद्धाची ही कथा—
सरळ सांगितलेली.

निवेदक आहेत
'माणूस'चे सुप्रसिद्ध लेखक
अरुण साधू

# व्हिएतनामचे स्वातंत्र्यसमर



रात्रीच्या साडेअकरा वाजता प्रशांत महासागरातील ग्वाम द्वीपावरून त्या तीन अजस्त्र विमानांनी पश्चिमेकडे झेप घेतली. ती अमेरिकन हवाई दलाची बी-५२ जेट बॉंबर्स होती. प्रत्येक विमानात सुमारे ४५,००० पौंड वजनाचे बॉंब्स् आणि क्षेपणास्त्रे होती. या महासंहारक विमानांचे लक्ष होते पश्चिमेला २,६०० मैलावर असलेले उत्तर व्हिएतनाम.

ती अद्ययावत उपकरणांनी सुसज्ज असलेली घुडे हळू हळू तीस हजार फूट उंचीवर गेली. त्यांची स्वयंचलित यंत्रणा त्यांना आपोआप आपापल्या लक्ष्यांकडे नेत होती. वैमानिकांना, लक्ष्यधारकांना, दारुगोळा फेकणाऱ्यांना फारसे काही करावेच लागत नव्हते. मजेत गप्पा मारायच्या किंवा ट्रान्झिस्टरवरील मस्त संगीत ऐकायचे.

पाच तासात आशियाचे भूखंड जवळ आले तसे अमेरिकन पेट्रोलवाहू विमाने या बॉंबर्स नजिक आली. ठरलेल्या सवयीप्रमाणे आकाशातच त्यांची जुळणी होऊन बी-५२ मधे पुरेसे पेट्रोल भरले गेले. उत्तर व्हिएतनाम आता जवळ आले होते. शत्रूच्या रडार लहरी विमानावर येऊन आदळत होत्या. विमानाच्या कप्तानाने एक खटका दाबला आणि या लहरी निसटून जाऊ लागल्या. म्हणजे रडारवर आता या विमानांचा मागमूसही दिसणार नव्हता. कप्तानाने आणखी काही खटके दाबले.



स्वातंत्र्यसमराचा सेनानी

विमानाच्या इंजिनातून निघणाऱ्या उष्णतेचा मागोवा घेत येणारे कोणतेही अस्त्र आता धोक्याचे ठरू शकणार नव्हते. असा निर्धोक प्रवास चालू होता.

लक्ष्य जवळ आले. अर्थात लक्ष्य म्हणजे नेमके काय हे कुणालाच ठाऊक नव्हते. नकाशावर दिलेले दोन कोऑर्डिनेट्स् हेच त्यांचे लक्ष्य. या कोऑर्डिनेटसचा जिथे छेद जाईल तिथे बॉंब टाकायचे. चोहोबाजूला अंधार गुडुप होता. त्यामुळे आपण समुद्रावरून जातो आहोत, की जमिनीवरून, की डोंगरावरून हेही दिसत नव्हते. मग लक्ष्य म्हणजे गाव आहे, टेकडी आहे, शाळा आहे, की एखादा कारखाना हे कळणे दूरच. लक्ष्य दिसण्याची गरजच नव्हती. नकाशावर लक्ष्य आले की झाले.

त्याप्रमाणे दोनचार वळणे घेतल्यावर विमाने लक्ष्यावर आली. लक्ष्यधारका समोरच्या तबकडीतील हिरव्या रेषा एकमेकाला मिळाल्या. आणि हुकूम सुटला – गो – खटके दाबले गेले. आणि प्रत्येक विमानातून ४५००० पौंडाचा दारुगोळा प्रचंड विध्वंस करीत आपापल्या लक्ष्यांवर जाऊन पडला.

एवढा प्रचंड दारुगोळा खाली गेला. पण विमानातल्या सेवकांना ते जाणवलेही नाही. विमानाला साधा धक्काही जाणवला नाही. त्या तीनही विमानांनी संपूर्ण वळण घेतले आणि ज्या मार्गांनी ती आली त्याच रस्त्याने मजेत संथ



साम्राज्यसत्तेचा
प्रतिनिधी

गतीने ती आपल्या तळाकडे परतू लागली. अवघी दहा मिनिटेही ती विमाने उत्तर व्हिएतनामवर नसतील.

मग विमानांतील सेवकांनी आपापल्या जेवणाचे डबे उघडले. आता-तर तणावही नव्हता. कंटाळा वाटत होता. काहींनी ट्रान्झिस्टर्स लावले. काहीतरी करमणूक हवीच. मग हळू हळू सारेच पेंगू लागले. विमानाचा कप्तान जागा राहिला. बाकी सारे चक्क झोपले. बरोबर बारा तासांनी चकाकत्या सूर्यप्रकाशात प्रशांत महासागरात पाचूच्या खड्याप्रमाणे शोभणारे ग्वाम द्वीप नजरेच्या टप्प्यात आले. आणि ते सुंदर दृष्य बघून ते सारेच उद्गारले— अहाहा – सुरेख

ट्रीप संपली होती. सारे सुखरूप होते. पण कंटाळले होते. अगदीच नाटयविहीन प्रकार.

परंतु पश्चिमेला सुमारे सहव्वीसशे मैलांवर जिथे या तीन बाँबर्सनी प्रत्येकी पंचेचाळीस हजार पौंड वजनाचे मृत्यू-संदेश घेऊन जाणारे बाँम्ब्स् ओतले तिथली परिस्थिती काय होती? त्या अग्निवर्षावात किती घरे जळून राख झाली? किती बांध फुटले? किती निरपराध मुले, बाळे, म्हातारी-कोतारी होरपळून निघाली? तिथे कोणते रौद्र-भीषण नाटय चालू आहे? याची त्या तीन बाँबर्सच्या सेवकांना पुसटशीही कल्पना येणे कठीण आहे.

व्हिएटनाम युद्धाचे हे एक चित्र. एकतर्फी असेल. पण पार धक्का देणारे.

आणखी एक चित्र.

दक्षिण व्हिएटनाममधील मेकाँग नदीचे सुपीक खोरे. सारीकडे हिरवेगार. नद्या, तळी, डबकी, त्यामधे डुंबणाऱ्या म्हशी, हुंदडणारी पोरे, शेतात कामे करणाऱ्या बायाबापड्या आणि त्यांचे बाप्ये.

एवढ्यात वर घरघर ऐकू येते. हा हा म्हणता चिलटासारखी येणारी पाच-सात हेलिकॉप्टर्स डोक्यावर. घिरट्या घालू लागतात. हेलीकॉप्टर्सच्या उघड्या दारात हाती मशीनगन घेतलेले व्हिएतनामी सैनिक बसलेले. शेतातील कोणी हालत नाहीत. वर मान करून त्या विचित्र धुडांकडे कुणी कुतूहलाने ढुंकूनही बघत नाही. सारे आपापल्या कामात गर्क असल्याचे दाखवितात. थोडीशी जरी वेगळी हालचाल केली तरी काय होईल ते सांगता येत नाही.

हेलिकॉप्टर्स समाधानाने मार्ग आक्रमू लागतात. एवढ्यात एका तीक्ष्ण नज-रेच्या सैनिकाला खालच्या पायवाटेवरून एक इसम सायकलीवरून जात असताना दिसतो. अरेच्या–हा कोण? सायकल-वरून उतरला का नाही? एकदम चार मशीनगन्स्मधून त्याच्या अंगावर २ गोळ्या सुटतात. सायकल वेगाने पुढे जातच राहते. गोळ्या चुकवीत शेवटी तो माणूस सायकल फेकून देतो. हाती बंदूक असते. तो त्वेषाने काही-तरी ओरडून बंदुकीचे तोंड वर करतो. पण त्याची वेळ संपलेली असते. क्षणा-र्धात त्याच्या शरीराची चाळण उडते. न जाणो तरीही त्याचा प्राण शिल्लक राहील म्हणून की काय पाठोपाठ सबंध

तुकडीला खलास करू शकेल असा नापाम बॉंब त्याच्या अंगावर आदळतो. रक्ताच्या चिळकांड्या, मांसाचे तुकडे आणि आग–गोंधळ. पुन्हा गोळीबार. आग. आणखी काही मुडदे. काही झोपड्यांना आग. त्यात नक्कीच दोन-चार मुलं, काही म्हशी.

आणि थोड्या वेळाने व्हिएतकाँगच्या छुप्या अड्ड्याची यशस्वीपणे विल्हेवाट लावल्याच्या विजयोन्मादात हेलीकॉप्टर्स आपल्या तळावर परततात–

असे आहे व्हिएतनामचे युद्ध. सीमाविहीन. शत्रू कोण आणि मित्र कोण या संभ्रमात पाडणारे, नागरीक लोक व लष्करी सैनिक अशा मर्यादा न पाळणारे, धर्मयुद्धाची सर्व बंधने झुगारून देणारे. जगात असे युद्ध कधीही लढले गेले नव्हते. मानवी सामाजिक विकृतीने एवढी परिसीमा गाठली नव्हती. लष्करी पोषाख चढविणारे सैनिक एवढे नृशंस आणि बेफिकीर कधी झाले नव्हते.

हे आहे व्हिएतनामचे युद्ध. रक्त, मांस, चिखल, अश्रू आणि मरण वाटीत सुटणाऱ्या दारूगोळ्यांचा उग्र दर्प यांनी एका मोठ्या कालखंडाला काळीमा फासणारे. एक विचित्र युद्ध. सर्व सुसंस्कृत माणसांना शरमेने खाली मान घालावयास लावणारे. काळे युद्ध–



हा कोण ?

अमेरिकन सेना व्हिएतकाँगचा शोध शेताशेतातून असा घेत होती...

वर्षे चालत आलेले.

या युद्धालाही एक उज्वल पैलू आहे. या सर्वव्यापी भयंकर हत्त्याकांडातूनही ताठ मानेने जिवंत राहण्याची व्हिएतनामी जनतेची जिद्द. जगातील सर्व बलिष्ठ शक्तीच्या गर्विष्ट अमेरिकन हवाई दलाच्या मरणप्राय घणाघातांनाही तुच्छ लेखून सन्मानाने स्वतंत्र जिणे जगण्याचे व्हिएतनामी जनतेचे चिवट मनोधैर्य. पुरेशी जिद्द आणि चिवट मनोधैर्य याच्या जोरावर व्हिएतनामसारखे चिमुकले राष्ट्रही अमेरिकेसारख्या अतिबलाढ्य राष्ट्राला हतबल करू शकते याचे पुरेपूर प्रत्यंतर म्हणजे हे युद्ध.

अमेरिकन शासकीय दृष्टीकोनातूनही या काळ्या युद्धाला उज्वलतेचे उदात्त वलय आहेच. हे युद्ध म्हणजे कम्युनिस्ट आक्रमणापासून 'स्वतंत्र' जगाला वाचविण्याच्या सीमेवरील झगडा. स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूलभूत लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी चाललेली पवित्र लढाई. चिनी कम्युनिस्टांना आग्नेय आशियाच्या उंबरठ्यावरच थोपविण्याचा हा पराकाष्ठेचा प्रयत्न. दक्षिण व्हिएतनामच्या 'लोकशाही' राजवटीला लाल दरोडेखोरांपासून वाचविण्यासाठी घेतलेले असिधारा व्रत.

असे हे व्हिएतनामचे युद्ध. सर्व बाजूंनी पराकोटीच्या प्रतिक्रीया निर्माण करणारे. एकाच वेळी शरमेने खाली मान घालण्यास भाग पाडणारे आणि गर्वाने छाती फुगविणारे; क्रूर, अमानवी, भयंकर पण तरीही उज्वल, उदात्त



व्हिएतनामी जनतेचे चिवट मनोधैर्य

असे हे विचित्र युद्ध.

आणि सुमारे साडेतीन कोटी लोकसंख्येचे व्हिएतनामी (दक्षिण व उत्तर) हे युद्ध जगत आहेत. त्यांची एक सबंध पिढी या युद्धात गारद झाली आहे. एक सबंध नवी पिढी या युद्धात जन्माला येऊन वाढली आहे. युद्धाचे हे विचित्र, जगावेगळे स्वरूप गेल्या वीस वर्षातले असले तरी १९४० पासून आग्नेय आशियाच्या टोकावर वसलेला हा पुरातन देश असाच युद्धजर्जर आहे. डोंगर, कालवे, भातशेती, म्हशी आणि डोक्यावर बांबूच्या गोल टोप्या घालणारे शेतकरी यांच्याप्रमाणेच लष्करी गणवेशातील सैनिक, बाँबफेकी विमाने, हेलीकॉप्टर्स नापामच्या वर्षावाने भस्मसात झालेली शेते आणि घरे आणि ठिकठिकाणी पडलेले मुडदे हेही येथील परिसराचे अविभाज्य भाग बनलेले आहे.

युद्धाचा शेवट दृष्टीपथात आला आणि निसटला. पुन्हा युद्धाचा जोर दुप्पट वाढला आणि शेतकऱ्याचे जीवन चालूच राहिले. मरण येईल तेव्हा येवो. जगणे तर चालू ठेवले पाहिजेच ना. युद्धविरामाच्या नव्या दुंदुभी परवा वातावरणात दुमदुमल्या आणि शांतीची गोजिरवाणी कबुतरे आकाशात फडफडली. पण पंख फडकाविण्याच्या आधीच ती गोळ्या लागून खाली मरून पडली आणि दुंदुभीचे प्रतिसाद विरण्यापूर्वीच मृत्यूदूत बाँबर विमाने कानठळ्या बसविणारे आवाज करीत आकाशात रोरावून गेली. युद्धाचा शेवट कुठे आहे? प्रश्नाला उत्तर देण्याची कुणाला फुरसत नाही. कारण युद्धाचे विक्राळ तांडव सुरूच रहाते.

आणि या महासंहारक युद्धातून बाहेर येणारे व्हिएतनाम कसे असेल? अग्निपरीक्षेतून बाहेर पडलेल्या सोन्यासारखं विशुद्ध आणि प्रखर? एकात्म की द्विभाजित? साम्यवादी झेंड्याखाली की अमेरिका प्रणीत 'लोकशाहीवादी' की स्वतंत्र राष्ट्रवादी? प्रबळ की निर्बळ? किंवा या युद्धातून ते खरोखरच बाहेर पडेल का?

तशी व्हिएतनामने अनेक युद्धे पाहिली आहेत. पुरातन काळापासून उत्तर व्हिएतनामच्या चाडीसारख्या आकाराच्या प्रदेशातून चिनी सैन्ये आणि लोक आग्नेय आशियात सरकत आले आहेत. आणि त्यांना व्हिएतनामी इतिहासाची पानेच्या पाने अशी चिन्यांविरुद्धच्या युद्धांनी भरली आहेत.

या सततच्या चिनी आक्रमणांमुळे व्हिएतनामी संस्कृतीचे चिनी संस्कृतीशी बरेच मिळते जुळते आहे. सबंध आग्नेय आशियात हिंदी व चिनी संस्कृतींचा मिश्र प्रभाव पसरलेला आहे. व्हिएतनाममध्ये चिनी संस्कृतीचा मिश्र प्रभाव अधिक प्रकर्षाने आढळतो. चिनी आक्रमकांशी लढता लढता व्हिएतनामने चिनी संस्कृतीही बऱ्याच प्रमाणात आत्मसात केली.

परंतु या लढ्यांमधूनच व्हिएतनामच्या स्वतंत्र राष्ट्रवादाचा उदय झाला. चिन्यांपासून आपण वेगळे आहोत ही स्वतंत्र बाण्याची स्वाभिमानी वृत्ती दृढ झाली आणि पंधराव्या शतकापर्यंत व्हिएत लोकांच्या स्वतंत्र संस्कृतीचे राज्य अस्तित्वात आले. हे राज्य सर्वकाळ पूर्णपणे एकछत्री असे कधीच नव्हते. पण पश्चिमेकडे लाओस, कांबोडिया यांपासून अन्नामी पर्वतांच्या रांगांनी अलग पडलेला एस या इंग्रजी अद्याक्षरांचा आकार असलेला हा भूप्रदेश व्हिएतनामी संस्कृतीच्या विशिष्ट ठशाखाली आला. उत्तर भागात चीनमधून वाहत येणारी लाल नदी आणि दक्षिणेत कंबोडियातून येणारी मेकाँग नदी यामुळे भाताची सुपीक खोरी निर्माण झाली आहेत. पश्चिम किनारे कोकणी वळणाचे. उत्तरेकडची लोकसंख्या त्या मानानें दाट. मसाल्याचे पदार्थ, भात आणि विपुल खनिज संपत्ती. यामुळे युरोपियनांची नजर व्हिएतनामवर लगेच गेली.

पंधराव्या शतकाच्या शेवटास युरोपियनांची गलबते भारताच्या किनाऱ्यास लागली आणि आग्नेय आशियातील समृद्ध द्वीपकल्पे आणि भूभाग यांचाही ्पियन कसोशीने शोध घेऊ लागले. आग्नेय आशियात फ्रेंच आले ते इतर युरोपियनांच्या मागून. आगोदर डच आणि पोर्तुगीज. फ्रेंच आले ते हाती तागडी आणि बायबल घेऊन.

सुरुवातीला व्हिएतनाममध्ये फ्रेंच मिशनऱ्यांना मुक्तद्वार होते. मिशनरी आपली जाळी वाढवू लागले तेव्हा व्हिएतनामी राजांचा त्यांना विरोध होऊ लागला. मिशनऱ्यांच्या संरक्षणासाठी फ्रेंच सैनिक आले आणि हळू हळू इंडो-चीनचा सबंध भूप्रदेश फ्रेंचांच्या राजकीय प्रभुत्वाखाली येऊ लागला. व्हिएतनामच्या उत्तर, मध्य आणि दक्षिण भागात वेगवेगळी राजघराणी राज्ये करीत होती. त्यांच्यामधे भांडणे होतीच. आता या भांडणांमध्ये फ्रेंच लष्कराची मदत घेतली जाऊ लागली. फ्रेंचसुद्धा हा खेळ शिकले. कुरापती काढून भांडणे लावून देवू लागले. ब्रिटीशांची फोडा आणि झोडा ही नीती याच सुमारास भलतीच यशस्वी होत होती. तेच धोरण फ्रेंचांनी इथे अवलंबिले. फ्रेंच मिशनऱ्यांना ताप देणाऱ्या राज्यकर्त्यांना धडे शिकविले आणि १८८५ पर्यंत सबंध व्हिएतनामवर राजकीय ताबा मिळविला.

याच सुमाराला, म्हणजे १८८५ मध्ये, व्हिएतनाममधील पहिल्या स्वातंत्र्यलढ्याला सुरुवात झाली. बुद्धिवंतांचे बंड म्हणून हा लढा प्रसिद्ध आहे. व्हिएतनाममध्ये चीनप्रमाणेच पारंपारिक परीक्षांमधून शासकीय प्रशासक नेमीत. हे सुसंस्कृत प्रशासक म्हणजे मंदारीन. फ्रेंच प्रशासनामध्ये प्रथम यांचे महत्त्व गेले. या मंदारीनांनी व्हिएतनामी सैनिकांच्या मदतीने या येथील सम्राटांनी हाम न्ही याच्या झेंड्याखाली फ्रेंचांना प्रखर प्रतिकार केला. अर्थातच फ्रेंचांच्या आधुनिक लष्करापुढे या बंडाचा फारसा टिकाव लागला नाही

आणि बड्खोरांना डोंगरांमधे पळ काढावा लागला. फ्रेंचांनी एका राजघराण्याला नाममात्र आश्रय मात्र दिला होता.

फ्रेंचांचे राज्य सुरू झाले. वेळोवेळी नेमलेले फ्रेंच गव्हर्नर जनरल्स मन चाहेल तसा कारभार हाकू लागले. आग्नेय आशियातील हे सुपीक प्रदेश फ्रेंचांना सोन्याच्या खाणीसारखे वाटले. व्हिएतनाममधील कच्चा माल युरोपियन बाजारामधे जाऊ लागला आणि तयार फ्रेंच माल व्हिएतनाममधे. हजारो फ्रेंच तरुणांना तिकडे काम मिळू लागले.

फ्रेंच आगमनापूर्वी व्हिएतनामी अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण होती. भात, तेले, फळे, मासे, महागडी खनिजे ही देशातील उत्पादने होती. माशांशिवाय बाहेरच्या देशांशी फारसा व्यापार नव्हता.

फ्रेंचांनी व्हिएतनामची आर्थिक पिळवणूक सुरू केली. फ्रान्समधून तांदूळ, रबर, रेशीम, तबाखू, मसाल्याचे पदार्थ आदि माल युरोपात पाठवायला सुरुवात केली. त्याचबरोबर फ्रेंचांनी व्हिएतनामच्या खनिज साठ्यांच्या आसपास आवश्यक तेवढ्या औद्योगीकरणासही सुरुवात केली. त्यांनी रस्ते बांधले, पूल बांधले. मोठ्या शहरांमधून रुग्णालये बांधली, शाळा-कॉलेजे उघडली.

फ्रेंचांच्या आर्थिक पिळवणुकीच्या अपरिहार्य अशा वसाहतवादी धोरणाचा परिणाम लौकरच दिसू लागला. फ्रेंचांनी व्हिएतनाम मिळविला होता तो स्वतःचा फायदा करून घेण्यासाठी. स्वतःच्या पदराला खार लावून व्हिएतनामचे कल्याण करण्याच्या उदात्त हेतूने नव्हे. नव्या सुधारणा आल्या. पण त्या शहरवासियांसाठी. व्हिएतनामी शेतकऱ्यांची परिस्थिती मात्र बिघडू लागली. व्यापारी धोरणामुळे शेतीची मालकी बड्या शेतकऱ्यांच्या हाती जाऊ लागली. जमिनीतून येणाऱ्या उत्पादनाच्या किंमती वाढू लागल्या तसे श्रीमंत शेतकरी मोठ्या प्रमाणावर जमिनी खरेदी करू लागले. गरीब शेतकरी कर्जबाजारी होऊ लागले. ही परिस्थिती एवढ्या टोकाला पोचली की, १९५४ साली फ्रेंचांनी जेव्हा व्हिएतनामला रामराम ठोकला तेव्हा मेकाँग नदीच्या खोऱ्यातील सर्व सुपीक जमिनीतील ५० टक्के जमीन फ्रेंच नागरिक आणि चिनी सावकार यांच्या हाती गेली होती. ग्रामीण व्हिएतनामी जनतेच्या हालाला पारावर उरला नव्हता. परकीयांच्या ताब्यात त्यांची जमीन होती. त्यांचे काम फक्त हमाली करण्याचे. फ्रेंच सुधारणांचा, फ्रेंच शिक्षणाचा आणि संस्कृतीचा फायदा होत होता तो फक्त काही उच्चवर्णी व्हिएतनामी लोकांचा. बहुसंख्य जनता दारिद्र्याच्या गर्तेतच लोटली जात होती.

बहुसंख्य जनतेला हा बदल सहज समजू शकत होता. त्यांना सरकारचे कर भरावे लागत होते. पण प्रशासनाचे फायदे मात्र मिळत नव्हते. त्यांच्या जमिनी वेगाने त्यांच्या हातून निसटून परकीयांच्या ताब्यात जात होत्या आणि त्यांना फक्त गुलामासारखे राबावे

लागत होते. परकीय अर्थव्यवस्थेमुळे कायदे-कानूमुळे त्यांचे जीवन उद्ध्वस्त होऊ लागले होते. वसाहतींवर राज्य करण्याची फ्रेंचांची कल्पना ब्रिटिशांच्या कल्पनेपेक्षा वेगळी होती. सर्व ठिकाणी फ्रेंच अधिकाऱ्यांचा भरणा होता. अगदी खालच्या दर्जाची अधिकारपदे मोठ्या मष्किलीने स्थानिकांना दिली जात आणि फ्रेंचांची वागणुकीची पद्धतही मोठी उन्मत्त होती. वसाहतींमधील राज्यकर्ते फ्रेंच नेहमीच स्थानिक लोकांना गुलामासारखे वागवीत.

अशा परिस्थितीत स्थानिकांमधे असंतोष निर्माण न झाला तरच नवल. फ्रेंचांना स्वस्थपणे असे राज्य कोठेच करता आले नाही. व्हिएतनाममधे कोठे ना कोठे तरी कोणती ना कोणती गुप्त संघटना राज्यकर्त्यांविरुद्ध काम करीत होतीच. व्हिएतनामी राष्ट्रवाद फुलत होताच. १९०५ मधील जपानचा रशियावरील विजय, चीनमधे डॉ. सन यत् सेनच्या प्रजासत्ताकाची स्थापना, पाश्चात्य लोकशाही विचारांचे वारे, मार्क्सवादाचा प्रसार, रशियन क्रांती या घटनांपासून व्हिएतनाम अलग राहू शकत नव्हता आणि फ्रेंच शिक्षणातूनच व्हिएतनामी जनतेला राष्ट्रवाद, मार्क्सवाद, लोकशाही क्रांती आदि धडे मिळत होते आणि स्वातंत्र्याची कल्पना जोमाने मूळ धरीत होती. चीन आणि जपानमधून विविध राष्ट्रवादी गट व्हिएतनामी स्वातंत्र्याचा गुप्त प्रचार करू लागले होते.

व्हिएतनामी स्वातंत्र्यचळवळींचा जोर जसजसा वाढू लागला तशी फ्रेंच दडपशाही वाढू लागली. त्याला मर्यादा नव्हती. विद्यापीठे बंद पाडणे, स्वातंत्र्यवादी चळवळीला सहानुभूती दाखवतो म्हणून नामधारी सम्राटाला वेडा ठरवून हद्पार करणे येथपर्यंत फ्रेंचांची मजल गेली.

फ्रेंचांच्या या दडपशाहीमुळेच व्हिएटनामी राष्ट्रवादी चळवळींना खतपाणी मिळाले. आणि दुसऱ्या महायुद्धात जपानी माऱ्यापुढे जेव्हा फ्रेंचांचे वसाहती शासन कोलमडून पडले तेव्हा फ्रेंचांना कधीही परत न येऊ देण्यासाठी हाती शस्त्रे घेऊन सज्ज झालेले अनेक सैनिक व्हिएतमिन्हच्या झेंड्याखाली एकत्र झाले.

व्हिएतनामच्या इतिहासात व्हिएतमिन्हचे स्थान महत्वाचे आहे. फ्रेंचांना व्हिएतनाममधून पळ काढावा लागला तो व्हिएतमिन्हने त्यांच्या लष्कराचे कंबरडे मोडल्यामुळे. अगदी थोडक्या शस्त्रानिशी गनिमी काव्याने लढणाऱ्या आशियन सैनिकांनी अत्याधुनिक अशा यूरोपियन लष्कराला सरळ लढाईत मार देण्याचे हे पहिलेच उदाहरण. व्हिएतमिन्हचा संचार संपूर्ण व्हिएतनामभर होता. १९५४ च्या जिनेव्हा करारानुसार फाळणीनंतर व्हिएतमिन्हला दक्षिणेतून पाय काढावा लागला. या व्हिएतमिन्हचीच आताच्या दक्षिण व्हिएतनाममधील शाखा म्हणजे व्हिएतकाँग. अमेरिकनांना सळो का पळो करून सोडणारी.

व्हिएतनाममधील सर्व असंतोष

संघटित करून त्याला व्हिएत मिन्हच्या झेंड्याखाली प्रभावीपणें उभे करणारी व्यक्ती म्हणजे हो ची मिन्ह. भारतात महात्मा गांधींना, रशियामध्ये लेनीनला आणि चीनमध्ये माओ त्से तुंगला जे सर्वोच्च स्थान आहे तेच व्हिएतनामी स्वातंत्र्यलढ्यामध्ये हो ची मिन्हला. दक्षिण व्हिएतनाममधील आताच्या कडव्या कम्युनिस्ट विरोधी राज्यकर्त्यां-नाही हो च्या व्यक्तिमत्वाचे आकर्षण आहे हे काही लपून राहत नाही.


हो ची मिन्हचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची तुलना खऱ्या अर्थाने लेनीन, स्टालीन, माओ, टिटो अशा पक्क्या कम्युनिस्ट नेत्यांशी होऊच शकत नाही. या सर्वांच्या कडक व्यक्तिमत्वापेक्षा हो चे दुसरे, सर्वांमध्ये मिसळणारे प्रेमळ व्यक्तिमत्व अगदीच वेगळे आहे. म्हणूनच सगळे जण त्याला हो काका म्हणत.

लेनीन खऱ्या अर्थाने प्रकाशात आला १९११ साली. १९१७ मध्ये त्याचा लढा संपला. माओचे नेतृत्व १९२७ साली शाबीत झाले. आणि १९४९ मध्ये माओ चीनचा सर्वश्रेष्ठ पदाधिकारी झाला. युगोस्लाव्हियन स्वातंत्र्य चळवळीत टिटो पुढे आला १९४२ मध्ये.

परंतु व्हिएतनामच्या स्वातंत्र्यचळवळीत हो अग्रभागी आला १९१७ साली. तेव्हापासून तो १९६९ च्या सप्टेंबरमध्ये ते वयाच्या ७९ व्या वर्षी निधन पावला तोपर्यंत तो सतत लढतच राहिला. सुरुवातीला तो फ्रेंच कम्युनिस्ट पक्षाचा सदस्य होता. नंतर रशियन आणि पुढे चिनी त्याने स्वतःच इंडो-चिनी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. नंतर व्हिएतमिन्हची आणि नंतर लाओ दांग – म्हणजे व्हिएतनामच्या कम्युनिस्ट पक्षाची.

हो फ्रेंचांशी लढला, चिन्यांशी आणि जपान्यांशी लढला आणि मृत्यूसमयी तो अमेरिकनांशी लढत होता. अनेक वेळा अनेक देशांच्या तुरुंगामधे तो जाऊन आला. अनेक वेळा निसटला. अनेकदा त्याला जिवंत अथवा मृत पकडून आणणारास बक्षिसे देण्याचे जाहीर केले गेले. आपल्या क्रांतीकार्यांत त्याने सर्व जगभर मुक्त संचार केला. अनेक भाषा शिकला आणि अक्षरशः त्याने अनेक नावे बदलली. सुरुवातीला कुंग, नंतर नगुयेन तात थान, बा, न्गुयेन आय कोक, वाँग, चिन, लिन आणि त्रान अशा कितीतरी विविध नावांनी तो वेळोवेळी ओळखला जात होता.

या त्याच्या रोमहर्षक जीवनामुळे त्याच्या प्रतिमेभोवती एक रहस्यमय वलय निर्माण झाले होते. म्हणूनच वेळ आली तेव्हा सर्व विचारांचे लोक त्याच्या नेतृत्वाखाली व्हिएत मिन्हमध्ये एकत्र आले. हो चा आपण विचारवंत अथवा कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचे पंडित असल्याचा कधीच दावा नव्हता. लेनीन, स्टालीन, माओ यांच्यासारखी त्याने कम्युनिस्ट तत्वज्ञानात काहीही भर टाकली नाही. तो मनापासून एक राष्ट्रवादी व्यवहारी होता. कम्युनिस्ट तत्त्वज्ञान व्हिएतनामच्या परिस्थितीला उपयुक्त



हो चे हसरे, सर्वांमध्ये मिसळणारें प्रेमळ व्यक्तिमत्त्व अगदीच वेगळे होते. म्हणूनच सर्वजण त्याला हो काका म्हणत.

असल्याची त्याची खात्री होती. बोलताना तो कधीही पांडित्याचा आव आणीत नसे. अगदी साधे, सामान्य शेतकऱ्यासारखेच जीवन आणि साधे, मोकळे वागणे.

अशा या साध्या हो ची मिन्हनेच व्हिएटनामला पुनरुज्जीवन दिले. उत्तर व्हिएटनामची भक्कम पायावर उभारणी केली. आणि गुलामगिरीविरुद्धच्या दोन मोठ्या लढायांचे त्याने नेतृत्व केले. पहिली लढाई फ्रान्सविरुद्धची. आणि दुसरी अमेरिकेविरुद्धची. पहिल्या युद्धात त्याने फ्रेंचांच्या वसाहती साम्राज्याचे कंबरडे मोडले. आणि दुसऱ्यामध्ये सामान्य माणसाच्या जिद्दीपुढील अत्याधुनिक शस्त्रदळांची निष्फळता उघडी केली. हो च्या अंतर्भावाशिवाय व्हिएटनामचे चित्र पुरे होऊच शकत नाही.

व्हिएतनाममध्ये म्हटले जाते की न घे अॅन प्रांतात जन्मलेल्या माणसाच्या अंगातच विरोध आणि संघर्ष मुरलेला असतो. विरोध आणि संघर्ष यातच आयुष्य घालविलेल्या होचा जन्म याच प्रांतातील किम लियेन या खेड्यात १८९० मधे झाला. व्हिएतनाममधील बहुतेक क्रांतिकारक देशाच्या मध्यमागातील याच प्रांतातले.

हो चे वडील मध्यमवर्गीय आणि सुसंस्कृत होते. त्यांच्या राष्ट्रवादी कृत्याबद्दल त्यांना फ्रेंच सरकारने शासकीय नोकरीतून काढून टाकले होते आणि कुटुंबावर दारिद्र्य कोसळले. तशाही अवस्थेत न्गुयेन तात थान याने (हो चे बालपणीचे नाव) हे या जुन्या राजधानीच्या ठिकाणी आणि सायगाव येथे शाळेचे शिक्षण घेतले. राष्ट्रप्रेमाचे बाळकडू त्याला बापाकडूनच मिळाले होते आणि परकीय प्रभुत्वाने होत असलेली देशाची वासलात त्याला स्पष्टच दिसत होती. शालेय शिक्षण संपल्यावर त्याने अनेक बारीक सारीक नोकऱ्या केल्या. काही गुप्त संघटनांमधून कामे केली आणि १९१२ च्या सुमाराला एका फ्रेंच जहाजात फरशा पुसण्याचे काम पत्करून त्याने युरोपचा रस्ता धरला.

हो चे सुरुवातीचे नाव कुंग असे होते. दहाव्या वर्षी बापाने ते बदलून तात थान् असे ठेवले. हो आयुष्यभर अशी नावे बदलीतच गेला. होला एक मोठी बहिण आणि धाकटा भाऊ होता. व्हिएतनाम सोडल्यावर हो चा आपल्या कुटुंबाशी संबंध तुटला तो कायमचाच. इकडे हो ची दोन्ही भावंडेसुद्धा राष्ट्रवादी कारवायांमध्ये भाग घेत होती. फ्रेंच बराकीमधील शस्त्रे चोरून ती व्हिएत मिन्हला पुरविण्यात बहिण थान हिचा हातखंडा होता. १९४५ साली तिने जेव्हा वृत्तपत्रात हो ची मिन्हचा फोटो पाहिला तेव्हा आपल्या धाकट्या भावाशी या इसमाचे खूपच साम्य आहे असे तिला वाटले. एका टोपलीत दोन कोंबड्या आणि अंडी भरून ती हनोईला गेली. बहिण-भावांची भेट झाली आणि थान लगेच आपल्या खेड्यात परतली. एवढेच. हो चे जीवन फार शिस्तीचे होते. बहिणीने आपल्याच खेड्यात राहून जुनेच जीवन जगावे असा त्याचा

आग्रह होता. बहीणही त्याच स्वभावाची

हो च्या जगप्रवासात आफ्रिका, युरोप, अमेरिकेच्या अनेक फेऱ्यानंतर दोन वर्षांनी मुक्काम लंडनला पडला. तिथे काही दिवस अर्धपोटी काढल्यावर एका व्हिएतनामी गृहस्थाच्याच ओळखीने त्याला एका सुप्रसिद्ध हॉटेलात मोठ्या नावाजलेल्या आचाऱ्याच्या हाताखाली नोकरी मिळाली. काही दिवस तिथे काम केल्यावर हो पॅरिसला गेला. लंडनमध्ये व्हिएतनामी नागरिकांची एक गुप्त संघटना होती. त्यात त्याने काही काळ काम केले. आयरिश स्वातंत्र्यवाद्यांबरोबर त्याने ओळखी केल्या आणि मायभूमीसाठी खरोखरच काही करायचे असेल तर फ्रान्समधेच आपले कार्यक्षेत्र ठेवले पाहिजे असे ध्यानात येऊन त्याने पॅरिस गाठले.

हो फ्रान्समध्ये उतरला तेव्हा युरोप पहिल्या महायुद्धाच्या वणव्यातून होरपळून निघाले होते. फ्रेंचांबद्दल होला तिरस्कार होता, कडूपणा होता आणि रागही होता. पण फ्रान्समध्ये प्रत्यक्ष आल्यावर मात्र त्याला साक्षात्कार झाला की सारेच फ्रेंच लोक काही एवढे तिरस्करणीय नाहीत. व्हिएतनामवर राज्य करणारे जुलुमी फ्रेंच अधिकारी वेगळे आणि इथले भावविवश फ्रेंच लोक वेगळे. सामान्य फ्रेंच जनता आणि व्हिएतनामी जनता यात काही फारसा फरक नाही. व्हिएतनामी जनतेची फ्रेंच राज्यकर्ते जशी पिळवणूक करतात तशीच फ्रेंच दलितांचीही हे हळूहळू त्याच्या ध्यानात आले. फ्रान्समधील खुल्या क्रांतीविचारांचा पगडा त्याच्यावर बसू लागला आणि धीमे धीमे तो फ्रेंच कम्युनिस्ट पक्षात ओढला गेला. फ्रान्समध्ये त्याने जिकीरीच्या हाल अपेष्टात आणि अत्यंत दारिद्र्यात दिवस काढले. त्यामुळे फ्रान्सबद्दल प्रेम आणि तिरस्कार अशी संमिश्र भावना त्याच्यात जोपासली गेली.

पॅरिसमधील क्रांतिवादी विचारांच्या गटात हो चे अस्तित्व हळूहळू जाणवू लागले. संधी मिळेल त्या सामाजिक सभा-संमेलनात भाग घेणे आणि व्हिएतनामी जनतेचे गाऱ्हाणे वेशीवर टांगणे असा सपाटा त्याने लावला. सुरुवातीला त्याची टिंगल होई. कारण त्याला फ्रेंच बरोबर बोलता येत नव्हते. त्याची कृश व्हिएतनामी मूर्तीही थोडी विनोदीच दिसे. पण लवकरच लोकांना त्याची निष्ठा, त्याचा अभ्यास, त्याची जिद्द आणि त्याचा प्रामाणिकपणा पटू लागला. फ्रान्समधील व्हिएतनामी जनतेचा पुढारी म्हणून लोक त्याला ओळखू लागले आणि व्हिएतनामी जनतेलाही त्याचे नेतृत्व मानवू लागले. बोटीवरील नोकरीमध्ये त्याला चिकटलेले 'बा' हे नाव टाकून याच सुमारास त्याने न् गुयेन ऐ कोस हे जरा प्रतिष्ठित वाटणारे नाव धारण केले.

न्गुयेन ऐ कोस ची कीर्ति फ्रान्समधे आणि तिकडे व्हिएतनाममधेही पसरू लागली. तसे फ्रेंच गुप्त पोलीसही त्याच्यामागे लागले. त्याच्या नावाची एक जाड फाईल तयार होऊ लागली.

फ्रान्समध्ये हो ने चिकार वाचन केले.

फ्रेंच वृत्तपत्रांतून अनेक लेख लिहिले, फ्रेंच वसाहतींची गाऱ्हाणी उघडयावर आणण्यासाठी एक संघटना स्थापून तीसाठी एक वृत्तपत्रही चालविले. 'बाबू डूँगन' नावाचा एक फार्स फ्रेंच वसाहतवादाची टिंगल करण्यासाठी लिहिला आणि हळूहळू तो फ्रेंच कम्युनिस्ट पक्षात ओढला गेला.

वयाच्या सत्तराव्या वर्षी लहान मुलांच्या एका सभेत बोलताना आपण कम्युनिस्ट कसे झालोत हे हो ने अतिशय सोप्या भाषेत सांगितले– 'सुरुवातीला मी केवळ माझ्या राष्ट्रभक्तीमुळे लेनीन आणि आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट संघटनेकडे ओढलो गेलो. तेव्हा मी काही कम्युनिस्ट नव्हतो. पुढे अभ्यासाने आणि अनुभवाने मला पायरी पायरीने कळून चुकले की सर्व जगातील पददलित जनता आणि कामगार यांना गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी कम्युनिझमशिवाय दुसरा तरणोपाय नाही.'

फ्रेंच कम्युनिस्ट पक्ष म्हणजे त्याकाळच्या उच्च बुद्धिवंतांचा अड्डा मानला जात होता. अशा वर्तुळात हो ने फ्रान्समधे सहा वर्षे घालविली. व्हिएतनामी जनतेमधे राष्ट्रवादाची आणि मुक्तीसंग्रामाची एक नवी प्रेरणा निर्माण केली आणि १९२३ मध्ये कम्युनिस्ट चळवळीचे पद्धतशीर शिक्षण घेण्यासाठी तो मास्कोला रवाना झाला. मास्कोच्या एक वर्षभराच्या त्याच्या मुक्कामात होने नेमके काय केले याविषयी फारशी कोणाला माहिती नाही. परंतु आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीत मानवेन्द्रनाथ रॉयसारखे जे आशियन कार्यकर्ते होते त्यांच्या बरोबरीनेच हो ने कम्युनिस्ट क्रांती चळवळीचे शिक्षण घेतले असे बोलले-जाते.

युरोपियन कम्युनिस्ट वसाहतीमधील प्रश्नांकडे मुळीच लक्ष देत नाही अशी त्याची तक्रार होती. या वसाहती, या अविकसित भागांमध्येच क्रांतीचे खरे बीज लपलेले आहे असे त्याचे म्हणणे होते. आणि हे आपले मत तो वेळोवेळी पक्षसभांमध्ये मांडीत असे.

एक वर्षभर मास्कोत राहिल्यानंतर हो ची मिन्हची पुन्हा भ्रमण यात्रा सुरू झाली. यानंतरची त्याच्या आयुष्यातील वीस वर्षे तर मोठ्याच आश्चर्यकारक साहसात गेली. सुरुवातीला हो कोमिन्टार्नचा दूत मायकेल बोरोदीन याच्याबरोबर चीनमध्ये सहाय्यक म्हणून गेला. क्योमिन्टांग आणि कम्युनिस्ट यांच्या सहकार्याने चालविल्या जात असलेल्या व्हाम्पोआ येथील लष्करी विद्यापीठात त्याने काही दिवस शिक्षकाचे काम केले. आणि त्याचबरोबर चीनमधील व्हिएतनामी क्रांतिकारकांची संघटना बांधण्यास सुरूवात केली. त्याच जोडीने थान-नियेन नावाचे एक क्रांतिकारी वृत्तपत्रही खास व्हिएत-

## मुक्तीसाठी कम्युनिझमशिवाय तरणोपाय नाही–हो

नामी जनतेसाठी चालविले. चीनमध्ये १९२६–२७ च्या सुमारास व्हिएतनामी क्रांतिकारकांची हो याने बांधलेली ही गुप्त संघटना म्हणजेच नंतरच्या व्हिएत मिन्ह संघटनेचे आणि व्हिएतनामी कम्युनिस्ट पक्षाचे बीज होते.

हो च्या क्रांतिकारी गुप्त चळवळी फार काळ चिनी पोलीसांच्या नजरेपासून लपून राहिल्या नाहीत. कम्युनिस्ट आणि क्योमिन्टांग यांचे फाटल्यानंतर चीनमधील जिवंत राहिलेले सारे कम्युनिस्ट भूमिगत झाले होते. आणि अशा रितीने १९२७ मधेच आपले चंबूगबाळे आवरून हो ला चीनमधून पळ काढावा लागला. हो परत मास्कोत आला. तेथून त्याची पुनश्च भ्रमंती सुरू झाली.

पंडित नेहरूंबरोबर ब्रुसेल्स येथील 'कॉंग्रेस अगेन्स्ट इंपेरियालिस्ट वॉर' या अधिवेशनाला हो हजर राहिला. तेथून फ्रान्स, जर्मनी, स्विट्झरलॅंड अशी भटकंती करीत १९२८ च्या ऑक्टोबरमध्ये तो एका बुद्ध भिक्षूच्या वेशात सयाममध्ये पोचला. तेथील व्हिएतनाम्यांची त्याने संघटना बांधून एक वृत्तपत्रही सुरू केले. 'चिन' म्हणून तो तेथे ओळखला जाऊ लागला. आणि आपल्या आसपास त्याने बरेच अनुयायी गोळा केले. बुद्ध भिक्षूच्या भगव्या वेशात वावरून हो ने त्यावेळी जे संघटनांचे जाळे उभारले त्यांचे खरे स्वरूप पुढे १९४५ च्या सुमारास फ्रेंचांच्या नजरेस पडले. सबंध इंडो-चीनमधे वेगवेगळे कम्युनिस्ट पक्ष स्थापन झाले होते. त्यांचे एकीकरण आणि सुसूत्रीकरण करण्याची कामगिरी त्याच्यावर होती.

सयाममधून हो हॉंगकॉंगला गेला आणि तेथे पोलीसांकडून पकडला गेला. हॉंगकॉंगच्या भयानक तुरुंगात काही महिने काढल्यावर एका ब्रिटीश वकीलाच्या मदतीने तो सुटला. फ्रेंच गुप्त पोलीस मागावर होतेच. त्यांना हुलकावणी देण्यासाठी एका श्रीमंत चिनी व्यापाऱ्याचा वेश करून हॉंगकॉंग सोडले.

पुढची दहा वर्षे या तुरुंगातून त्या तुरुंगात अशी भटकण्यात, फ्रेंच गुप्त पोलीसांची नजर चुकवीत मास्को, पॅरीस, शांघाय अशा वाऱ्या करण्यात गेली. या काळात हो ने नेमके काय केले याविषयी हनोईतून प्रसिद्ध होणाऱ्या हो ची मिन्हच्या चरित्रातही फारशी माहिती उपलब्ध होत नाही. पण यापैकी बराचसा काळ ब्रिटीश आणि चिनी तुरुंगात आणि उरलेला इंडो-चिनी कम्युनिस्ट पक्ष संघटित करण्यात गेला असे दिसते. चीनमधे १९२७ च्या अगोदरच फाम वान दॉंग हा एक व्हिएतनामी तरुण त्याला अनुयायी मिळाला होता. हा दॉंग म्हणजेच आताच्या उत्तर व्हिएतनामचा प्रधानमंत्री. १९३० ते १९४० च्या रहस्यमय काळातच दॉंगने दियेन-बियेन-फू ला प्रसिद्धी पावलेल्या व्हो नगुयेन ज्ञॉपची होशी ओळख करून दिली. दुसरे महायुद्ध सुरू झाले तेव्हा हो व्हिएतनाममध्ये होता.

सुमारे पंचवीस वर्षे हो व्हिएतनाममध्ये स्वतः आला नव्हता. पण तेथील

स्वातंत्र्य चळवळींना त्याने बाहेरूनच नवे जीवदान दिले होते. बाहेरूनच संघटना केल्या होत्या आणि अंतर्गत चळवळींवर बाहेरूनच त्याची बारीक नजर होती. १९४० मध्ये तो मायदेशी गुप्तपणे परतला त्या अगोदरच व्हिएत-नामी जनतेने त्याचे महात्म्य स्वीकारले होते.

युरोपात दुसऱ्या महायुद्धाला तोंड लागले. आणि व्हिएतनाममधील राष्ट्र-वाद्यांच्या उघड स्वातंत्र्य चळवळींचा जोर वाढला. तशी फ्रेंच पोलिसांची दडपशाहीसुद्धा वाढली. तुरुंग तुडुंब भरून गेले. कॉन्सेन्ट्रेशन कॅम्पस् उघडले गेले आणि सारे व्हिएतनाम आता निकराच्या लढ्याला तयार झाल्याचे दृष्य दिसू लागले.

आणि त्याच सुमारास व्हिएत मिन्ह या संघटनेचे नाव ज्याच्या त्याच्या तोंडी ऐकू येऊ लागले. व्हिएत मिन्हने केलेले आवाहन लाखो पत्रकांमधून शहरा शहरातून आणि खेड्यांमधून जिकडे तिकडे दिसू लागले—

> ' व्हिएतनामी एकता जिंदाबाद
> व्हिएतनामचा पाठिंबा दोस्त राष्ट्रांना.
> फॅसिस्टांचा नि:पात करा.
> फ्रेंच वसाहतवाद्यांना हाकून द्या.
> राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या युद्धात सामील व्हा. '

या घोषणांमधूनच व्हिएत मिन्हची धोरणे स्पष्ट होत होती आणि लोकांना ती एकदम पटत होती. व्हिएतनामच्या विविध भागात अधून मधून बंडाळी माजत होती आणि फ्रेंच दडपशाही वाढत होती. लोकांचा संताप शीगेला पोचत होता.

इकडे युरोपात जर्मन सैन्याने मॅजिनो तटबंदी ओलांडून फ्रान्समधे प्रवेश केला. आणि काही दिवसातच फ्रान्सचा सपशेल पराभव झाला. फ्रेंच सरकारला पॅरिस-मधून पलायन करावे लागले.

फ्रेंचांचा युरोपात पाडाव झाल्या-बरोबर इकडे जपान्यांनी वेळ साधली आणि आग्नेय आशियात आपल्या फौजा घुसविल्या. फ्रेंच सैन्याचे नीतिधैर्य आधीच पार कोसळले होते. जपानी सैन्याला व्हिएतनामच्या सीमेवर त्यांनी नावापुरता प्रतिकार केला आणि शरणा-गती पत्करून जपान्यांना आग्नेय आशियाचे दार मोकळे करून दिले.

व्हिएत मिन्हने नवी घोषणा दिली. जपान आपला शत्रू नंबर एक: त्याला हाकून द्या.

अशा रीतीने १९४० सालीच व्हिएत मिन्ह शस्त्र हाती घेऊन फ्रेंचांशी, नंतर जपान्यांशी लढायला सिद्ध झाले होते. व्हिएतनामचे खरे युद्ध सुरू झाले ते तेव्हापासून सतत तेहतीस वर्षे या देशात अशी रक्ताची गंगा वहात आलेली आहे. यापेक्षाही लांब काळपर्यंत चालणारी अनेक युद्धे जगात झाली असतील पण सर्व आधुनिक शस्त्रास्त्रांच्या वापरामुळे या युद्धाएवढी भयानकता दुसऱ्या कोण-त्याच संघर्षाला आली नसेल. आधुनिक युद्धामधे सारेच सैनिक असतात असे म्हणतात. हे युद्ध तर असे की यात ज्याला झळ लागली नाही असा एकही

माणूस सबंध देशात सापडणे जवळ जवळ अशक्य.

हो ची मिन्ह १९४० मधे गुप्तपणे मायदेशी परतला आणि त्याने आपला मुक्काम उत्तरेतील काओ बांग प्रांतातील डोंगरी भागातील जुन्या गुहांमधून ठेवला. जपानी आक्रमणाने चालून आलेल्या संधीचा पुरेपूर लाभ घेण्याचे हो ने ठरवून देशातील सर्व राष्ट्रवादी गटांशी त्याने संपर्क सांधायचे प्रयत्न चालविले आणि आपल्या संघटनेला त्यांचा पाठिंबा मिळविला.

अखेर व्हिएतमिन्हच्या गनिमी सैनिकांनी १९४० च्या नोव्हेंबरपर्यंत काओ बांग प्रांतात चिनी सीमेला लागून एका 'मुक्त' प्रदेशाची स्थापना करण्यात यश मिळविले. 'स्वतंत्र व्हिएतनाम' या नावाचे एक स्टेन्सीलवर लिहिलेले वृत्तपत्रही होने लगेच सुरू केले आणि काखेत या कागदांचे गठ्ठे घेऊन हिंडणारी हो ची मूर्ती काओ बांग च्या डोंगरातून हिंडू लागली. याच गुहांमधून त्याने व्हिएतनामी कम्युनिस्ट पक्षाची बैठक घेऊन अधिकृतपणे व्हिएतमिन्हची स्थापना घोषित केली. आज उत्तर व्हिएतनाम सरकारात सत्तेवर असलेले झॉप, दुआन, दाँग वगैरे मंडळी या बैठकीला हजर होती. सर्व राष्ट्रवादी गटांना व्हिएतमिन्हमधे सामील करून घ्यावयाचे आणि शक्य असेल तिथे जमिनीच्या पुनर्वाटपाचा कार्यक्रम हाती घ्यायचा असे याच बैठकीत ठरले.

हो चे आतापर्यंतचे आयुष्य कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या दबावाखाली गेले होते. १९४० पासून मात्र त्याने इंटरनॅशनलपासून आपली जवळ जवळ पूर्ण मुक्तता करवून व्हिएतनामी राष्ट्रवादाचा उघड झेंडा उभारला. आपल्या लढ्याला त्याने उघडपणे राष्ट्रीय मुक्ती चळवळ असे नाव दिले. व्हिएतनामच्या इतिहासावर त्याने जोर दिला. व्हिएतनामी संस्कृती, व्हिएतनामी ध्वज यांचे गोडवे गायिले. कम्युनिस्ट पोथीतील कामगार चळवळीच्या प्राथम्याला खो देऊन शेतकऱ्यांच्या बंडाचा झेंडा उभारला आणि व्हिएतनामी जनतेचे हृदय जिंकले.

चीन, युगोस्लाव्हिया, क्यूबा, व्हिएतनाम...जेथे जेथे म्हणून कम्युनिस्ट चळवळी यशस्वी झाल्या तेथले रहस्य हेच की तेथील कम्युनिस्ट नेते हे शुद्ध राष्ट्रवादी तरी होते किंवा राष्ट्रवादाचा झेंडा उभारल्याशिवाय गती नाही हे त्यांनी ओळखले तरी होते आणि कम्युनिस्ट तत्वांना त्यांनी आपापल्या राष्ट्रीय स्थानिक समस्या, गरजा आणि श्रद्धा यांना अनुसरून योग्य तशी मुरड घातली होती.जेथल्या कम्युनिस्ट चळवळी परकीय सूत्रानुसार, राष्ट्रवादाशी शत्रुत्व पत्करून चालल्या त्या गोत्यात आल्या. हो ने हे ओळखले तेव्हाच त्याच्या भावी यशावर शिक्कामोर्तब झाले होते.

जपानी आक्रमकांविरुद्धच्या आपल्या चळवळीला सर्व दोस्त राष्ट्रांचा पाठिंबा मिळावा यावर हो चा कटाक्ष होता. चीन मधील चँग कै शेक च्या कोमिन्टांगचा पाठिंबा मिळवावा म्हणून जुलै १९४२

मध्ये त्याने चिनी पत्रकाराच्या वेषात सीमा ओलांडून चीनमध्ये प्रवेश केला आणि पोलीसाकडून पकडला गेला. माओच्या येनानमधील फौजांचा यावेळी चँक कै शेकला चांगलाच अनुभव आला होता आणि व्हिएतमिन्हचे खच्चीकरण करून कोमिन्टांगशी पितृसंबंध जोडणारा पक्ष व्हिएतनाममध्ये स्थापण्याचे प्रयत्न त्याने चालविले होते.

इकडे हो च्या अटकेची वार्ता लगेच व्हिएतनाममध्ये पसरली. पाठोपाठ हो ठार झाल्याचीही बातमी आली. फाम व्हान दाँग यानेच ही बातमी पत्राने जनरल झॉपला कळविली. सगळीकडे दु:खाचे वातावरण पसरले. पक्षाने आपल्या मुक्त प्रदेशातच एक मोठी शोकसभा घेतली. दाँग ने हो ला श्रद्धांजली वाहणारे हेलावून सोडणारे भाषण ठोकले आणि चीनमध्ये हो ला कोठे पुरून ठेवले आहे हे शोधून काढण्यासाठी एक दूत पाठविण्यात आला.

परंतु पाच-सात महिन्यातच जनरल झॉपला चीनमधून कोण्या अज्ञात इसमाने पाठविलेले एक वृत्तपत्र मिळाले. वृत्तपत्राच्या वेष्टनावर आतील बाजूस एक कविता लिहिली होती--

मेघ समुदायातून पर्वतशिखरे
चमकताहेत
आणि शिखरे या ढगांना
आलिंगताहेत
मी मात्र दूर दक्षिण क्षितिजी
दृष्टी लावून
भावविवश होऊन एकटाच
उसासतो आहे
माझे मित्र काय करीत
असतील---?

हस्ताक्षराबद्दल प्रश्नच नव्हता. ते होचेच लिहिणे होते. हो जिवंतच होता यात शंका नव्हती. हो जिवंत होता. पण अतिशय वाईट अवस्थेत. घाणेरड्या चिनी तुरुंगातून खितपत पडलेला, भयानक क्रूर आणि गलिच्छ गुन्हेगारांबरोबर डांबलेला, हाती पायी जड साखळचा बांधलेला, डास, पिसवा, ढेकूण यांनी बेजार झालेला आणि अनेक चर्मरोगांनी पछाडलेला, मानेभोवती जाड दगडी जाते लावून या तुरुंगातून त्या तुरुंगात असे अनेक ठिकाणी शेकडों मैल त्याला पायी भटकविले गेले. हो खरोखर त्यावेळी मरायचाच. पण पक्की जीवननिष्ठा असणाऱ्या इरसाल म्हाताऱ्यांप्रमाणे त्याने मृत्यूला काही दाद दिली नाही. याच पंधरा महिन्याच्या काळात त्याने भरपूर कविता केल्या. त्या पुढे 'कारागृहातून' या शीर्षकाखाली एका पुस्तकात प्रसिद्ध करण्यात आल्या.

हो च्या या पंधरा महिन्याच्या बंदिवासातून सुटका झाली तीही मोठ्या विचित्र रीतीने. चँग कै शेक च्या सल्ल्याने चिनी मार्शल चांग हा

## घाणेरड्या चिनी तुरुंगात खितपत पडलेला हो...

कोमिन्टांगशी सर्व तऱ्हेची निष्ठा ठेवील असा व्हिएतनामी पक्ष बांधीत होता. या पक्षाचे नाव डाँग मिन्ह होई. डाँग साठी खटपट करूनही चांगला पुढारीच मिळत नव्हता. तुरुंगातला हा म्हातारा त्याला बरा वाटला. याचा पूर्वी कम्युनिस्टांशी संबंध होता. पण आता हा बदललेला दिसत होता. शिवाय त्याने आता हो ची मिन्ह हे चिनी वाटणारे नावही धारण केले होते. अखेर चांगने बराच विचार करून हो ची सुटका केली आणि व्हिएतमिन्हचा पाडाव करण्यासाठी निर्मिलेल्या डाँग मिन्ह होई चा नेता म्हणून त्याला व्हिएतनामला परत पाठविले.

अशा रीतीने हो प्रकृतीच्या अतिशय जर्जर अवस्थेत पुन्हा मायदेशी परतला. डाँग होई चा तो नेता झाल्यावर अर्थातच सारे व्हिएतमिन्ह त्या पक्षात घुसू लागले. डाँग होई चे उद्दिष्ट होते जपान्यांना हाकून लावणे आणि व्हिएतनाम स्वतंत्र करणे. त्यासाठी चिनी पैसा मिळत होता. हो ला तरी आणखी काय हवे होते. ही दोन उद्दिष्टे साध्य झाल्यावर क्रांती अशी किती दूर राहील?

दरम्यान व्हिएतमिन्हचे गनिमी सैनिकही डाँगमधे सामील झाले होते. आता चँगची मदत त्यांना मिळू लागली होती. एक संयुक्त सरकारही स्थापन झाले होते. पण ही अवस्था फार काळ टिकली नाही. परस्पर विरोधी मतांच्या गटांनी बांधलेली ही पक्षाची मोट लवकरच फुटली. शिल्लक राहिले ते व्हिएतमिन्ह.

दरम्यान जनरल झॉपच्या अधिपत्याखालील व्हिएतमिन्हच्या गनिमी कारवाया हळू हळू वाढतच होत्या. झॉपचे सैनिक व्हिएतनाममध्ये घुसलेल्या जपानी सैनिकांना जीवन नकोसे करून सोडीत होते. शस्त्रे चोरणे, एकट्या दुकट्या सैनिकाला गाठून मारणे, लष्करी गाड्या, मोटारी उडविणे, लष्कराच्या मार्गात अनेक अडथळे आणणे असे त्यांचे उपद्व्याप चालत. एव्हाना व्हिएतमिन्हची लोकप्रियताही वाढू लागली होती. संघटनेचे जाळे सबंध व्हिएतनामभर पसरू लागले होते. शस्त्रसंख्या आणि ताकद वाढू लागली होती. प्रत्येक खेडे न् खेडे ताब्यात घेण्याचा उपक्रम व्हिएतमिन्हने सुरू केला होता. प्रचाराचा धडाका लावला होता. व्हिएतमिन्हचा सर्वत्र एवढा सुळसुळाट झाला होता की डिसेंबर १९४४ मधे हो ने आपली मुख्य कचेरी हनोईमधे हलविली होती. फ्रेंचांना धोका कळला होता. पण त्यांनी काही कारवाई करण्याआधीच जपान्यांनी हनोईतील सर्व फ्रेंच सैन्याला बंदी केले होते.

जपानी सैन्य जेव्हा सर्व व्हिएटनामभर पसरले तेव्हा सार्वत्रिक उठाव करण्याचा आग्रह जनरल झॉपने धरला. परंतु होने त्याला सबुरीचा सल्ला दिला. अजून अनेक ठिकाणी फ्रेंच सैन्य जपान्यांशी लढत होते. फ्रेंच आणि जपानी दोघेही व्हिएतनामचे शत्रू होते. त्यांना परस्परात भरपूर लढू द्यावे. एकमेकांना मारून थकले की मग बघू. असे व्यवहारी धोरण हो चे होते, आणि

तेच योग्य ठरले. १९४५ च्या ऑगस्ट-मध्ये जपानने जेव्हा शरणागती पत्करली तेव्हा व्हिएतमिन्हची ताकद प्रचंड वाढली होती. आणि व्हिएतनामवर आपला पुन्हा अंमल बसविण्यासाठी फ्रेंचांना व्हिएतमिन्हशी बोलणी करण्या-वाचून गत्यंतर उरले नव्हते.

व्हिएतमिन्हच्या या यशस्वी वाट-चाली मध्ये हो ची मिन्ह एवढाच वाटा आहे जनरल व्हो नगुयेन झॉप याचा. पुढे १९५४ मधील दियेन बियेन फू येथील विजयाने झॉपने जागतिक कीर्ती मिळविली. पण गनिमी युद्धतंत्रातील एक तज्ञ म्हणून त्याला अगोदरच ओळखले जाऊ लागले होते. हो ची मिन्ह प्रमाणेच त्याच्याविषयीही अनेक कथा, दंतकथा प्रचलित आहेत आणि त्यांच्या प्रतिमेभोवती रोमहर्षक वलय आहे. अमेरिकेच्या सर्वशक्तिशाली लष्कराला आणि वायुदलाला उत्तर व्हिएतनाम सध्या समर्थपणे तोंड देत आहे ते झॉपच्याच जिद्दीने. दक्षिण व्हिएटनाममधील नॅशनल लिबरेशन फ्रंट जो लढा चालवीत आहे, तो झॉपच्याच प्रेरणेने आणि मार्गदर्शना-खाली असे मानले जाते.

खरे म्हणजे झॉपच्या पूर्वायुष्यात त्याला लष्करी शिक्षण असे काडीचेही मिळाले नव्हते. एका दरिद्री शेतमालक कुटुंबात त्याचा १९११ साली जन्म झाला. वयाच्या चौदाव्या वर्षी तो एका गुप्त जहाल राजकीय संघटनेत दाखल झाला. आणि लगेच फ्रेंच तुरुंगाच्या गजा-आड गेला. हा तुरुंगवास त्याला मानवला कारण तिथेच त्याची आपल्या भावी-पत्नीशी ओळख झाली. आणि तिथेच तो आपल्या हुशारीमुळे आणि बुद्धीच्या चमकेमुळे तेथील पोलीस कमिशनरच्या नजरेत भरला. कमिशनरला या मुलात इंटरेस्ट निर्माण झाला. त्याने त्याला कैदेतून सोडविले आणि शिक्षणासाठी फ्रान्समध्ये पाठवून दिले. चार वर्षांत हनोई विद्यापीठात तो फ्रेंच इतिहासाचा प्राध्यापक म्हणून लागला. इतिहासां-मधील लढायांचे त्याला विलक्षण वेड. नेपालियनच्या लढायांच्या तपशीलवार योजना तो पाहता पाहता फळ्यावर काढून दाखवून लोकांना थक्क करी. या विषयात त्याला जात्याच गती होती.

परंतु फ्रेंच इतिहासाच्या अभ्यासाने झॉप फ्रेंचाळला नव्हता. उलट फ्रेंच क्रांतीपासून स्फूर्ती घेऊन तो व्हिएतनामी क्रांतीची स्वप्ने बघू लागला होता. आणि त्यावेळी व्हिएतनामी क्रांतीचे निशाण फडकविणाऱ्या कम्युनिस्ट पक्षात दाखलही झाला होता. पक्षावर १९३९ मध्ये बंदी आली तेव्हा झॉप उत्तरेच्या डोंगराळ प्रदेशातून चिनी सीमेवर निसटला. मागे राहिलेली त्याची पत्नी फ्रेंच तुरुंगात गेली आणि तिथेच वारली.

व्हिएतमिन्हची स्थापना झाली तेव्हा होची मिन्हला लष्करी विषयातला एक चांगला तज्ञ हवा होता. प्रोफेसर झॉपला या विषयाची आवड आहे असे कळताच त्याने त्याला युद्धतंत्रात प्राविण्य संपाद-ण्यास सांगितले. हो ने केवळ या

विषयाचा अभ्यासच केला असे नाही तर अनेक तज्ञ पाठ्यपुस्तकांप्रमाणे वाचतील असे ग्रंथ पुढे गनिमी युद्धतंत्रावर लिहिले, लवकरच व्हिएतमिन्हचे संपूर्ण लष्करी नेतृत्व आणि संघटन झॉपच्या खांद्यावर आले.

व्हिएतमिन्हच्या जपानविरुद्धच्या लढ्याला अमेरिकेनेही शस्त्रांची मदत केली. व्हिएतनामी भूमीवर अमेरिका अशा तऱ्हेने प्रथम १९४५ मध्ये प्रत्यक्ष गोवली गेली. तेव्हापासूनच अमेरिकन अस्तित्वाचे त्या देशातील प्रमाण सतत वाढतच गेले.

तिकडे नाझी जर्मनीचा पाडाव झाला होता. आणि इकडे जपानच्या पराभवाला केवळ काही दिवसांचाच अवधी उरला आहे हे स्पष्ट दिसत होते. आणि जर्मन उच्चाटनानंतर फ्रान्समधे येणारे सोशालिस्ट राज्यकर्ते तर हो ला अधिक जवळचे वाटत होते. आणि राज्यकर्त्यांपैकी कित्येकांबरोबर होते. स्वत: प्रत्यक्ष काम केले होते. कित्येक मित्र होते. त्यांच्याबरोबरीने त्याने वसाहतवादाविरूद्धच्या लढ्याच्या आणि क्रांतीच्या गप्पा मारल्या होत्या. त्यामुळे फ्रान्समधे नवी राजवट येताच त्याच्या आशा पालवल्या होत्या. व्हिएतनामला न्याय मिळेल असे वाटत होते.

पण फ्रान्स जर्मनांकडून अपमानित होऊन पडला असता ब्रिटिश भूमीहून फ्रेंच स्वातंत्र्याचा लढा देणाऱ्या जनरल द गॉलने फ्रान्सचे धोरण जाहीर करून टाकले होते. वसाहतींना पूर्ण स्वातंत्र्य देता कामा नये. जनरल द गॉल फ्रेंच साम्राज्याच्या पुनरुज्जीवनाची स्वप्ने पाहत होता. हो चे धोरण पडते घेण्याचे होते. क्रमाक्रमाने स्वातंत्र्य पदरात पाडून घेण्याचे होते. त्याला फ्रान्सविषयी, फ्रेंच संस्कृतीविषयी प्रेम होते. त्याला फ्रान्सशी संबंध तोडायचे नव्हते. भारतीय नेते त्यावेळी ज्या देवाणघेवाणीच्या भाषेतून स्वातंत्र्याचे व्यवहार करीत होते तीच भाषा तो वापरीत होता. जनरल झॉप आणि व्हिएतमिन्हचे इतर अनेक नेते सर्वदूर उठावाचा आग्रह धरू लागले होते. कारण व्हिएतनामची ताकद आणि संघटना जबरदस्त वाढली होती. फ्रान्स अशक्त आणि जर्जर झाला होता.

पण हो सबूरीचा सल्ला देत होता. जपानचा संपूर्ण पाडाव होईपर्यंत धीर धरायचा. पण फ्रेंच फौजांच्या पुनरागमनापर्यंत स्वस्थ बसायचे नाही. दरम्यान फ्रेंच नेत्यांशी वाटाघाटी करायच्या. असे त्याचे धोरण होते.

अखेर ५ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेने हिरोशिमावर अणुबॉंब टाकला आणि जपान गडबडले. सर्वत्र व्हिएतनामभर आता अशांतीचे वातावरण पसरले. व्हिएतमिन्हच्या नेतृत्वाखाली स्थापलेल्या आघाडीने राष्ट्रीय उठावाची हाक दिली. झॉपच्या फौजा वेगाने शहरे ताब्यात घेऊ लागल्या. हनोई, हैफॉंग, हे वगैरे शहरांमध्ये वातावरण विद्युन्मय झाले. शहरोशहरी लोक रस्त्यांवर येऊन निदर्शने, संप करू लागले. व्हिएतमिन्हचे कुशल कार्यकर्ते अशा गर्दीचा ताबा घेऊन

वातावरण अनुकूल करू लागले.

आपली वेळ ओळखून जपान्यांनी १६ ऑगस्ट रोजी सत्ता सम्राट बाओ दाई याच्या हाती सोपवून हात झटकून टाकले आणि दोन दिवसात स्थानिक व्हिएतमिन्हने शहराचा संपूर्ण ताबा घेतला. बाओ दाईची राजधानी हे येथे होती. सबंध देशभरची परिस्थिती बघून सम्राट बाओ दाईनेही सत्तासूत्रे अधिकृतपणे व्हिएतमिन्हच्या हाती सोपविली आणि ऑगस्ट २९ रोजी हो ने हनोईमधून व्हिएतनामच्या तात्पुरत्या लोकशाही सरकारची स्थापना केल्याची घोषणा केली आणि २ सप्टेंबर रोजी लोकशाही सरकारची अधिकृतपणे स्थापना झाली. दरम्यान झॉपच्या फौजाही हनोईमध्ये येऊन थडकल्या होत्या सायगाव मात्र ब्रिटिशांच्या ताब्यात होते आणि नव्या फ्रान्सच्या फौजा आपली जुनी वसाहत पुन्हा ताब्यात घेण्यासाठी वेगाने व्हिएतनामकडे येत होत्या.

व्हिएतमिन्ह आणि इतर राष्ट्रवादी गटांना फ्रेंचांचे पुनरागमन नको होते. कित्येकजण व्हिएतनामच्या आजच्या अवस्थेला फ्रेंचांचा आपल्या वसाहतीवरील हक्क परत मिळविण्याचा हट्ट कारणीभूत आहे असे मानतात ते काही फार खोटे नाही. दुसरे महायुद्ध संपले तेव्हा सबंध व्हिएतनाममध्ये फ्रान्सच्या लोकशाही राजवटीचा एकही सैनिक नव्हता. व्हिची राजवटीचे होते.

बहुतेक ग्रामीण भागांमधून व्हिएतमिन्हचे प्राबल्य होते. चँग कै शेकच्या फौजांनी उत्तर व्हिएतनामच्या काही भागात जपानची शरणागती पत्करावी असा अमेरिकेचा आग्रह असला तरी व याच ठिकाणी अधिकृत शरणागती पत्करण्याआधीच व्हिएतमिन्हने ताबा मिळविला होता. दक्षिणेला सायगाववर ब्रिटिश फौजांनी ताबा मिळविला होता. जनरल द गॉलचा असा हट्ट होता की व्हिएतनाममधील सर्वंकष ताबा फ्रेंच लष्करानेच घेतला पाहिजे. त्यामुळे फ्रान्सबद्दल फारसा द्वेष नसूनही व्हिएतनाम्यांची मने कलुषित झाली होती. व्हिएतमिन्ह तर या बाबतीत चक्क हनोईत 'उपस्थित' असलेल्या अमेरिकन लष्करी प्रतिनिधींना आपली बाजू पटवून देण्याचा प्रयत्न करीत होते. कारण खुद्द अमेरिकेनेच वसाहतवादाविरुद्धच्या लढ्याचे शिंग फुंकले होते ना.

त्यामुळेच हो चे धोरण सुरुवातीला मऊ होते. कथा अशी सांगतात की फ्रेंच प्रतिनिधी जेव्हा प्रथम हनोईत आले तेव्हा हो ने त्यांच्या स्वागतासाठी जनरल झॉपला उत्तर व्हिएतनामी सैन्याचा कमांडर-इन-चीफ या नात्याने विमानतळावर जाण्यास सांगितले. झॉप भडकला. अद्वातद्वा बोलू लागला. जे फ्रेंच आमच्या स्वातंत्र्याच्या आड येतात त्यांच्याशी मी शेकहँड करू?...त्याचे

## हो आणि झॉप यांनी पुन्हा जंगलाचा रस्ता धरला

बडबडणे संपल्यावर हो थंडपणे म्हणाला—'त्यांचं विमान यायला अजून दोन तास अवधी आहे. तेवढचा वेळात तू एका कोपऱ्यात बसून तू तुझं रडणं, ओरडणं संपूर्ण उरकून घे. आणि बरोबर वेळेवर विमानतळावर पोच.' झॉपला अर्थातच जावे लागले.

हो आणि फ्रान्स यांच्यात बोलणी सुरू झाली. आणि इकडे फ्रेंच फौजा व्हिएतनाममधे उतरल्या. ब्रिटीशांच्या मदतीने फ्रेंचांनी दक्षिणेतील सायगावसह काही शहरांचा ताबा मिळविला. कराराप्रमाणे उत्तरेकडे चँग कै शेकच्या चिनी लष्कराने जपान्यांकडून ताबा मिळवायचा होता. बऱ्याच ठिकाणी चिन्यांनी अशी जपानी शरणागती तांत्रिकरीत्या पत्करली होती. पण प्रत्यक्ष ताबा व्हिएतमिन्हचाच होता.

बोलण्याचा घोळ घालता घालता अखेर फ्रान्सने मार्च १९४६ मधे नव्या फ्रेंच युनियनमधे, इंडाचायनी फेडरेशनच्या अंतर्गत, उत्तर व्हिएतनामच्या केवळ टोंकिन प्रांतात हो च्या लोकशाही सरकारला मान्यता देण्याचे ठरविले. व्हिएतनाममधील मध्य व दक्षिण भागातले अन्नाम व कोचीन चायना हे दोन प्रांत या लोकशाही सरकारात सामील होण्यास राजी आहेत की नाही हे पाहण्यासाठी जनमत कौल घेण्याचीही फ्रान्सने तयारी दर्शविली.

या कराराचे तपशील ठरविण्यासाठी जेव्हा बोलणी होऊ लागली तेव्हा हो ला आणि त्याच्या प्रतिनिधींना कळून चुकले की ठरल्याप्रमाणे जनमत कौल घेण्याची फ्रेंचांची मुळीच इच्छा नाही. कारण त्यावेळी जनमत कौल घेतला असता तर सबंध व्हिएतनाम एक झाला असता यात शंकाच नाही. राष्ट्रवादी गट तर असे अर्धवट स्वातंत्र्य पदरात पाडून घेतल्याबद्दल हो वर आणि व्हिएतमिन्हवर सडकून टीका करीत होते. त्यांना संपूर्ण स्वातंत्र्य हवे होते.

बोलणी फिसकटत होती. फ्रेंच प्रतिनिधी व्हिएतमिन्ह प्रतिनिधींना टाळत होते. दरम्यान व्हिएतमिन्ह सैनिक आणि फ्रेंच सैनिक यांच्यात कुरबुरी चालू होत्याच. बोलणी जसजशी अधिकाधिक फिसकटू लागली तसा कुरबुरीचा वेग वाढू लागला. आकार वाढू लागला. अखेर फ्रेंचांनी नोव्हेंबर २३, १९४६ रोजी हैफाँगवर बाँबिंग केले. आणि सारेच बिघडले. दुसरे दिवशी व्हिएतमिन्ह सैनिकांनी फ्रेंच लष्करी तळांवर हल्ले चढविले. आणि युद्धाला तोंड लागले.

हो आणि झॉप यांनी पुन्हा जंगलाचा रस्ता धरला. आता संपूर्ण व्हिएतनामभर गनिमी युद्धाला तोंड लागले. १९४६ साली सुरू झालेली ही लढाई १९५४ मधे दियेन बियेन फू या एका लहानशा खेडचाच्या ठिकाणी झॉपच्या फौजांनी फ्रेंच लष्कराच्या एका प्रचंड तुकडीला समोरासमोरच्या लढाईत धूळ चारली तोपर्यंत चालली.

व्हिएतमिन्हच्या दृष्टीकोनातून हे युद्ध काही सोपे नव्हते. फ्रेंचांनी सुमारे पाऊणलाख फौज व्हिएतनामधे आणली होती. अद्ययावत शस्त्रास्त्रांनी सुसज्ज

अशी. जनरल झॉपजवळ प्रशिक्षित लष्करी सैनिक नव्हते, अधिकारी नव्हते. शस्त्रे नव्हती दारूगोळा नव्हता. अशा स्थितीतही गनिमी युद्धाचे स्वतःपुरते वेगळे ठोकताळे बसवून त्याने हे युद्ध चालविले.

झॉपने लष्कराचे तीन भाग पाडले. स्थानिक फौज : दिवसा शेतकरी आणि रात्री गनिमी सैनिक असा वावर ठेवून आपापल्या खेड्यापुरता संचार ठेवणारी; प्रादेशिक फौज : जवळ बऱ्यापैकी शस्त्रे बाळगून दिलेल्या जिल्ह्यात अथवा प्रदेशात संचार ठेवणारी; आणि खडी फौज : कडक लष्करी शिक्षण मिळालेली, वीजेप्रमाणे सर्वत्र संचार करणारी आणि मिळतील ती अत्याधुनिक शस्त्रे बाळगणारी. खड्या फौजेत जाणारा सैनिक हा पायरी पायरीने स्थानिक आणि प्रादेशिक फौजांमधून गेलेला असे. यावेळी तरी उत्तर व्हिएतनामला नियमित शस्त्र पुरवठा कुठे होता ? पूर्वीचीच मोडकी तोडकी शस्त्रे आणि कोमिन्टाग चिनी फौजेने जपान्यांकडून शरणागती स्वीकारताना मिळविलेल्या ३० हजार रायफल्स आणि २ हजार मशीनगन्स् ज्या व्हिएतमिन्हने विकत घेतल्या. व्हिएतमिन्हने खरी शस्त्रे मिळविली ती जपान्यांशी लढताना आणि पुढे फ्रेंचांशी. जपान्यांशी लढताना अमेरिकनांनीही त्यांना शस्त्रे पुरविली होती.

सैन्याचे नाव होते लोकमुक्ती सेना. (पीपल्स् आर्मी ऑफ लिबरेशन) माओ त्से तुंगने घालून दिलेल्या आठ तत्त्वांवर सैन्याची वागणूक आधारली होती.

१. जनतेशी सभ्यपणे वागा.

२. जनतेशी व्यवहार प्रामाणिकपणे करा.

३. उसनी घेतलेली प्रत्येक वस्तू परत करा.

४. मोडतोड झालेल्या वस्तूंची किंमत चुकती करा.

५. लोकांना धमकावू नका.

६. पिकांची नासधूस करू नका.

७. स्त्रियांशी चाळे करू नका.

८. कैद्यांना वाईट वागणूक देऊ नका.

या उप्पर हो ने आणखी एक नियम घालून दिला. शेतकऱ्यांना वाचायला शिकवा. ही तत्त्वे धरून चालणारी कोणती सेना लोकांना आवडणार नाही ?

पण फ्रेंचांनी व्हिएतनाममधील सर्व शहरांचा ताबा घेतला होता आणि व्हिएतमिन्हची सर्व शक्ती ग्रामीण भागांमधे विखुरली होती. शहरी वातावरण पाहता या देशात कोठले युद्ध चालू आहे असे चुकूनही कुणाला वाटले नसते. पण रस्ते तोडणे, शहरांचा पाणीपुरवठा तोडणे, फ्रेंचांच्या लहानसहान तुकड्यांवर हल्ले करणे असे प्रकार चालू होतेच आणि त्यांची संख्या वाढत होती

सर्व ग्रामीण भाग जरी जवळ जवळ व्हिएतमिन्हच्या ताब्यात असला तरी त्यांचा प्रभाव त्या मानाने उत्तरेत जरा जास्त होता. दक्षिणेतील काओ-दाई आणि हो आ हा ओ या दोन जमातींच्या

काही विशिष्ट भागात वसाहती करून असलेल्या लोकांना फ्रेंचांनी वश करून घेतले होते व त्यांना काही सवलतीही दिल्या होत्या. त्यामुळे व्हिएतमिन्हचा जोर दक्षिणेला थोडा कमी वाटत होता.

सम्राट बाओ-दाईने सुरुवातीच्याच झटक्यात व्हिएतमिन्हच्या हाती अधिकृतरीत्या सत्ता देऊन हाँगकाँगला यःपलायन केले होते. आता व्हिएतमिन्ह आणि फ्रेंच या दोघांनीही त्याला तडजोडीसाठी पाचारण केले. अनेक बोलणी झाली. पण तडजोड काही झाली नाही. गनिमी युद्ध चालू होतेच.

अखेर फ्रेंचांनी बाओ दाईला हाताशी धरून त्याच्या झेंडयाखाली राज्य करण्याचे ठरविले आणि १ जुलै १९४९ रोजी फ्रेंचांच्या अनुमतीने बाओ दाईने व्हिएतनामच्या राज्याची घोषणा केली. कागदावर आता फ्रेंच अधिपत्याखाली तीन स्वतंत्र राज्ये इंडोचीनमध्ये प्रस्थापित झाली होती. कांबोडिया, लाओस आणि व्हिएतनाम. स्वातंत्र्य नावापुरते होते. फ्रेंच सैन्याचा व्हिएतनामी सैन्यावर ताबा कायम होता, फ्रेंच नागरिकांचे वेगळे उच्च अधिकार कायद्याने कायम होते, फ्रेंच आर्थिक हितसंबंध अजूनही कायद्याने रक्षिलेले होते. सत्तेचे हस्तांतर खऱ्या अर्थाने झालेच नव्हते.

सम्राट बाओ दाईचा सल्लागार होता एगो दिन्ह दियेम. बाओ दाईने याला १९३२ साली आपला गृहमंत्री नेमले होते आणि आपल्या सरकारला अधिक लोकशाही स्वरूप देण्याची कामगिरी त्याच्यावर सोपविली होती. फ्रेंचांच्या कारवायांमुळे ते शक्य झाले नाही म्हणून त्यावेळी दियेमने राजीनामा दिला होता.

बाओ दाईने आपल्या फ्रेंच प्रणित अशा नव्या सरकारात पुन्हा प्रधानमंत्री म्हणून येण्याचे त्याला पाचारण केले. पण दियेमने चक्क नकार दिला. ब्रिटिश कॉमनवेल्थमध्ये भारत आणि पाकिस्तान यांना ज्या दर्जाचे स्वातंत्र्य मिळाले तसे स्वातंत्र्य दियेमला हवे होते. दियेम हा त्या काळच्या प्रामाणिक राष्ट्रवाद्यांचा अग्रणी समजला जात होता. या राष्ट्रवाद्यांचा व्हिएतमिन्हच्या एकांगी स्वातंत्र्याला जेवढा विरोध होता तेवढाच, किंबहुना त्याहून जास्त बाओ दाईच्या बाहुली सरकारला होता. व्हिएतमिन्हने निदान स्वातंत्र्य स्वतःच्या ताकदीवर कमाविले होते. व्हिएतमिन्ह ही कम्युनिस्ट शक्ती असेल. पण ते स्वातंत्र्य खऱ्या कसाचे होते. उलट फ्रेंच वसाहतवाद कायम ठेवण्यासाठीच बाओ दाई सरकार निर्माण केले गेले होते. अमेरिकन आणि ब्रिटिश सरकारांनी मात्र या सरकारला तत्परतेने मान्यता दिली. अशा रीतीने व्हिएतनाममध्ये आता दोन वेगळी सरकारे निर्माण झाली.

दरम्यान गनिमी युद्ध सुरू होतेच. व्हिएतमिन्ह सैनिकांची संख्या फुगत चालली होती. फ्रेंच सैन्याचा त्रास वाढत होता. मोठया रस्त्यावर, रेल्वेमार्गांवर पावलोपावली घातपात होत होते. फ्रेंच तळांवर छोटे मोठे हल्ले होत होते. गनिमी तळ उद्ध्वस्त

करण्यासाठी फ्रेंच कारवाया चालू होत्याच. अमुक तळ नष्ट झाला, तमुक उद्ध्वस्त झाला, अशा बातम्याही येत होत्या. पण गनिमी सैन्याचे त्रास देणे काही संपत नव्हते. उलट वाढतच होते. व्हिएतमिन्हची खरी समस्या शस्त्रास्त्रांची होती. परिस्थिती योग्य होती. पण जवळ शस्त्रे नव्हती. अखेर १९४९ च्या शेवटाला चीनमधे कम्युनिस्ट सत्तेवर आल्यावर व्हिएतमिन्हला शस्त्रे मिळू लागली तेव्हा व्हिएतमिन्ह फौजांचा मार्ग खुला झाला, फ्रेंच फौजांना समोरासमोर तोंड देण्याची तयारी जनरल ग्यॉप करू लागला.

व्हिएतमिन्हने खरा आक्रमक पवित्रा १९५० साली घेतला. खरे म्हणजे अजूनही व्हिएतमिन्हचे लष्कर संख्येने कमीच होते. नियमित खड्या फौजेंमधील सैनिकसंख्या सुमारे साठ हजारांच्या आसपास असेल. याउलट फ्रेंच सैन्याची संख्या १ लाख ७५ हजार होती. यापैकी ५४,००० फ्रेंच होते. आणि ३०,००० उत्तर आफ्रिकन, १८,००० आफ्रिकन, २०,००० देशोदेशीचे आणि ५०,००० व्हिएतनामी होते. शिवाय ५,००० नौसैनिक आणि १०,००० हवाई सैनिक. गनिमी युद्धतंत्रापासून बचाव करण्यासाठी किमान एका गनिमास पाच सैनिक असे प्रमाण असावे असे फ्रेंचांचे प्रयत्न होते. परंतु फ्रेंच सैन्याची बरीचशी शक्ती रस्ते, रेलमार्ग, धरणे आणि शहरे यांच्या रक्षणासाठी ठिकठिकाणी बांधून ठेवावी लागत होती. केवळ बारा-पंधरा हजाराचे सैन्य वेगवान हालचालींसाठी उपयुक्त होते. याउलट व्हिएतमिन्हची सर्व खडी फौज कोठेही हालचाल करावयास मोकळी होती.

व्हिएतमिन्ह लष्कर जेव्हा आक्रमक पवित्रा घेऊन बड्या फ्रेंच तळांवर १९५० च्या मध्यास हल्ले करू लागले तेव्हाच फ्रेंचांनी वेळ ओळखून आपल्या सैन्यास अधिक गतिमानता आणावयास हवी होती. पण फ्रेंचांनी एकेका जागी घट्ट पाय रोवून संरक्षणात्मक पवित्रा घेण्याचे धोरण काही सोडले नाही. व्हिएतमिन्ह सैनिक मोठ्या संख्येने एकामागून एक मोठ्या फ्रेंच तळावर हल्ले करू लागले. जानेवारी १९५२ मध्ये व्हिएतमिन्ह तुकड्यांनी २०,००० शक्तीच्या होआ बिन्ह येथील एका फ्रेंच तळावर हल्ला करून फ्रेंचांना माघार घ्यायला लावली.

अशा परिस्थितीतच फ्रेंच जनरल नावारी याने दियेन बियेन फू येथील तळ लढविण्याचे ठरविले. हवाई छत्र्यांमधून सैनिक उतरवून तळाची संख्या वाढविली. आणि काहीही झाले तरी तेथून माघार घ्यायची नाही असे ठरविले.

चारी बाजूंनी टेकड्यांनी वेढल्या गेलेल्या या बशीच्या आकाराच्या तळा-

वर सुमारे वीस हजार फ्रेंच सैनिक जमले होते. ज्ञॉपच्या फौजांनी चारी बाजूंनी कोंडी करून तळाच्या सर्व नाड्या आखडल्या होत्या. मार्च १३, १९५४ ते मे ८ पर्यंत ही लढाई चालली. व्हिएतमिन्ह फौजांनी असा काही गळा आवळला होता की फ्रेंच निसटूच शकत नव्हते. घनघोर लढाईनंतर ज्ञॉपच्या काही तुकड्यांनी ७ मेला तळावरील प्रमुख लष्करी अधिकाऱ्यांच्या बराकीवर आपला झेंडा चढविला आणि ८ मेला दियेन बियेन फू पडले. सुमारे साडेसात हजार फ्रेंच सैनिक मृत्यूमुखी पडले होते आणि अकरा ते बारा हजार कैद झाले होते. बड्या लष्करी नेत्यांच्या आणि कडक शिस्तीच्या अशा अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी सुसज्ज युरोपियन फौजेचा अगदी उघड्यावरच्या लढाईत व्हिएत-नामसारख्या एका य:किंचित राष्ट्राच्या काडीचेही लष्करी शिक्षण नसलेल्या व परंपरा नसलेल्या अर्धशिक्षित फौजेने सपशेल पराभव केला.

वसाहती टिकविण्याचा फ्रेंचांचा उरला सुरला आवेशही गळाला. आता लढण्यात अर्थ नव्हता. लढाई संपली आणि फ्रान्सने व्हिएतमिन्हशी बोलणीही सुरू केली. व्हिएतनामच्या इतिहासात दियेन बियेन फू च्या या लढाईला यामुळेच महत्त्व आहे. दियेन बियेन फू च्या पराभवामुळे व्हिएतमिन्हने फ्रेंच्यांच्या नीतिधैर्यावर शेवटचा घणा-घाती घाव घातला आणि त्यातूनच पुढे जिनिव्हा कराराचा जन्म झाला.

प्रत्यक्ष जिनीव्हा करार आणि त्याच्या परिणामांकडे वळण्यापूर्वी अमेरिकन सरकार या आधीपासूनच कसे व्हिएतनाममध्ये स्वत:ला हळूहळू गुंतवून घेऊ लागले होते हेही जाता जाता ध्यानात येते. फ्रेंच प्रधानमंत्री जोसेफ लानियेल याने १९५३ साली फ्रेंच युनियनमधील इंडो-चीन राष्ट्रांना युनियनच्या चौकटीतच पण पूर्ण स्वातंत्र्य देण्याची कल्पना मांडली. ही कल्पना अमेरिकन सरकारला एकदम आवडली. या 'लोकशाहीवादी' कल्पनेआड व्हिएतमिन्ह आडवे येत होते. लगेच फ्रान्सची वसाहतवादी ही भूमिका जाऊन कम्युनिस्टांविरुद्ध लोकशाही मूल्यासाठी लढणारे राष्ट्र असा बदल अमेरिकन दृष्टीकोनात झाला आणि अशा युद्धाला मदत करणे हे तर अमेरिकेचे कर्तव्यच होते. त्यामुळे फ्रेंचांना मोठ्या प्रमाणावर अमेरिका मदत देऊ लागली आणि १९५३–५४ मध्ये तर फ्रेंचांच्या व्हिएतनाम युद्धाचा जवळ जवळ तीन-चतुर्थांश खर्च अमेरिका सोसत होती. दियेन बियेन फू येथील वेढा उठत नाही असे पाहिल्या-वर अमेरिकन विमानांनी तीव्र हवाई बॉंबिंग करून वेढा फोडावा असे मत अमेरिकन तज्ज्ञांनी दिले होते. पण त्यावेळच्या राजकीय मतभेदांमुळे अमेरिकेला प्रत्यक्ष या युद्धात गुंतवणारा हल्ला काही झाला नाही आणि दियेन बियेन फू पडले.

जिनिव्हा करारातून जे काही बाहेर पडले त्याची पार्श्वभूमी अशी होती. फ्रान्सने हातपाय गाळलेले अमेरिकेला

मंजूर नव्हते. कम्युनिस्ट विरोधी युद्धात भाग घेण्याची अमेरिकेची उत्सुकता होती आणि जगातील इतरही राष्ट्रांना अमेरिकेने या युद्धात उतरण्याचे आवाहन केले होते ब्रिटीशांना मात्र व्हिएतनामची फाळणी करून हा प्रश्न मिटवून टाकावा असे वाटत होते. अमेरिकेचा फाळणीला सक्त विरोध होता. या भागात कम्युनिस्ट सदृश्य राजवट होताच कामा नये अशी अमेरिकेची भूमिका होती आणि तिचा भर लष्करी कारवाई पुढे जोरदार चालू ठेवण्यावर होता. त्यावेळी अमेरिकन लष्करी सल्लागार अलेन डलेस हा तर युद्ध चालूच ठेवण्याचा जोरदार आग्रह करीत होता. फ्रान्सने अमेरिकेच्या मदतीने त्यावेळी युद्ध पुढे चालू ठेवले असते तर उत्तर व्हिएतनामचा केव्हाच निकाल लागला असता असे अजूनही अनेक अमेरिकन्स मानतात. असो.

तर अशा अमेरिकन विरोधात जिनीव्हाची बोलणी सुरू झाली. दियेन बियेन फू नंतर या बोलण्यांना गती मिळाली. खरे म्हणजे जनरल झॉप आणि व्हिएतमिन्हच्या अनेक नेत्यांची बोलणी करण्याची इच्छा नव्हती. दियेन बियेन फू मध्ये त्यांनी फ्रेंचांवर जोरदार मानसिक विजय मिळविला होता पचाहत्तर टक्के ग्रामीण भाग तर त्यांच्याच ताब्यात होता. आता आणखी काही धक्के देण्याचा अवकाश की सबंध व्हिएतनाम ताब्यात येणार होता. परंतु सबुरीचा सल्ला देऊन व्हिएतमिन्हला जिनीव्हा बोलण्यांना पाठविले ते हो ची मिन्ह ने.

जिनीव्हाचे फलित असे व्हिएतनाममधील युद्ध ताबडतोब थांबवावे. अक्षांश सतरावर देशाची तात्पुरती फाळणी करून उत्तरेला डेमॉक्रटिक रिपब्लीक ऑफ व्हिएतनाम आणि दक्षिणेला स्टेट ऑफ व्हिएतनाम यांनी कारभार पहावा. जुलै १९५६ मध्ये आंतरराष्ट्रीय पाहणीखाली सबंध देशभर खुल्या निवडणुका करून सत्तारूढ कोण असावे याचा निकाल लावावा. बाकी युद्धबंदी कशी असावी, कशी पाळावी, फाळणी कशी करावी, एकमेकांनी सैन्ये कशी काढून घ्यावी निवडणुका कशा व्हाव्यात याचे तपशील करारात होते. अमेरिका बोलण्यांमधे सामील होती, पण करारावर सही केली नाही. फाळणीच्या करारामुळे व्हिएतमिन्हच्या प्रत्यक्ष प्रशासकीय ताब्यातील २० टक्के भाग त्यांना सोडावा लागणार होता. केवळ होच्या आग्रहाने व्हिएतमिन्हने त्याला मान्यता दिली आणि जुलै २१, १९५४ रोजी करारावर सह्या झाल्या. व्हिएतनामचे दोन तुकडे झाले, दोन वर्षाच्या आत निवडणुका घेऊन व्हिएतनाम एक होणार हे बरेच लोक गृहीत धरून होते. पण तसे व्हायचेच नव्हते.

करारावर सही ठोकली आणि फ्रान्सने व्हिएतनाममधून आपले अंग पूर्णपणे काढून घ्यायचे ठरविले. दक्षिण व्हिएतनामला संपूर्ण स्वातंत्र्य देऊन फ्रान्सने चंबूगबाळे आवरून व्हिएतनाममधून काढता पाय घेतला. लवकरच दक्षिण व्हिएतनामच्या क्षितीजावर न्गो दिन्ह दियेमचा उदय झाला आणि

अध्यक्ष या नात्याने त्याने दक्षिण व्हिएतनामची राजधानी सायगाव येथे राज्याची सूत्रे हाती घेतली.

सुरुवातीच्या काळात दियेमला खूप मान होता. तो एका जुन्या संपन्न घराण्यातून आला होता. भाविक कॅथॉलिक होता आणि मुख्य म्हणजे कट्टर कम्युनिस्ट द्वेष्टा होता. हो ची मिन्हने आपल्या राष्ट्रीय आघाडीत १९४५ साली त्याला पाचारण केले होते पण त्याने नकार दिला होता. बराचसा काळ त्याने व्हिएतनामच्या बाहेरच काढला होता. व्हिएतनामच्या अलीकडच्या स्वातंत्र्ययुद्धाशी त्याचा काही सबंध नव्हता. गेली दोन वर्षे तर त्याने न्यूयॉर्कच्या एका कॅथॉलिक धर्मगृहात काढली होती.

राज्यावर येताच दियेमने आपला भाऊ आणि त्याची बायको मादाम न्हू यांच्या कलाने कारभार पाहण्यास सुरुवात केली. त्यावेळच्या व्हिएतनामी समस्यांची त्याला पुरेशी माहिती नव्हती. परमेश्वर कॅथॉलिकांच्या बाजूला आहे अशी त्याची पक्की श्रद्धा होती. बिशप्स् कार्डिनल्स् यांना भेटणे, पाश्चात्य प्रतिनिधींना भेटी देऊन त्यांच्याशी आंतरराष्ट्रीय व कम्युनिस्ट विरोधी राजकारणावर चर्चा करणे आणि सतत पोलीसांच्या पहाऱ्यात राहणे हाच त्याचा उद्योग. लोकांमधे मिसळणे तर त्याला मुळीच आवडत नसे. एका पाश्चात्य पत्रकाराने त्याचे वर्णन 'पाश्चात्यांनी बिघडविलेला देशभक्त' असे केले होते. दियेम राज्यावर येताच जनमतकौल होणार नाही हे उघड झाले. फाळणी झाली नाही तरच निवडणुका व्हाव्यात अशी दियेमची भूमिका होती.

उत्तर व्हिएतनाम जरी या कौलाबद्दल उत्सुकता दाखवीत असला तरी या निवडणुका होण्याची कम्युनिस्टांचीही मनापासून इच्छा होती की नाही याबद्दल संशय घेतला जातो. पण त्यावेळची परिस्थिती वेगळी होती. निवडणुका घेतल्या असत्या तर बहुसंख्यांनी उत्तर व्हिएतनामच्या बाजूने कौल दिला असता असे मानले जाते. म्हणून उत्तर व्हिएतनाम उत्सुक होते आणि न्गो दिन्ह दियेम निवडणुका हाणून पाडण्यास उत्सुक होता असे दिसते.

फाळणीनंतर खरे म्हणजे लोकसंख्येची अदलाबदल होण्याचे कारण नव्हते. पण फाळणी जाहीर होताच आतापर्यंत फ्रेंचांच्या आश्रयाखाली राहून सतत स्वातंत्र्यविरोधी भूमिका घेणाऱ्यांचे धाबे दणाणले. फ्रेंच वसाहतवाद हा ब्रिटिशांच्या प्रमाणे तेवढा उदार नव्हता. तो अधिक व्यक्तिनिष्ठ, थोडा क्रूर आणि दडपशाहीच्या साधनावर अवलंबून होता. ब्रिटीश भारतातील पोलीस, लष्कर अथवा सनदी अधिकारी हे तशा अर्थाने स्वातंत्र्य लढ्याच्या विरोधात खूप खोल गुंतले नव्हते. आणि त्या अर्थाने ब्रिटीशांची दडपशाही सुद्धा तेवढी भयावह नव्हती. याउलट परिस्थिती फ्रेंच व्हिएतनाममधे होती. फ्रेंच राज्यातील व्हिएतनामी पोलीस,

अधिकारी व लष्कर यांना फ्रेंचांच्या बाजूने दडपशाहीत भाग घ्यावा लागे. व्हिएतनामी सधन वर्गाला देखील फ्रेंच वसाहतीवरील आपली निष्ठा जाहीर करावी लागे. त्यामुळे व्हिएतनाममध्ये असा एक विशिष्ठ हितसंबंधीय वर्ग निर्माण झाला होता की ज्याची निष्ठा फ्रेंचांना वाहिली होती, ज्याने मनोमन व्हिएतनामी सामान्य जनतेच्या दडपशाहीत भाग घेतला होता, आणि ज्यांचे अधिकार व हित स्वातंत्र्यलढयाला विरोध करण्यातच सुरक्षित राहणार होते. त्यामुळे जिनीव्हा करारानंतर या वर्गाचे अस्तित्वच धोक्यात आले. व्हिएतनामीपेक्षा दक्षिण व्हिएतनामचे सरकार त्यांना परवडणार होते. कारण ते फ्रेंचांच्या संगतीनेच चालविले जात होते. फ्रेंचांची आणि अमेरिकनांची तेथे बूज राखली जाणार होती.

त्यामुळे फाळणी जाहीर होताच असा सगळा वर्ग दक्षिणेला आला. बरेच कॅथॉलिकही आले. फ्रेंच सैन्य उत्तर व्हिएतनाममधून पूर्णपणे काढून घेण्याआधी या वर्गाने दक्षिणेत दियेमच्या आश्रयाला प्रस्थान ठेवले. व्हिएतमिन्हच्या कम्युनिस्ट धोरणांना घाबरून येणारे बडे जमीनदार आणि व्यापारीही होते.

पूर्वीच्या फ्रेंच राज्यातील असा पिळवणूक करणारा भक्षक वर्गच दियेमच्या राजवटीत व्हिएतनामी जनतेचा 'रक्षक' बनला. तेच पोलीस अधिकारी, तेच लष्कर. सुरुवातीच्या काळात दियेमच्या राजवटीला शांतता लाभली ती यांच अधिकाऱ्यांच्या सहाय्याने आणि पुढे त्याची लोकप्रियता ओसरू लागली तीही याच कारणामुळे.

या उलट होती मिन्हच्या व्हिएतमिन्ह राजवटीचे. व्हिएतमिन्ह सैनिकांनी आणि अधिकाऱ्यांनी गनिमी युद्धाच्या काळात आपल्या वर्तनाने आपला चांगुलपणा आणि लोकहितवादी धोरण पटवून दिले होते. व्हिएतमिन्हचा कारभार सुरू झाल्यावर अनेक साम्यवादी धोरणे अमलात आली. राजवटीला विरोध करणाऱ्या पूर्वीच्या अनेक फ्रेंच पित्त्यांना व्हिएतमिन्हने ठार केल्याचे अमेरिकन वृत्तांत आहेत. परंतु व्हिएतमिन्हच्या प्रामाणिक आणि लोकानुवर्ती धोरणाबद्दल कुणीच संशय घेऊ शकत नव्हते. शिवाय नगुयेन ऐ कोस ऊर्फ झे ची मिन्हचे नेतृत्व होते. यापूर्वीच हो जवळ जवळ महात्मा पदाला पोचला होता.

एवढे असूनही दियेमच्या दक्षिण व्हिएतनाममधील राजवटीला सर्व गटांचा पाठिंबा मिळाला असता. कारण काही शहरी वर्ग निश्चितच असा होता की ज्यांना कम्युनिस्ट नको होते. दियेमने आपली राजवट सचोटीने, धडाडीने आणि कल्याणकारी पावले टाकीत चालविली असती तर हे सहज शक्य

## दियेम : पाश्चात्यांनी बिघडवलेला देशभक्त

झाले असते. पण स्वत: प्रामाणिक आणि सचोटीपूर्ण असूनही दियेमला आपल्या राज्ययंत्रणेत हे गुण आणता आले नाही. फ्रेंचांच्या वसाहती शासनयंत्रणेत आणि दियेमच्या राजवटीत सामान्यांना तरी काहीच फरक जाणवला नाही. तीच दडपशाही, तीच क्रूर वागणूक, तीच लाचलुचपत, तीच वशिलेबाजी आणि तीच हितसंबंधियांना संरक्षण देणारी धोरणे. फरक एवढाच की पूर्वीचे दडपेगिरी करणारे अधिकारी फ्रेंच होते आणि आता त्यांच्याजागी व्हिएतनामी आले होते. म्हणून जरा असंस्कृत होते. त्यामुळे परिस्थिती अधिकच वाईट झाली होती. आणि दियेमच्या आत्यंतिक कम्युनिस्ट द्वेषामुळे दियेम अमेरिकेचा लाडका 'बनत चालला होता. आणि हळू हळू अमेरिकन हातातील खेळणे बनू लागला होता.

आणि दियेम जरी अध्यक्ष असला तरी राजवटीची बहुतेक सूत्रे तो आपला भाऊ नगो दिन्ह न्हू आणि मादाम न्हू यांच्या करवी हालवीत राहिला. याचा परिणाम असा झाला की वशिलेबाजीला भयानक ऊत आला. दियेमच्या कुटुंबाशी एकनिष्ठ असलेल्या माणसालाच वरिष्ठ जागा मिळू लागल्या. दियेमला नकळतच बऱ्याचशा गोष्टी न्हू जोडपे करू लागले. कोणतीही गोष्ट दियेमला कळायची ती या जोडप्याच्या माध्यमातूनच. दियेम जणू या जोडप्याने बंदिस्त करून टाकला होता. सारी लष्करी आणि पोलिसी यंत्रणा या जोडप्याच्या दबावाखाली राहू लागली. लष्करी आणि पोलिसी वरिष्ठ जागा दियेम म्हणजेच न्हू जोडप्यांच्या नातेवाईकांनाच मिळू लागल्या. सारे दक्षिण व्हिएतनाम म्हणजेच दियेम कुटुंबाचे चरायचे कुरणच बनून गेले. न्हू व दियेम दोघेही कॅथॉलिकांना उत्तेजन देणारे. त्यामुळे कॅथॉलिकांव्यतिरिक्त इतर जमातींना दुय्यम दर्जाची वागणूक मिळत असल्यासारखे वाटू लागले. या सर्व गोष्टीमुळेच दियेमचा शेवट जवळ आला.

दरम्यान दियेमने लोकमत कौलविषयक जिनीव्हा कराराला आपण बांधलो गेले नसल्याचे जाहीर केले होतेच. जिनीव्हा कराराप्रमाणे व्हिएतमिन्ह आणि फ्रेंच व्हिएतनाम यांनी एकमेकांची सैन्य एकमेकांच्या प्रदेशातून परत घेण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे फ्रेंच फौजा परत आल्या. व्हिएतमिन्हचे खडे सैन्यही उत्तरेत परतले. पण जे शेतकरी स्थानिक फौजांमधून लढले त्यांचे काय ? ते आपआपल्याच जागी कायम राहिले. व्हिएतनामची फाळणी त्यांना मान्य नव्हती. दियेमने जनमत कौल घेण्यास विरोध करताच या लोकांनी व्हिएतनामच्या एकीकरणासाठी नॅशनल लिबरेशन फ्रंटची स्थापना केली. त्यातूनच व्हिएतकाँगचा जन्म झाला.

दियेमची धोरणे स्पष्ट होताच या फ्रंटने आणि व्हिएतकाँगने चळवळींना प्रारंभ केला. चळवळीचे लक्ष्य तेच होते. खेड्यापाड्यातील अधिकाऱ्यांना बेजार करून आपले कार्यक्षेत्र वाढवीत राहणे.

अशा रीतीने १९५४ साली कराराप्रमाणे जरी शांतता प्रस्थापित झाली

असली तरी कुरबुरी, चकमकी चालूच होत्या. दियेमची धोरणे जसजशी स्पष्ट होऊ लागली तसतशा या चकमकी वाढू लागल्या. आणि या चकमकींचे स्वरूप पाहता फार काळ आपण गादीवर राहू शकणार नाही हे लक्षात येताच दियेमने अमेरिकेकडे मदतीसाठी टाहो फोडला. अमेरिका तर आधीच उत्सुक होती. त्यांनी तर फ्रेंचांनाही मदत करण्याची तयारी दर्शविली होती. दियेमने मदतीची हाक देताच कम्युनिस्ट आक्रमणापासून 'स्वतंत्र' जगाच्या सीमा रोखण्याच्या धर्मसदृश्य ईर्षेने अमेरिकन अध्यक्ष आयसेनहॉवर धावून आले. आणि अशा रीतीने अमेरिकेचा व्हिएतनाममधे प्रत्यक्ष प्रवेश झाला.

दियेमच्या मदतीची याचना करणाऱ्या पत्राला आयसेनहॉवर यांनी ऑक्टोबर २३, १९५४ रोजी उत्तर पाठवून घातपाताविरोधी कारवायात मदत करण्याचे आश्वासन दिले. ही पहिली अमेरिकेची गुंतवणूक. व्हिएतनाममध्ये राजदूत म्हणून राहून आलेले जनरल मॅक्सवेल टेलर यांनी गेल्याच महिन्यात एका अमेरिकन पाक्षिकाला मुलाखत देताना सांगितले की या मदतीचे आश्वासन देणाऱ्या पत्रावर सही करण्यापूर्वी आयसेनहॉवर यांनी मला विचारले असते तर मी सांगितले असते आधी विचार करा. व्हिएतनाममधील खरी परिस्थिती न पाहता स्वतःला बांधून घेऊ नका. अमेरिकेने केलेली ही पहिली चूक.

आपल्या मदतीच्या आश्वासनाला जागून अमेरिकन शासनाने लगेच म्हणजे १९५५ च्या सुरुवातीला व्हिएतनाममधे लष्करी सल्लागार पाठविले. दक्षिण व्हिएतनामी सैन्याला प्रशिक्षण देऊन गनिमी युद्धास शस्त्रसज्ज करावयाचे अशी त्यांची कामगिरी होती.

तेव्हापासून अमेरिकन मदतीचा प्रचंड ओघ दक्षिण व्हिएतनाममधे वाहू लागला तो दिवसेंदिवस वाढतच गेला. अमेरिकन शस्त्रास्त्रे प्रचंड प्रमाणावर येऊ लागली. केवळ लष्करातच नव्हे तर इतर शासन यंत्रणेतही अमेरिकन सल्लागार मोठ्या प्रमाणावर येऊ लागले. सायगाव, दानांग, इत्यादी दक्षिण व्हिएतनामी शहरांमधे अमेरिकन सल्लागार मोठ्या प्रमाणावर दिसू लागले. अमेरिकन शांतीसेना मोठ्या प्रमाणावर समाजकल्याणाची छोटी मोठी कामे हाती घेऊ लागली. अर्थातच अमेरिकेच्या सर्वस्थित सी. आय. ए. चाही संचार वाढला.

व्हिएतकाँगच्या गनिमी कारवाया वाढू लागल्या तसे अमेरिकन सल्लागारांचे प्रमाणही वाढू लागले. गनिमी कारवायांमध्ये सल्लागार बळी पडू लागले तेव्हा तर अमेरिकेचे पित्त अधिकच खवळले. आमच्या शक्तीनुसार जास्तीत जास्त मदत तुम्हांस देऊन कम्युनिस्ट आक्रमण मोडून काढण्यास साह्य करू असा आश्वासनाचा पुनरुच्चार आयसेनहॉवर यांनी केला.

दक्षिण व्हिएतनामी सैन्यामध्ये अमेरिकन सल्लागारांची उपस्थिती ही गोष्ट तर व्हिएतकाँगना प्रचाराची

# टाऽऽटा, मी ऑफीसला जाऽऽतो!

हे मुलांचं लुटुपुटीचं जग! आणि तुमचं आमचं स्वप्न!
ते साकार करण्यासाठी तुमच्या मुलाला योग्य ते उच्च शिक्षण मिळणं आवश्यक आहे.
त्यासाठी आजपासूनच थोडी थोडी बचत करायला हवी. अशी तरतूद करण्याचा एकमेव निश्चित मार्ग म्हणजे विमा!
ठराविक वेळी ठरलेले पैसे तुमच्या मुलाला मिळत रहातील व त्याच्या शिक्षणात कधीही खंड पडणार नाही, मग तुम्ही असा वा नसा!



*आयुर्विम्याला पर्याय नाही !*

विम्याच्या अनेक योजना आहेत.
लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनचा एजंट
आपल्याला योग्य
अशी विमा योजना सुचवील.
आजच त्याला भेटा.

PRATIBHA 1510-15-MAR

पर्वणीच मिळवून देणारी होती. व्हिएतकाँगचा प्रचार प्रथमपासून असाच होता की आपणास अद्याप स्वातंत्र्य मिळालेले नाही. फ्रेंच अंमल जाऊन त्याऐवजी अमेरिकन अधिपत्याखालील केवळ नामधारी व्हिएतनामी राजवट आली आहे. खरे राज्य आहे अमेरिकनांचे. परकीय. या परकीयांना आपल्या देशातून हाकून दिले पाहिजे. बड्या जमीनदारांना ठार मारून त्यांची जमीन लहान शेतकऱ्यात वाटून देणे, कर गोळा करणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना मारून शेतकऱ्यांना करमुक्त करणे, मोफत कपडे वाटणे आणि शिक्षण देणे याबरोबरच अमेरिकन आक्रमण हाही व्हिएतकाँगचा प्रचाराचाच एक भाग होता.

त्यामुळे खेड्यापाड्यांमधे व्हिएतकाँग गनीमांच्या शोधात जाणाऱ्या व्हिएतनामी सैनिकांबरोबर गोरे अमेरिकन सैनिक पाहिले की खेडूतांना व्हिएतकाँग सैनिकांचे बोलणे खरेच वाटू लागे. आणि ते खरेच होते. व्हिएतनाममधे या अमेरिकनांचे काय काम ? हे उपरे इथे कशाला आले ? या मनस्थितीमुळे उलट व्हिएतकाँगचा जोर वाढतच होता. दियेम राजवटीचा भ्रष्टाचारही व्हिएतकाँगला उत्तेजन देणाराच होता.

इकडे १९६१ मधे अमेरिकन अध्यक्षपदावर केनेडी आले. केनेडी तर स्वतंत्र जगाचा उद्गाता. राष्ट्राध्यक्ष होण्याच्या आधीपासून केनेडीचे व्हिएतनामवर लक्ष होते. अगदी सिनेटर असताना १९५६ मधे केनेडीने व्हिएतनाम मित्रमंडळात न्यूयॉर्क येथे व्हिएतनामवर भाषण केले होते. त्यातच त्यांचे व्हिएतनामविषयक धोरण स्पष्ट झाले. केनेडीने म्हटले होते, 'व्हिएतनाम म्हणजे आग्नेय आशियातील 'स्वतंत्र' जगाच्या पायाचा दगड, कमानीतील वजन तोलणारा दगड, धरणातील छिद्र बुजविणारे बोट.' आशियातील लोकशाहीचे चाचणी मैदान म्हणजे व्हिएतनाम. या व्हिएतनामला आपण बुडू देता कामा नये. आशियातील अमेरिकन जबाबदारी आणि जिद्द यांचीही चाचणी व्हिएतनाममधे होणार आहे. अमेरिकन जीवित आणि अमेरिकन डॉलर्स यांमधे या परीक्षेची किंमत मोजावी लागली तरी हरकत नाही; असे आपले मत केनेडीने व्यक्त केले होते. केनेडी म्हणाले," 'आपण व्हिएतनामला क्रांती दिली पाहिजे. आपली क्रांती ही राजकीय, आर्थिक आणि सामाजिक असली पाहिजे आणि ती सर्व दृष्टचा कम्युनिस्ट क्रांतीपेक्षा सरस असली पाहिजे. ती अधिक लोकशाहीवादी, अधिक शांततामय आणि अधिक स्थानिक असायला हवी. अशा क्रांतीसाठी अमेरिका आणि व्हिएतनाम या दोघांनाही आपली बरीच शक्ती घालावी लागेल आणि आपल्या दृष्टीने ही क्रांती म्हणजे काही धर्मादाय देणगी नव्हे की व्यापारी देवाण-घेवाण नव्हे. सर्व जगभराचे स्वातंत्र्य सुरक्षित राखण्यासाठी आपण ती किंमत द्यायची आहे.'

केनेडी सिनेटर असतानाच त्यांनी काढलेले हे उद्गार हे अधिकृत अमेरिकन धोरणाचे यथायोग्य प्रतिबिंब

होय. आत्यंतिक कम्युनिस्ट विरोधाचे ते दिवस होते. शीतयुद्ध त्यावेळी शीगेला पोचले होते आणि व्हिएतनाममधून घुसून सबंध आशिया कम्युनिस्ट चीन पादाक्रांत करील अशी भीती अमेरिकनांना वाटत होती. म्हणून स्वतंत्र जगाच्या रक्षणाची ही भाषा. अजूनही अमेरिकन सरकारची हीच भूमिका असली तरी साऱ्या परिस्थितीत एवढी गुंतागुंत झाली आहे की, 'स्वतंत्र' जगाच्या रक्षणाचे केनेडींचे हे उद्गार लाज वाटल्याविना कोणी अमेरिकन उद्धृत करणार नाही. अमेरिकन जनतेलाही जेव्हा या 'स्वतंत्र' जगाच्या रक्षणासाठी काय काय चालू आहे याचा पत्ता लागला तेव्हा तिथेही या युद्धाविरुद्ध निदर्शने होऊ लागली.

तर केनेडींनी अध्यक्षपदावर येताच मे १९६१मध्ये जाहीर केले की व्हिएतकाँगचा त्रास असाच चालू राहिला तर व्हिएतनाममध्ये आम्हाला प्रत्यक्ष लढाऊ सैनिक पाठवावे लागतील. बरोबर डिसेंबरमध्ये त्याच वर्षी हेलिकॉप्टर्सची दोन युनिट्स् व्हिएतनाम भूमीवर गनिमी सैनिकांशी लढण्यासाठी पाठविली. हा वेळपर्यंत अमेरिकनांची भूमिका फक्त सल्लागारांची होती. आता ते लढण्यात भाग घेऊ लागले. डिसेंबर ६२ मध्ये व्हिएतनाममधील सल्लागारांची आणि हेलिकॉप्टर युनिट्स्मधून लढणाऱ्या अमेरिकनांची संख्या ११,३०० वर पोचली आणि या वर्षभरात अमेरिकन मदतीचे प्रमाण सुमारे चारशे कोटी रुपयांवर पोचले. फुटलेल्या धरणातून पाण्याचा ओघ वाढतच जावा त्याप्रमाणे अमेरिकन मदतीचा हा लोंढा तेव्हापासून दिवसेंदिवस वाढतच जाऊन सबंध दक्षिण व्हिएतनामवर या अमेरिकन आर्थिक वर्चस्वाची छाया पसरली. आज सबंध दक्षिण व्हिएतनामभर अमेरिकन गाड्या, अमेरिकन सैनिकांनी फोडून टाकलेले अन्नाचे हवाबंद डबे, अमेरिकन सिगरेट्स् आणि अमेरिकनांपासून व्हिएतनामी स्त्रियांना बेकायदेशीर झालेली मुले सर्वत्र पसरली आहेत. त्याची सुरुवात अशी झाली होती. सुरुवात अमेरिकन सल्लागारांच्या आगमनाने झाली आणि १९६९ साली सर्व अमेरिकन सैनिकांची व्हिएतनामधील संख्या साडेपाच लाखांपर्यंत पोचलं. हिंदी व प्रशांत महासागरात संचार करणाऱ्या नाविक काफिल्यांवरील सैनिकांची आणि ग्वामसारख्या द्वीपांवरून सतत हवाई हल्ले करणाऱ्या वैमानिकांची संख्या यात मोजली नाही.

पण हे फारच पुढचे झाले. तिकडे अमेरिकेतून व्हिएतनाममध्ये सैनिक पाठविण्याच्या गोष्टी केनेडी बोलत होते तेव्हा इकडे व्हिएतनाममधे अध्यक्ष दियेम याची परिस्थिती काही फारशी हेवा करण्यासारखी नव्हती. सारी सत्ता लष्करावरच अवलंबून होती. त्यामुळे लष्करी अधिकाऱ्यांचे स्तोम वाढत होते. कधी लष्करी क्रांती होऊन आपला गळा कापला जाईल याचा नियम नव्हता. अनेकदा त्याला अगदी हातातोंडाशी आलेले बंड मोडून काढावे लागत होते. आर्मी कमांडर्सना सतत

एका जागी कायम न ठेवता सतत फिरत ठेवणे, एकाच वेळी फार मोठ्या लष्कराचे सायगावमधे एकत्रीकरण होऊ न देणे, जास्त महत्त्वाकांक्षी जनरल्स्ना निवृत्त करवून परदेशी राजदूत म्हणून पाठविणे अशा मार्गांनी दियेम आपली सत्ता टिकवून होता. अर्थातच भाऊ न्हू आणि भावजय मादाम न्हू यांचाही या कार्यात वाटा होताच. पण या सर्वांनाच सत्ता टिकविण्यापलीकडे काही दिसत नव्हते आणि ज्या 'स्वतंत्र' जगाच्या रक्षणासाठी अमेरिकन अध्यक्षांनी शपथ घेतली होती त्या जगाची तर चाहूलही कुठे दिसत नव्हती.

डेव्हिड हलबर्स्टॅम नावाच्या न्यूयॉर्क टाईम्स्च्या वार्ताहराने आपल्या 'मेकिंग ऑफ अ क्वागमायर' या पुस्तकात दियेमच्या व्हिएतनामचे अतिशय परखड वर्णन केले आहे—पाहता पाहता दक्षिण व्हिएतनाम हे सर्व दृष्टींनी आणि सर्व हेतूंनी असे कम्युनिस्ट-सदृश्य राष्ट्र बनले की ज्यात खरा कम्युनिझम नव्हता पण त्याची बाह्य लक्षणे तेवढी होती. आधुनिक हुकूमशाही राष्ट्रात असलेली सर्व बंधने, सर्व प्रकारची दडपशाही आणि वैफल्य आणणारे सर्व कटु प्रकार तिथे होते. परंतु कम्युनिझममुळे उत्तर व्हिएतनाममधे जो गतिमानता, कार्यक्षमता आणि ध्येयासक्ती निर्माण झाली होती तिचा मात्र लवलेशही दक्षिणेत आढळत नव्हता. ते केवळ पोलीस राज्य तर होतेच. पण गोंधळाचेही राज्य होते. अकार्यक्षमता हा तेथील कायदा होता.

न्यूयॉर्क टाईम्स्सारख्या जबाबदार अमेरिकन वृत्तपत्राच्या वार्ताहराने प्रत्यक्ष व्हिएतनाममधून पाठविलेला हा मजकूर आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

हलबर्सटॅमने न्हू दांपत्याच्या कारवायांचेही वर्णन केले. तो म्हणतो—न्हू च्या ताब्यात एवढ्या गोष्टी होत्या की गनिमी युद्ध संपले की व्हिएतनाममधील सर्वात शक्तीमान व्यक्ती न्हूच ठरला असता. दियेम आणि न्हू दांपत्य असे त्रिकूट हे एकमेवाद्वितीय व विचित्र राज्य चालवीत होते. निवडणुका होत होत्या; परंतु विरोधी पक्षीय उमेदवारांना उभे राहण्यास बंदी होती. विधानमंडळ होते; पण त्याची भूमिका शुद्ध रबर स्टॅम्पची. सायगाव मधे मंत्रीमंडळही होते. पण मंत्रीगणांच्या हाती एक तर सत्ता काहीही नव्हती व जबाबदारी नव्हती आणि प्रत्येक मंत्री मादाम न्हू ने घातलेल्या जीवाच्या धाकात होता——

वार्ताहर पुढे म्हणतो——दक्षिण व्हिएतनाममधील निवडणुकांच्या निकालांकडे दृष्टी टाकली असती तर उत्तरेतील कम्युनिस्टही झीट येऊन पडले असते. सन १९६३ च्या विधानमंडळ निवडणुकीमधे एका मतदारसंघातील ९९·९८ टक्के मते दियेमला

## अमेरिकन गाड्या, अन्नाचे डबे, सिगरेट्स, मुले....

पडली तर दुसऱ्या एका संपूर्णपणे व्हिएतकाँगच्या ताब्यात असलेल्या मतदारसंघातील ९९·४ टक्के मते येथील उमेदवार मादाम न्हू हिने मिळविली होती.—अशा होत्या या 'स्वतंत्र' जगातील निवडणुका.

दियेमला अमेरिकेचा संपूर्ण पाठिंबा होता. पण खुद्द दियेमलाच अमेरिकेबद्दल विश्वास नव्हता. त्याच्या मनात अमेरिकेच्या हेतूबद्दल संशय होता. अमेरिका केव्हा आपल्याला फेकून राजवट बदलेल याची त्याला खात्री नव्हती आणि हा त्याचा संशय बरोबर होता. जोपर्यंत दियेमचे ठीक चालू आहे तोवरच त्याला अमेरिकेचा पाठिंबा मिळणार होता. दियेम पक्का बेरकी होता. त्यामुळे अमेरिकन मदत घेऊनही तो अमेरिकेला दोन हात दूरच ठेवू पाहत होता. अमेरिकेला दियेमशिवाय दुसरा पर्याय नव्हता. सुरुवातीच्या काळात दियेमने आपले कर्तृत्व दाखविलेही. पण पुढे पुढे दियेम न्हू दांपत्याच्या हाती गेल्यावर अमेरिकेची स्थिती मोठी चमत्कारिक होऊ लागली. युद्ध ठीक चालू आहे. अमुक ठिकाणी इतके व्हिएतकाँग सैनिक मारले, तमुक ठिकाणचे खेडे ताब्यात मिळवले वगैरे खोटेच रिपोर्टस् दियेमला जात आणि त्याचा विश्वास बसे. त्यावेळी व्हिएतनाममध्ये असलेल्या कितीतरी अमेरिकन वार्ताहरांनी दियेमचे खरे स्वरूप उघडकीस आणण्याचा प्रयत्न केला पण अमेरिकन सरकार मख्ख बसून होते. दियेमला वाढता पाठिंबा होता त्यामुळे व्हिएतनाममध्ये दियेमबरोबर अमेरिकेचीही लोकप्रियता घटू लागली होती. हलबर्सटॅमने आपण दियेमच्या विरुद्ध आणि अमेरिकन धोरणाच्या विरुद्ध न्यूयॉर्क टाईम्स्ला वार्तापत्रे पाठवीत होतो म्हणून केनेडीने टाईम्स्च्या संपादकांना आपणास काढून टाकावे म्हणून कसा दम भरला परंतु संपादकांनीही घट्ट राहून कशी दाद दिली नाही याचा किस्सा सांगितला आहे. तसेच टाईम या ख्यातनाम साप्ताहिकाच्या सायगाव येथील वार्ताहरांनी खूप परिश्रम आणि सखोल अभ्यास करून पाठविलेला वार्तालेख सरकारी धोरणाच्या आणि साप्ताहिकातील काही वरिष्ठांच्या मताविरुद्ध जात असल्याने तो न छापता स्थानिक कचेरीतील एका विशेषज्ञाकडून आपल्याला हवा तसा लेख कसा लिहून घेतला आणि त्यावर चिडून त्या वार्ताहरांनी कसे राजीनामे पाठविले याचाही किस्सा सांगितला आहे. जे जे वार्ताहार दियेमच्या आणि अमेरिकन धोरणाच्याविरुद्ध लिहितील त्यांना सरळ कम्युनिस्ट अथवा त्यांचे सहप्रवासी असे हिणवले जाई.

अमेरिकन वृत्तपत्रांमध्ये टीका नको म्हणूनच पुढे अमेरिकन सरकारने व्हिएतनाममधील बऱ्याच कारवाया गुप्तपणे करायचे ठरविले असावे. लोकांना सांगायचे एक आणि करायचे दुसरेच. यातूनच पुढं 'पेंटॅगॉन पेपर्स' प्रकरणाची उत्पत्ती झाली. व्हिएतनामची आपली शोककथा सांगताना या खळबळजनक वृत्तांताचा आपल्याला

उपयोग होईलच.

दियेम राजवटीत लष्करी डावपेच, कारस्थाने, राजकीय कुरापती सामाजिक अशांती वाढत होतीच. दियेमच्या नात्यात नसलेल्या सर्वच जनरल्सूना राजवटीतील वशिलेबाजीचा वीट आला होता. त्यामुळे प्रत्येक जण संधीची वाट पाहत होता. परंतु सैन्याच्या दोन तुकड्या कधीही एकमेकाच्या फार जवळ येऊ द्यायच्या नाहीत, सायगावामधे फारशी लष्करी जमवाजमव होऊ द्यायची नाही आणि कमांडर्सना एका तुकडीत फार काळ ठेवून जम बसवू न देता त्यांच्या सतत बदल्या करीत रहायचे अशा युक्त्यांनी दियेम आणि न्हू लष्करी क्रांती टाळीत होते. सायगावच्या हॉटेलांमधे रोज लष्करी उठावाच्या अफवा पसरायच्या. दियेमचे फार दिवस राहिलेले नाहीत हे अमेरिकन सरकारशिवाय बाकी सर्वांना कळून चुकले होते.

दियेम राजवटीचा शेवट जवळ आणला तो व्हिएतनाममधल्या बुद्धांनी. व्हिएतनाममधे अधिकृत विरोधी पक्ष नव्हताच. संघटित विरोधही नव्हता. दियेम-विरोधी आणि कम्युनिस्ट-विरोधी असे जे राष्ट्रवादी नेते व्हिएतनामात पूर्वी होते ते एकतर देशातून परांगदा तरी झाले होते किंवा तुरुंगात खितपत तरी पडले होते. जे बुद्धीवादी देशात उरले होते त्यांच्यात एकी नव्हती आणि मागे गुप्त पोलिसांचा ससेमिरा होता. दियेमविरुद्ध काही बोलायचे झाले तरी दारे-खिडक्या बंद करून एकमेकाच्या कानात बोलावे लागे. अशा परिस्थितीत राजकीय विरोध जगणार कसा. काही कॅथॉलिक वृत्तपत्रांमधून दियेमवर टीकासदृश्य मजकूर आल्या आल्या ती पत्रेच बंद झाली होती. हजारो राजकीय कैदी तुरुंगात पडले होते. ही गळचेपी बौद्धांनी संपविली. आपल्याला दुसऱ्या दर्जाची वागणूक मिळते आहे ही तर बौद्धांची केव्हापासूनची तक्रार होती. आणि दक्षिण व्हिएतनाममधील एक कोटी ६५ लाख लोकसंख्येपैकी सत्तर टक्के लोक बौद्ध होते. (उत्तर व्हिएतनामची लोकसंख्या १ कोटी ९२ लाख.)

मे १९६३ मधे बौद्धांच्या चळवळीला हे या जुन्या राजधानीच्या शहरात प्रारंभ झाला. हे येथे दियेमचा सर्वात मोठा भाऊ न्गो दिन्ह थुक हा कॅथलिक आर्चबिशप होता. त्यामुळे कॅथॉलिकांचे तिथे मोठेच प्रस्थ होते. त्याचप्रमाणे या भागातील बौद्धही अधिक आक्रमक होते, अधिक संघटित होते. त्यामुळे धार्मिक तणाव खूप होता.

एके दिवशी सायगावमधल्या परदेशी वार्ताहरांना बोलावून सरकारी प्रवक्त्याने जाहीर केले की हे येथे नऊ बौद्धांना व्हिएतकाँग गनिमांनी ठार केले आहे. बहुतेक वार्ताहरांचा यावर विश्वास बसला नाही. त्यांच्यापैकीच एक वार्ताहराला खरी बातमी कळली होती. म्हणूनच सरकारी प्रवक्त्याचे हे वक्तव्य.

खरी बातमी अशी होती की व्हिएतनामी लष्कराने सरळ गर्दीत गोळ्या झाडून नऊ बौद्धांना ठार केले होते. या

घटनेची कारणपरंपरा अशी होती. काही दिवसापूर्वी आर्चबिशप थुक याच्या बिशप-पदाचा पंचवीसावा वाढदिवस साजरा करण्यासाठी एक मोठा सोहळा करण्यात आला होता. त्या निमित्ताने अनेक ठिकाणी, चर्चेसवर, घरादारांवर व्हिएतनामी राष्ट्रध्वजाबरोबरच कॅथलिक झेंडेही फडकाविण्यात आले होते. कायद्याप्रमाणे व्हिएतनाममधे सरकारी ध्वजाशिवाय दुसरा कोणताही ध्वज सार्वजनिक ठिकाणी फडकाविण्यास बंदी होती. या सोहळयास स्वतः दियेम हजर होता. दियेमने फक्त या कायद्याकडे स्थानिक पुढाऱ्यांचे लक्ष वेधले.

या सोहळयानंतर लगेच काही दिवसांनी गौतम बुद्धाचा २५८७ वा महापरिनिर्वाण दिन होता. त्याचाही मोठा सोहळा होता. आणि बौद्धांनाही आपापले ध्वज उभारायचे होते. सरकारने त्यावर बंदी घातली. बौद्ध पुढाऱ्यांनी आपला नेता थिच त्रि क्वांग यास रेडियोवर भाषण करू देण्याची परवानगी मागितली. पण त्यासही नकार मिळाला. बौद्ध साहजिकच चिडले आणि त्यांनी रेडियो स्टेशनवर एक मोर्चा नेला. तेथून त्यांना हुसकावून लावण्यात आले. लोक संतापले. आणि हजारो संतप्त बौद्धांचा एक प्रचंड जमाव शहरातील मध्यभागाच्या चौकात निदर्शने करीत जमा झाला. पोलीसांनी ही निदर्शने मोडण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. अखेर लष्कराला पाचारण करण्यात आले. आणि लष्कराने लाठीमार, अश्रुधूर, डोक्यावरून हवेत गोळया झाडणे आदी रीतसर भानगडीत न पडता सरळ गर्दीत गोळया झाडीत रणगाडे घुसविले. त्यातच नऊ जण ठार झाले आणि अनेक जखमी झाले.

सरकारने ही बातमी दाबण्याचा प्रयत्न केला. व्हिएतकाँग गनिमी सैनिकांच्या कारवाईवर ठपका दिला. पण एवढी मोठी बातमी लपून थोडीच राहते. वाऱ्यासारखी ती साऱ्या देशभर पसरली. आणि तरीही सरकारतर्फे या बातमीचा इन्कारच होत राहिला. व्हिएतकाँगचेच हे कृत्य, असे सरकारी प्रवक्ते घोटू लागले, घटनास्थळी प्रत्यक्ष हजर असलेल्या काही पश्चिम जर्मन डॉक्टरांनी या हत्याकांडांचे फोटोसह चक्षुर्वैसत्यम् वृत्तांत प्रसिद्ध केले. पण सरकारी नन्नाचा पाढा चालूच राहिला. सरकारच्या अशा धादांत खोटारडया आणि मद्दड वागणुकीने लोक संतापणार नाही तर काय ?

दियेम स्वतः कॅथॉलिक असल्याने इतर कॅथॉलिक याचा फायदा घेऊन अगोदरच वातावरण बिघडवीत होते. कॅथलिक खरे म्हणजे अल्पसंख्य. त्यातले बरेच उत्तरेतून पळून आलेले. परंतु सर्व व्हिएतनामवर त्यांचेच वर्चस्व असल्यासारखे भासत होते. अधिकृत रीत्या व्हिएतनाममधे धर्मभेद नव्हता. पण प्रत्यक्षात मात्र तसे नव्हते. सर्व मोठ्या जागा कॅथॉलिकांना. अमेरिकनांचे घनिष्ट संबंध कॅथलिकांशी. अमेरिकन वार्ताहर आणि राजदूत यांचेही संबंध कॅथॉलिकांशीच.अमेरिकन स्कॉलरशिप्स् मिळत कॅथॉलिकांनाच. कॅथॉलिक अधिक

श्रीमंत, अधिक सुशिक्षित आणि बव्हंशी शहरांतून राहणारे. त्यामुळे अधिक कम्युनिस्ट द्वेष्टे. अशा धुमसत्या वातावरणातच हे येथील घटनेची ठिणगी पडली.

वातावरण हळूहळू तापत गेले. बौद्ध अधिक संघटित झाले. बुद्ध भिक्षू मोठ्या प्रमाणावर निदर्शनांमध्ये भाग घेऊ लागले. ऐवढेच नव्हे तर बौद्धांची चळवळ संघटित करण्यात आणि तिला नेतृत्व देण्यात भिक्षूंनी पुढाकार घेतला मिरवणुका, मोर्चे, निदर्शने उपोषणे आणि आत्मदहन अशी आपली चळवळ त्यांनी क्रमाक्रमाने अधिकाधिक तीव्र करीत नेली. आणि व्हिएतनाममधील वातावरण एक विद्युन्मय अस्थिरता निर्माण केली. आतापर्यंत दियेम राजवटीला एवढा संघटित विरोध कोणी केला नव्हता. विरोधाची सुरुवात धार्मिक कारणातून झाली होती. आता विरोधाला राजकीय स्वरूप आले होते. एखाद्या लष्करी गटाने मनावर घेतले असते तर दियेमला सहज उखडून टाकता येईल असे परिपक्व वातावरण तयार झाले होते.

अमेरिकन दूतांनी आणि राजकीय सल्लागारांनी बौद्धांशी जुळते घेण्याचा दियेमला व्यर्थ सल्ला दिला पण दियेम आणि त्याचे कुटुंब हा सल्ला स्वीकारण्याच्या मनस्थितीत नव्हते. दिवसें दिवस ते या पेटत्या वातावरणात तेलच ओतीत होते. जेव्हा पहिल्या बौद्ध भिक्षूने निषेधात्मक निदर्शनासाठी स्वतःला जाळून घेतले तेव्हा सर्व जगाला धक्का बसला. पण मादाम न्हू ने जाहीरपणे असा संशय व्यक्त केला की त्या भिक्षूला त्याच्या सोबत्यांनी मादक द्रव्ये पाजून हे कृत्य करून घेतले. बौद्धांचा संताप साहजिकच वाढला.

अशा परिस्थितीत काही अमेरिकन तज्ञांनी दियेमला न्हू दांपत्यापासून अलग करण्याचा प्रयत्न केला. दियेमला अलग केले तर सगळे गाडे सुरळीत रूळावर आणता येईल असे त्यांना वाटत होते. पण ते अशक्य होते. दियेम आणि न्हू दांपत्य एकमेकाला सयामी जुळ्यांप्रमाणे चिकटले होते. दियेम न्हू दांपत्याला आणि आपल्या कुटुंबाला शेवटपर्यंत एकनिष्ठ राहिला.

ऑगस्ट १९६३ मध्ये एकाएकी बौद्ध निदर्शनांचा जोर वाढला आणि वीस ऑगस्टच्या रात्री न्हूच्या आज्ञेवरून लष्कराने सायगाव, हे आणि इतर शहरातील बौद्ध पॅगोडांवर धाडी घालून अनेक भिक्षूंना पकडले, काही गौतम बुद्धाच्या मूर्ती फोडल्या, कित्येक भिक्षू चकमकीत ठार झाले. लोकांचा संताप आणखीनच वाढला. त्यात भर पडली मादाम न्हूच्या वक्तव्याची. बौद्ध भिक्षूक म्हणजे कम्युनिस्ट. बरे झाले त्यांना दडपून टाकले गेले, असे तिने चक्क एका वार्ताहराला सांगितले.

अशा या तप्त वातावरणातच लष्करातील दोन तीन गट दियेमला खाली खेचण्याची संधी पाहत होते. अखेर नोव्हेंबर १ रोजी आर्मीमधील सर्व महत्त्वाच्या जनरल्सनी बंड केले. बंडखोर सैनिकांनी सायगावमधील

अध्यक्षीय राजवाड्याला गराडा घातला. अध्यक्षाच्या सुरक्षापथकाला बाजूला करून घेरले. दियेमच्या कुटुंबातले जे एकनिष्ठ जनरल्स् होते ते सायगावबाहेर दूर असून ऐनवेळी ते दियेमच्या मदतीला धावून येऊ शकणार नाही असा मोका साधूनच ही कारवाई करण्यात आली होती.

आपल्या राजवाड्यात असलेल्या छोट्या ट्रान्स्मीटरवरून दियेमने मदतीचे संदेश सर्व जनरल्स्ना धाडले. पण एकाही ठिकाणाहून त्याला प्रतिसाद मिळाला नाही. या उलट बंडखोरांनी ताब्यात घेतलेल्या रेडियो स्टेशनवरून एकामागून एक सर्व जनरलसनी -- जे सायगावमधे हजर होते --- बंडखोरांना आपला पाठिंबा जाहीर केला.

परिस्थती ओळखून दियेम आणि त्याचा भाऊ न्हू यांनी अध्यक्षीय राजवाड्यातील एका भुयारातून य:पलायन करून सायगावमधील एका दाट लोकवस्तीच्या भागात आपला गुप्त मुक्काम ठोकला. दुसरे दिवशी जेव्हा बंडखोरांनी दियेमला शरण येण्याचे अनेकदा आवाहन करूनही काहीच प्रत्युत्तर आले नाही तेव्हा अध्यक्षीय राजवाड्यावर तोफांनी हल्ला चढविण्यात आला.

अखेर जेव्हा त्यांच्या लपण्याच्या स्थळाचा पत्ता लागला तेव्हा सैनिकांनी पकडून गोळ्या घालून दोघाही भावांना ठार मारले. मादाम न्हू तेव्हा परदेशात होती. ती वाचली.

या दोघा बंधूंच्या मृत्यूची वार्ता सायगावमधे पसरली तेव्हा आनंदाचा जल्लोष झाला. रस्तोरस्ती मिरवणुका निघाल्या. दियेम आणि न्हू यांच्याशी संबंधित असलेली सर्व प्रतीके जाळून टाकण्यात आली वा त्यांची मोडतोड करण्यात आली. दियेम आणि न्हू यांच्या कलाने चालणाऱ्या वृत्तपत्रांच्या कचेऱ्यांना जमावाने आगी लावल्या आणि न्हू च्या आवडत्या दोन मंत्र्यांच्या घरांची मोडतोड केली. गुप्त पोलीसांना पळता भुई थोडी झाली. रात्री हॉटेले उघडली। नृत्य-गायनाचा जल्लोष उडाला. दियेमचे सार्वजनिक ठिकाणचे आणि घराघरातले फोटो फाडून फेकून देण्यात आले. नऊ वर्षे दियेम आणि त्याच्या कुटुंबाने व्हिएतनामवर राज्य केले त्याचा असा अंत झाला. □

---


# फिडेल, चे आणि क्रांती

लेखक : अरुण साधू

किंमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे


---

दियेमच्या अस्तानंतर तीनच आठवड्यात राष्ट्राध्यक्ष केनेडीचा खून झाला व व्हिएतनाम युद्ध अगदी आणीबाणीच्या परिस्थितीत आले असतानाच सारी जबाबदारी नवा अध्यक्ष लिंडन जॉन्सन याच्यावर येऊन पडली आणि अध्यक्षपदाची शपथ घेताच व्हिएतनाम युद्धाला मदत करण्याचे धोरण सर्वतोपरी चालू ठेवण्याचे आश्वासन त्याने देऊन टाकले. जॉन्सनने आपले आश्वासन पूर्णपणे पाळले. जॉन्सनच्याच कारकीर्दीत व्हिएतनाम युद्धात अमेरिकन गुंतवणूक एवढी वाढली, युद्धाचा पसारा एवढ्या भयानक रीतीने वाढला की या युद्धाला मानवी इतिहासातले काळे युद्ध म्हणून ओळखले जाऊ लागले. उत्तर व्हिएतनामवरील अमेरिकन बाँबहल्ले जॉन्सननेच सुरू केले आणि ते वाढविले. जमिनीवरील अमेरिकन सैनिकांची संख्या भराभर एवढी वाढवीत नेली की त्याच्या कारकीर्दीच्या शेवटास म्हणजे १९६९ मधे दक्षिण व्हिएतनाममधील गनिमी सैनिकांशी जमिनीवर लढावयास पाठविलेल्या अमेरिकन सैनिकांची संख्या साडेपाच लाख एवढी झाली. सध्याचा अमेरिकन अध्यक्ष निक्सन गादीवर आला तो या सगळ्या गुंतवणुकीचा वारसा घेऊनच.

अध्यक्ष आयसेनहॉवर याने मदतीचा शब्द दिला. केनेडी याने मनापासून तो पाळून प्रत्यक्ष कृतीशील मदत देण्याचे कबूल केले. या कबूलीस अनुसरून अध्यक्ष जॉन्सन याने हजारो टन बॉम्ब् व्हिएतनाममधे टाकले आणि लक्षावधी सैन्य पाठविले आणि अध्यक्ष निक्सन याने तेच धोरण पुढे चालू ठेवले. अशी या युद्धातील अमेरिकन गुंतवणूकीची कथा आहे. शब्दासाठी शब्द जाऊन अमेरिकन भावनात्मक गुंतवणूक या युद्धात एवढी झाली की कोण कशासाठी लढते आहे हे समजणेच मुश्कील झाले. अमेरिकन गुंतवणुकीची ही कथा न्यूयॉर्क टाईम्स्‌ने पुढे आणलेल्या पेंटॅगॉन पेपर्सवरून अगदी विदारकपणे उघडी पडते. अमेरिकन सरकारच्याच एका खात्यातर्फे तयार केलेला हा गुप्त अहवाल आहे.

या अहवालावरून असे दिसते की व्हिएतनामच्या बाबतीत अमेरिकेने टाकलेले प्रत्येक पाऊल चुकीचे पडले. ही चूक सुधारण्यासाठी पुढचे पाऊल टाकले. पण तेही चुकले, दियेमच्या मृत्यूनंतर दक्षिण व्हिएतनाममधील सरकारे धडाधड कोसळू लागली. त्यांना वाचविण्याचा एकच मार्ग अमेरिकेला दिसत होता. अधिकाधिक शस्त्रास्त्रे व सैन्य पाठविणे आणि टाकलेले प्रत्येक पाऊल एवढे भक्कम आणि जोरदार होते की मागे परतणे लांच्छनास्पद होते. मागे पाहणे, किंवा मागे परतण्याबद्दल विचार करणे ही गोष्टच भित्रेपणाची ठरेल, कम्युनिस्टांना अधिक धीट करणारी ठरेल आणि दक्षिण व्हिएतनाम्यांना नीतीधैर्य गळण्यास कारणीभूत होईल असे सांगितले जात होते. 'जरा थांबा---आपण कुठे जातो आहोत? मागे वळायचं का?' असा प्रश्न जवळजवळ कोणीच विचारीत नव्हते.

बड्या बड्या अमेरिकन पुढाऱ्यांनी आपल्या तर्कबुद्धीला फाटा देऊन, कोणत्याही प्रश्नाचा सर्वांगाने विचार न करता, परिस्थितीच्या दबावाला बळी पडून केवळ घाईघिसाडीने कसे निर्णय घेतले हेही या अहवालातील पाच टक्के भागाचा सारांश बाहेर आलेला आहे त्यावरून स्पष्ट होते.


आणखी हेही दिसते की अमेरिकन प्रवक्ते जाहीररीत्या जे सांगत होते त्यापेक्षा कितीतरी वेगळ्या गोष्टी सरकार करीत होते. थोडक्यात म्हणजे जनतेपासून सत्य गोष्टी लपवून सरकार खोट्या गोष्टी बाहेर सांगत होते. लाओस आणि व्हिएतनामविषयक शांतता वाटाघाटी करण्यास अमेरिका बाहेर जेवढे दाखवीत होते तेवढे उत्सुक मुळीच नव्हते, एवढच नव्हे तर वाटाघाटी कशा टाळता येतील त्या दृष्टीनेच सतत अमेरिकेचे प्रयत्न चालू असायचे. उत्तर व्हिएतनामविरुद्ध अमेरिका ज्या ज्या लष्करी कारवाया करी त्यांची चकार शब्दानेही माहिती जनतेला कळत नव्हती. मात्र ही माहिती हनोई, पेकिंग आणि मास्को येथे कळावी याची मात्र सरकार दक्षता घेत होते.

व्हिएतनामच्या भोवऱ्याच्या राजकीय व भौगोलिक महत्त्वाविषयी सी. आय. ए. ने वेळोवेळी शंका व्यक्त केली होती. पण सरकारने सी. आय. ए.चा सल्ला ऐकला नाही आणि व्हिएतनाममधील अमेरिकन गुंतवणुकीचे समर्थन करण्यासाठी दरवेळी वेगवेगळी कारणे दिली.

अध्यक्ष केनेडी, जॉन्सन, युद्धमंत्री मॅकनमारा आणि इतर अनेक नेते कम्युनिस्ट आक्रमणापासून 'स्वतंत्र' जगाचे रक्षण करण्यासाठी व्हिएतनामी युद्धाचे व्रत हाती घेतल्याचे शिंग फुंकून




आंब्या आंब्यावर लिहीलेले असते चोखणाऱ्याचे नांव!




परंतू आंब्याच्या उत्तम लोणच्यावर लिहीलेले असते फक्त ठाकूरांचेच नांव!!

ठाकूर लोणची, पापड, मसाले, चटण्या,
माहीम मुंबई.

सांगीत असताना या युद्धाबाबत अमेरिकन सरकारचे खरे ध्येय काय होते? मॅकनमाराने १९६५ मध्ये एका सरकारी फायलीवर सही केली त्यात युद्धाचा खरा हेतू हा मित्राला मदत करण्याचा नसून चीनला रोखण्याचा आहे असे स्पष्ट लिहिले होते. त्यानंतर आणखी एक विधान केले गेले त्यातील युद्धाच्या हेतूची टक्केवारी अशी होती : अमेरिकेचा नामुष्कीकारक पराभव टाळणे : ७० टक्के, दक्षिण व्हिएतनामी भूमी चीनच्या आक्रमणापासून दूर ठेवणे : २० टक्के आणि दक्षिण व्हिएतनामी जनतेला अधिक चांगले व अधिक स्वतंत्र जीवन जगता यावे : १० टक्के. जाहीररीत्या अमेरिका जे काही सांगत होते त्याच्याशी हे धोरण केवढे विसंगत होते.

अमेरिकन जनतेला काहीही माहिती नसताना अगदी १९६४ पासून सरकारने लाओसमधून जाणाऱ्या हो ची मिन्ह ट्रेलवर आणि उत्तर व्हिएतनामच्या भागात बॉंब हल्ले सुरू केले होते. या हल्ल्यांसाठी नागरी वैमानिकांचा सी. आय. ए. ने उपयोग केला होता. चार-पाच महिन्यांच्या आत अगदी सरळ सरळ अमेरिकन एअरफोर्सची विमाने या हवाई हल्ल्यात भाग घेऊ लागली आणि हल्ल्यांचे प्रमाण आठवड्याला दोन ते तीन असे झाले. पण या गोष्टींची अमेरिकन जनतेला काहीच कल्पना नव्हती. एवढेच नव्हे तर सरकारची हवाई दलाला अशी सक्त ताकीद होती की याबाबतीतले एक अक्षरही बाहेर फुटता कामा नये. आपलं एखादं विमान पाडलं गेलं तरच सांगायचं की लाओस सरकारच्या विनंतीवरूनच लाओसच्या टेहळणी विभागांना संरक्षण देण्यासाठी आमचे विमान गेले होते.

उत्तर व्हिएतनामवर अमेरिकेने अधिकृतपणे हवाई हल्ले सुरू केले ते ऑगस्ट १९६४ मधे टोन्किनच्या आखातात एका अमेरिकन जहाजावर हल्ला झाल्यावर त्याचा बदला घेण्याच्या निमित्ताने. पण खरोखरच या अमेरिकन युद्धनौकेवर हल्ला का झाला? पेन्टॅगॉन अहवालावरून जवळ जवळ असे सिद्ध होते की मोठ्या प्रमाणावर बॉंबिंग सुरू करण्यासाठी अमेरिकेने मुद्दाम हा हल्ला घडवून आणला. त्यासाठी वाटेल ते खोटे-नाटे प्रकार केले. खरा प्रकार असा की अमेरिकन अधिकाऱ्यांच्या साक्षीने काही दक्षिण व्हिएतनामी बोटींनी टोन्किनच्या आखातातील दोन उत्तर व्हिएतनामी बेटांवर गुप्तपणे हल्ले चढविले होते. त्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून उत्तर व्हिएतनाम्यांनी दक्षिण व्हिएतनामी बोटींवर तोफा डागल्या. त्यातच ते अमेरिकन जहाज सापडले. अमेरिका जणू याचीच वाट पाहत होती. अमेरिकन युद्धनौकेवर हल्ला म्हणजे काय! क्षुद्र उत्तर व्हिएतनामचे केवढे हे महाधाष्टर्य! त्याला शिक्षा केली पाहिजे. अध्यक्ष जॉन्सन रागावला. आणि त्याने बदला घेण्याची आज्ञा केली. असा सगळा बनाव झाला. आधी अमेरिकेनेच कुरापत काढली होती हे पेन्टॅगॉन अहवाल बाहेर येई-

पर्यंत गुलदस्तातच होते. हा प्रसंग घडल्यानंतर ज्या त्वरेने अमेरिकन विमाने उत्तर व्हिएतनामवर पोचली त्यावरून तरी कुणाला शंका यावयास हवी होती.

हाच प्रकार जमिनीवर सैन्य पाठविण्याबाबत. भूसैनिकांच्या पहिल्या तुकड्या अचानक व्हिएतनाममधे उतरल्या तेव्हा बहुतेक अमेरिकन जनता या बाबतीत अंधारातच होती. कारण या गोष्टीची उगाच अगोदर फारशी वाच्यता करू नका असा खुद्द जॉन्सन याचा सल्ला होता. त्यावेळी जनरल मॅक्सवेल टेलर हा अमेरिकेचा त्या देशातील राजदूत होता. त्याचा प्रथमपासून व्हिएतनाममधे भूसैनिक आणण्यास विरोध होता. त्याला ही बातमी जेव्हा कळली तेव्हा तो रागाने लाल झाला. पण काही करू शकत नव्हता.

पेन्टॅगॉन अहवालामधे आणखी एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते ती म्हणजे अमेरिकन सरकारचा उद्धट आत्मविश्वास. आपल्या ताकदीची अमेरिकेला नशा चढली होती आपण म्हणू ते झाले पाहिजे. ठरविलेल्या योजनेत सर्व लोकांनी, राष्ट्रांनी, मित्रांनी अथवा शत्रूंनी बसलेच पाहिजे असा अमेरिकेचा आग्रह होता. अमेरिकन शासनाचा हा उद्धट अहंकार व्हिएतनाममधील अमेरिकन राजदूतापासून तो साध्या सैनिकापर्यंत सर्वांमधे पक्का मुरलेला होता. स्वत: जनरल टेलर व्हिएतनामी जनरल्सना प्राथमिक शाळेतल्या मुलांप्रमाणे वागवी. 'तुम्हाला काय इंग्रजीही कळत नाही काय? मागच्यावेळी मी काय सांगितलं होतं? काही लष्करी उठाव वगैरे करू नका म्हणून बजावलं होतं ना? तरी देखील गडबड करून गोंधळ घातलाच!' अशा भाषेत तो बोले. दियेमला उलथवून लावणाऱ्या लष्करी क्रांतीतून पुढे काही काळ सत्तेवर राहिलेल्या व्हिएतनामी जनरल कान्ह याने तर एकदा असे उद्गार काढले की, 'टेलर असा बोलत होता की जणू जपानची शरणागती पत्करणारा मॅक आर्थरच.'

अमेरिकेचा हा जरा जादा आत्मविश्वास त्यावेळच्या अमेरिकन नियतकालिकांमधूनही स्पष्ट दिसून पडतो. अमेरिकन हेलिकॉप्टर्स आलीत. आता काय चार्लीचे (व्हिएतकाँगचे) थोडेच दिवस उरले? अमेरिकेने आपली प्रचंड लष्करी ताकद व्हिएतनाममधे आणली आहे, आता काही महिन्यातच युद्ध संपणार; हो आणि कंपनीला वाईट दिवस आले; सर्व शक्तीमान अशी अमेरिकन बी-५२ विमाने उत्तर व्हिएतनामी आकाशात संचार करू लागताच झॉपच्या उरात धडकी भरली वगैरे तऱ्हेची वृत्ते या नियतकालिकांतून येऊ लागली. पॅरीसच्या फ्रेंच वृत्तपत्रांनी 'क्रूरकर्मा नराधम नेपोलियन पॅरीसपासून शंभर मैलावर येऊन ठेपला' येथपासून तो 'महापराक्रमी सम्राट नेपोलियनचे पॅरीसमधे हर्षोत्फुल्ल स्वागत' येथपर्यंत कशी प्रगती केली याच्या कथा सांगितल्या जातात. अमेरिकन नियतकालिकांचा कालक्रमवार

अभ्यास केला तर असे अनेक किस्से तयार होतील. व्हिएतनामच्या विजयाच्या डरकाळ्या फोडण्यापासून तो नामुष्की पत्करा पण सैन्य मागे घ्या असा सल्ला देणे असे अनेक प्रकार अमेरिकन नियतकालिकांनी केले.

अमेरिकनांना आपल्या सामर्थ्याची कशी नशा चढली होती त्याचे छान उदाहरण हो ची मिन्हचा फ्रेंच चरित्रकार जाँ लकोचू याने दिले आहे. सप्टेंबर १९६६ मध्ये जाँ एका अमेरिकन अधिकाऱ्याला भेटला. हा अधिकारी मोठा हुशार होता. व्हिएतनामविषयी त्याला मोठीच कळकळ दिसत होती. काहीतरी तडजोड निघावी यावर जाँचे आणि या अधिकाऱ्याचे एकमत दिसत होते. होचा विषय निघाला आणि एकाएकी या सुसंस्कृत गृहस्थाला नशा चढल्यासारखे झाले. सर्व अमेरिकेच्या महाप्रचंड सामर्थ्याचा संचार जणू त्याच्यात झाला आणि तो बोलू लागला—हो ची मिन्हबद्दल मला आदर आहे—पण सर्व व्हिएतनाम एक करण्याचे आमचे स्वप्न काही आम्ही त्याला पुरे करू देणार नाही. आम्ही मुळी तसे ठरवलेच आहे....च् च् हो बद्दल मला वाईट वाटते. पण सर्व व्हिएतनाम काही आम्ही त्याच्या ताब्यात पडू देणारच नाही—

पेन्टॅगॉन अहवालावरून हेही स्पष्ट झाले की, उत्तर व्हिएतनामला चेतवून अंगावर ओढायचे आणि ते निमित्त साधून लढाईची व्याप्ती वाढवायची अशा कितीतरी योजना आखण्यात आल्या होत्या. त्यातल्या काही अमलात आल्याही नाहीत. जिनिव्हा करारानुसार १९५५–५६ साली घ्यावयाच्या निवडणुकांना सुरुंग लावण्यात मात्र अमेरिकेचा काही हात नव्हता. त्या बाबतीत खरा दोषी होता दियेम. कारण कम्युनिस्ट जिंकतील अशी त्याला भीती होती असेही या अहवालात नमूद केले आहे.

अमेरिकेच्या शस्त्रसामर्थ्यापुढे व्हिएतकाँग आणि उत्तर व्हिएतनाम एवढ्या जिद्दीने ताठ उभे राहतील याचा कोणालाच अंदाज नव्हता. गनिमी कारवाया कमी होत नाहीत असे पाहताच दक्षिण व्हिएतनाममधील शस्त्रसंभार अधिक वाढवायचा, सैनिक वाढवायचे आणि उत्तर व्हिएतनामवरील हवाई हल्ले वाढवायचे हेच उपाय सुचत. या सर्व प्रकरणात केवळ सी. आय. ए. ने शहाणपणाचा सल्ला दिला होता असे पेन्टॅगॉन अहवालावरून दिसते.

सर्व शस्त्रसामर्थ्य वापरून अमेरिकेने व्हिएतनामवर प्रचंड आघात तरी करावा किंवा परत निघून यावे. क्रमाक्रमाने लढाईची व्याप्ती वाढविण्याने काहीही साधणार नाही असे सी. आय. ए. ने सुचविले होते. जॉन्सनने सी. आय. ए. ला एक समस्या दिली होती—दक्षिण

## नामुष्की पत्करा पण सैन्य मागे घ्या

व्हिएतनाम आणि लाओस कम्युनिस्टांच्या हाती पडले तर त्याच मार्गाने इतर आग्नेय आशियाही जाण्याचा संभव आहे काय? सी. आय. ए. चे उत्तर होते, एक कांबोडिया सोडल्यास दुसरे कोणतेही राष्ट्र एवढ्या सहजासहजी कम्युनिस्टांच्या हाती जाऊ शकणार नाही.

सी. आय. ए. चा त्यावेळचा प्रमुख अध्यक्ष जॉन्सनला सांगत होता की, उत्तर व्हिएतनामवरील मर्यादित बाँबहल्ले निष्प्रभावी ठरतील. उत्तर व्हिएतनामी हे हल्ले अगदी सहज पचवून पुन्हा ताठ मानेने आपल्याशी लढत राहतील. जॉन्सन ऐकत नाही असे बघून याने चक्क एक पत्रिका काढून ती एप्रिल १९६५ मधे वरिष्ठ अमेरिकन अधिकाऱ्यांमधे फिरविली. या पत्रिकेमधे त्याने जी भाकिते केली ती तंतोतंत खरी ठरली. त्याने लिहिले होते की, बाँबल्ल्यांमुळे उत्तरेचे नीतिधैर्य मुळीच खचलेले नाही. एवढेच नव्हे तर त्यामुळे व्हिएतनाम्यांची भूमिका अधिक ताठर झाली आहे. आता जाणाऱ्या प्रत्येक दिवसा आणि आठवड्यागणिक बाँबहल्ले थांबविण्यासाठी आपल्यावरील दबाव वाढत जाईल आणि या सबंध प्रकरणात काळच आपल्याविरुद्ध जाईल. उत्तर व्हिएतनामी लोक हीच अपेक्षा करीत आहेत. जसजसे अधिकाधिक अमेरिकन सैनिक या युद्धात गुंततील तशा त्यांच्या गरजा वाढतील आणि त्याच प्रमाणात विजयाची संधी आपणापासून दूर पळेल आणि आपल्याला कळून चुकेल की आपण अशा जंगली चिखलात रुतून बसलो आहोत की ज्यातून बाहेर पडणे भलतेच कठीण आहे आणि अशा लष्करी प्रयत्नात गुंतलो आहोत की ज्यात विजय मिळविणे शक्य नाही.

क्यूबा, बंगला देश अशा अनेक प्रकरणात सी. आय. ए. खूपच बदनाम झाली असली तरी हे कबूल केले पाहिजे की ती जगातील एक अत्यंत कार्यक्षम गुप्तहेर संस्था आहे. वर दिलेले सी. आय. ए. ने १९६५ साली केलेले भाकीत आज किती खरे ठरले आहे यावरून तरी निदान हे कळावे. सी. आय. ए. ने दिलेली माहिती काटेकोरपणे बरोबर असते आणि एखाद्या समस्येचे केलेले विश्लेषण खूपच नि:पक्षपाती असते. कुणी सांगावे, व्हिएतनामप्रमाणेच बांगला देश प्रकरणात सी. आय. ए. ने पुरविलेली माहिती आणि विश्लेषण बाजूला ठेवून अमेरिकन प्रशासनाने आपलेच घोडे पुढे दामटले नसेल कशावरून? एरवी बदनाम झालेली सी. आय. ए. मात्र पेन्टॅगॉन अहवालानुसार सगळ्यात शहाणी अमेरिकन संस्था ठरली आहे.

अध्यक्ष जॉन्सन १९६४ मध्ये पुन्हा अध्यक्षीय निवडणुकीस उभे राहिले तेव्हा त्यांच्या निवडणूक प्रचाराची घोषणा होती "आम्हाला युद्धाची व्याप्ति वाढवायची नाही." पेन्टॅगॉन अहवालात मात्र असे दिसते की जेव्हा हे निवडणुकीचे प्रचार युद्ध चालू होते त्याच सुमारास उत्तर व्हिएतनामवरील

प्रचंड बाँबहल्ल्यांना जॉन्सन यांनी गुप्त-पणे संमती दिली होती. हा मुद्दा एक मोठाच वादाचा प्रश्न झालेला आहे. जॉन्सनच्या पाठीराख्यांचे म्हणणे आहे की अध्यक्षांनी हा निर्णय निवडणुकी-नंतर घेतला. एकूण एकच. निर्णय अमलात आणण्याची तयारी आधीपासूनच चालू झाली असली पाहिजे एवढया तडफेने तो अमलात आला. असो.

तर अशा रीतीने अमेरिका बारा-पंधरा हजार मैलावरील युद्धात गुंतत असताना व्हिएतनामची स्थिती काय होती? सतराव्या अक्षांशावर देशाचे दोन भाग पडलेले. व्हिएतनाम एक होणे पहिल्या एक दोन वर्षात सहज शक्य वाटत होते. पण वर्षे जाऊ लागली तशी या दोन देशांच्या जीवन पद्धतीत साहजिकच फरक पडू लागला., उत्तर व्हिएतनाम हे साम्यवादी राजवटीखाली तर दक्षिणेत प्रथम टोकाची हुकूमशाही, नंतर लष्करी अराजक आणि पुन्हा नंतर अमेरिकन अधिपत्याखालील टोकाची हुकूमशाहीच. उत्तरेतील आणि दक्षिणेतील खेडयाच्या जीवनपद्धतीत फारसा फरक पडला नसेल. परंतु शहरामध्ये तर नक्कीच पडलेला आहे. दक्षिण व्हिएतनाममधील सारी शहरे आता अमेरिकन संस्कृतीची भ्रष्ट नक्कल करू लागली आहेत. अमेरिकन सैनिकांनी आणि डॉलर्सनी दक्षिण व्हिएतनामी शहरांना किती भ्रष्ट करून ठेवले आहे याचे विदारक वर्णन मेरी मॅकार्थी या अमेरिकन पत्र लेखिकेने केले आहे. तर साम्यवादी जीवनपद्धती-मुळे उत्तर व्हिएतनाममधील शहरांचे पूर्वीचे स्वच्छंदी जीवन नष्ट होऊन कशी नीरस, रूक्षता निर्माण झाली आहे याच्या रसभरीत कथा कोणत्याही अमेरिकन प्रकाशनात वाचायला मिळ-तील. अमेरिकन, जपानी, आणि इतर अनेक परदेशी बनावटीच्या मोटारी व मोटार सायकलींनी दक्षिण व्हिएतनामी शहरांचे रस्ते भरलेले असतात. तर उत्तर व्हिएतनामी शहरामध्ये सायकली-शिवाय दुसरे खाजगी वाहन नसते. बाकी बसेस आणि ट्राम्स्. उत्तर व्हिएत-नामी शहरांना आणि खेडयांना अमेरि-कन बाँबहल्ल्यांचा कायम धोका असतो. दक्षिणेतील खेडयांनाही हा धोका असतोच.

दक्षिण व्हिएतनामी राजवटीचे प्रमुख आधार म्हणजे लष्कर आणि अमेरिकन डॉलर्स. लष्कराचा आधार अमेरिकाच. म्हणजे पर्यायाने अमेरिकाच सर्वेसर्वा. व्हिएतनामी राजवटींना स्थिरता देण्या-साठी अमेरिकेने अब्जावधी डॉलर्स ओतले. त्यामुळे साहजिकच अमेरिकेला हा अधिकार प्राप्त झाला. दियेमनंतर कान्ह. त्याच्यानंतर काओ की आणि नंतर थिऊ यांना सत्तेवर आणण्यात आणि टिकविण्यात, त्यांची प्रतिमा वाढविण्यात किंवा खलास करण्यात अमेरिकेचा मोठाच हात असला पाहिजे यात शंका नाही. निवडणुकी होतात पण कम्युनिस्ट राजवटीत होणाऱ्या निवडणुकीपेक्षाही दक्षिण व्हिएतनाम-मधील निवडणुकीवर अमेरिकन जनता कमी विश्वास ठेवते. पण त्यात त्यांना

काही वाटत नाही. कान्ह आणि काओ की यांना सत्तेवरून हटविण्यात अमेरिकेचा मोठाच हात होता. अगदी परवाचा शांतता करार जेव्हा अध्यक्ष थिऊ मोडावयास निघाला होता तेव्हा वेळ आली तर थिऊला बाजूला काढणे कठीण नाही अशी स्पष्ट विधाने काही अमेरिकन नियतकालिकात आलेली दिसतील. एवढी अमेरिकेची ताकद आहे. अर्थात ती वेळ आली नाही. कारण कदाचित अमेरिकेलाच तशी वेळ आणायची नसेल. आणि अमेरिकेची ही ताकद ओळखून व्हिएतनामी अध्यक्ष वागत असतील तर त्यांना दोष कसा देता येईल ?

सायगावमध्ये हे असे राजकारण चालू असताना दक्षिण व्हिएतनामच्या ग्रामीण भागात व्हिएतकाँग आणि सरकारी दैनिक यांच्यात सतत रस्सीखेच चालू असते. अजूनही दक्षिण व्हिएतनाममधील सुमारे ऐंशी टक्के ग्रामीण भाग व्हिएतकाँगच्या ताब्यात आहे. दक्षिण व्हिएतनाममधील नॅशनल लिबरेशन फ्रंटचे हे प्रोव्हिजनल रिव्होल्यूशनरी गव्हर्नमेंट आपली नाणी पाडते, कर वसुली करते, शाळा चालविते, देशोदेशी आपले दूत आणि परराष्ट्र मंत्री मादाम बिन्ह हिला पाठविते. या ग्रामीण भागातले युद्ध सतत चालू आहे. उत्तर व्हिएतनाममधील हवाई हल्ल्यापेक्षाही हे युद्ध भयानक आहे. कारण उत्तरेला धोका फक्त आकाशातूनच. इथे धोका चारी बाजूंनी आणि आकाशातूनही. व्हिएतकाँगचे अड्डे म्हणून अमेरिकन विमाने दक्षिणेतील खेडीच्या खेडी उध्वस्त करून टाकतात. आणि या उध्वस्त झालेल्या खेड्यातील जिवंत राहिलेले लोक जेव्हा स्थलांतर करू लागतात तेव्हा 'व्हिएतकाँगच्या जाचातून मुक्त होण्यासाठी पळून येणारे निर्वासित' अशा मथळ्याखाली त्यांचे फोटो प्रसिद्ध करण्यात येतात. दक्षिण व्हिएतनाममधील बहुतेक निर्वासित छावण्यातील निर्वासित हे व्हिएतकाँगने निर्माण केले नसून व्हिएतनामी सरकारनेच केले आहेत हे अनेकांनी कबूल केले आहे.

फाळणी झाल्यावर जिनीव्हा कराराप्रमाणे दोन्ही देशात कोणीही कोणावर प्रतिशोध घेता कामा नये असे ठरले होते पण दोघांनीही हा करार पाळला नाही. अर्थात कोणाचे आरोप खरे आणि खोटे हे पडताळून पाहणे कठीण आहे. हो ची मिन्हने जेव्हा १९५४ साली करार करण्यास मान्यता दिली तेव्हा दक्षिण व्हिएतनाममधील व्हिएत मिन्हचा प्रमुख ली दुआन हा भडकला. फ्रान्सची इच्छा नाही. आणखी थोडे लढले तर अख्खा व्हिएतनाम ताब्यात येईल असे त्याचे म्हणणे होते आणि फाळणीमुळे आता दक्षिणेतील व्हिएतमिन्हची स्थिती वाईट होईल असे त्याला वाटत होते. झाले तसेच. सरकारी लष्कर दक्षिणेत उरलेल्या व्हिएतमिन्ह सैनिकांना कोंडीत पकडू लागले. याचा परिणाम म्हणून म्हणा किंवा आणखी कशाने उत्तरेतही शेकडो कम्युनिस्ट विरोधकांना कंठस्नान घालण्यात आले

असा दक्षिण सरकारचा आणि अमेरिकेचा आरोप आहे.

राजकीय दृष्टया उत्तर व्हिएतनामची स्थिती कशी होती ? चिनी व रशियन साम्यवादी राष्ट्रांशी उत्तरेचे अर्थातच जवळचे संबंध होते. उत्तर व्हिएतनामच्या जन्मापासून ही दोन्ही राष्ट्रे आपापला प्रभाव तेथे वाढविण्याचा प्रयत्न करीत होते. हो चे धोरण होरे मध्यममार्गी राहण्याचे. या धोरणाची मोठी कसोटी लागली ती १९६२ साली चिन आणि रशिया यांचे फाटल्यावर परंतु हो ने हे धोरण काही सोडले नाही. ली दुआन हा १९६० पासून कम्युनिस्ट पक्षाचा चिटणीस झाला. हो च्या मृत्यूनंतर त्यानेही हे असिधारा व्रत कायम ठेवले.

उत्तर व्हिएतनामची निष्ठा ही मास्कोशी की पेकींगशी असा संशय घेण्याचे कारण नाही. जाँ लकोचू म्हणतो उत्तर व्हिएतनामी सरकारची पक्षाची आणि लोकांची शुद्ध निष्ठा आहे हनोईशीच. मास्कोशी नाही आणि पेकींगशीही नाही. व्हिएतनामी युद्धाचे ध्येय काय ? असा प्रश्न विचारला असता होने सरळ उत्तर दिले होते. व्हिएतनामी लोकांचे स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा हीच आमची सर्वात महत्वाची मूल्ये.

दियेन बियेन फू च्या अगोदरपासून जरी व्हिएतनामी कम्युनिस्टांना रशियन शस्त्रास्त्रांची मदत थोडया फार प्रमाणात मिळत असली तरी हे मदतीचे प्रमाण फारच कमी होते. चीनने मोठया प्रमाणावर लक्षालत येण्यासारखी मदत कधीच केली नाही. शाब्दिक सहानुभूतीची मात्र खैरात केली. रशियन मदत मात्र वाढली ती अमेरिकेने उत्तरेवर बाँब हल्ले सुरू केल्यावर. रडार यंत्रणा, विमानवेधी तोफा, मार्गदर्शित क्षेपणास्त्रे आणि नंतर फायटर विमाने ही रशियाने पुरविली. परंतु मदत केलेल्या विमानांचे प्रमाण कमी दिसते. एरवी अमेरिकन बाँबर्सना उत्तरेतील नभांगण एवढे मोकळे मिळाले दिसते ना.

अमेरिकन बी–५२ बाँबर विमाने जवळ जवळ अजिक्य समजली जात. शत्रूच्या रडार लहरींना हुलकावण्या देऊन रडारवर प्रतिमा न येऊ देण्याची यत्रणा या विमानांमध्ये आहे. पण नुकत्याच नव्याने सुरू झालेल्या बाँबहल्ल्यांमध्ये उत्तर व्हिएतनामनेही कित्येक बी–५२ विमाने अचूक वेधून पाडली. त्यावरूनच व्हिएतनामनेच या विमानांना शोधून टिपणारी कोणतीतरी अचूक यंत्रणा शोधून काढली असावी अशी भीती अमेरिकनांना वाटू लागली आहे.

अमेरिकन बाँबहल्ल्यांपासून बचाव करण्यासाठी उत्तर व्हिएतनामी शहरांमध्ये भूमिगत बोगद्यांची जाळीच्या जाळी तयार केली होती. उत्तर व्हिएतनामचे सगळे जीवनच युद्धमय झालेले होते. बाँबहल्ल्यांनी झालेली नासधूस दुरुस्त करण्यासाठी बायका, मुले, म्हातारे यांचे कुशल ताफेच्या ताफे तयार होते. फुटलेले तलाव आणि बंधारे, तुटलेले रस्ते आणि मोडलेले पूल पुन्हा विजेच्या वेगाने बांधून काढण्यात उत्तर व्हिएत-

नामने नवेच प्रावीण्य मिळविले आहे. गेली आठ वर्षे उत्तर व्हिएतनामवर हवाई हल्ले चालू आहेत. अमेरिकेने कितीही सांगितले की हे बाँबिंग केवळ लष्करी लक्ष्यांपुरतेच मर्यादित आहे तरी त्यावर कोणाचा विश्वास बसत नाही. शाळा, इस्पितळे, हमरस्ते, परकीय दूतावास सारे काही या महाभयंकर बाँबवर्षावाच्या तावडीत सापडते. आणि ही नासधूस दुरुस्त करण्यासाठी, रस्ते मोकळे करण्यासाठी उत्तर व्हिएतनामी स्त्री-पुरुषांचे जथेच्या जथे रात्रंदिवस काम करीत होते. बहुतेक स्त्रियांचे कारण बहुतेक पुरुष प्रत्यक्ष लढाईवर गेलेले असतात. विमानविरोधी तोफांचे संचलनही बऱ्याच प्रमाणावर स्त्रियाच करतात. पेट्रोल लष्करासाठी वाचवावे लागते. म्हणून सारी नागरी हालचाल सायकलींवर. धान्याची ने-आणही सायकलींवरच. रेल्वे आणि पेट्रोल अत्यावश्यक असेल तेव्हाच नागरी कामासाठी.

हवाई हल्ले ज्या प्रमाणात उत्तर व्हिएतनाममध्ये होते तसेच ते दक्षिणेतही होतेच. दक्षिण व्हिएतनामच्या आकाशात रोज सुमारे हजार ते दीड हजार विमाने अक्षरशः आग ओकीत संचार करीत असतात. उत्तरेत या




जमीन

एकेक खेडे काबीज करीत निघालेली लालसेना

विमानांना विमानवेधी तोफांपासून बचाव करावा लागतो. मार्गदर्शित क्षेपणास्त्रे या विमानांच्या मागे लागतात. पण दक्षिणेचे नभांगण मात्र मोकळे असते. त्यांना प्रतिकार होत असतो तो केवळ शेवटचा प्रयत्न करणाऱ्या एखाद्या व्हिएतकाँगच्या रायफलीतून अथवा मशीनगनमधून. एखाद्या खेड्यात व्हिएतकाँगचा अड्डा आहे असे समजताच त्यावर टनावारी नापामचा वर्षाव करण्यात येतो. दक्षिणेतही अनेक ठिकाणी व्हिएतकाँग सैनिकांनी बाँबवर्षावापासून वाचवण्यासाठी बोगद्यांची, जाळी तयार केली आहेत. त्यावर उपाय म्हणून अमेरिकेने आपले सर्वात भयंकर अस्त्रदेखील तिथे आणले. ते म्हणजे बी–५२ विमाने. तीस हजार फुटांवरून या विमानांनी टाकलेल्या बाँबमुळे जमिनीखालीच दहा फूटावर असलेली भुयारेदेखील फुटन उघडी पडतात. प्रथम ही विमाने दक्षिणेत धुडगूस घालू लागली तेव्हा अमेरिकन साप्ताहिक 'टाईम'ने मोठ्या गर्वाने लिहिले, व्हिएतकाँगची आता झाप उडाली आहे. व्हिएतकाँगचे जिथे जिथे म्हणून अड्डे होते तिथे या विमानांनी एवढे बाँबिंग केले आहे की हे भाग विमानातून अक्षरश: चांद्रविवरांसारखे दिसतात. हवाई सामर्थ्य हे या



आणि आकाश

नुकताच बाँबहल्ला होऊन गेलेला असतो...

व्हिएतकाँगचा काळच ठरणार असे दिसते. आता खेड्यांमधे व्हिएतकाँगचे फारसे उत्साहाने स्वागत होत नाही. अधिकाधिक गनिमी सैनिक आता व्हिएतकाँगला सोडून जाऊ लागले आहेत. अधिकाधिक आपल्या हाती पडू लागले आहेत. 'टाईम'ने हे गर्विष्ठ वर्णन करून आता आठ वर्षे लोटली आहेत.

अमेरिकन अधिकारी, लष्कर आणि जनता अशा अहंकारी आत्मविश्वासात मश्गूल राहून व्हिएतनामी प्रतिकाराला तुच्छ लेखीत असताना मग तडजोडीची भाषा अमेरिकेत कशी सुरू झाली? जोपर्यंत आकाशातून अमेरिकन विमाने व्हिएतनामवरचे रूपांतर नरकपुरीत करीत होती तोवर अमेरिकन जनतेला त्याचे फारसे सोयरसुतक नव्हते. पण जेव्हा मोठ्या प्रमाणावर अमेरिकन भूसैनिक व्हिएतनाममधे प्रत्यक्ष लढू लागले आणि मोठ्या प्रमाणावर मृत्यू-मुखी पडू लागले तेव्हा कुठे धक्का बसल्यासारखी अमेरिकन जनता डोळे चोळीत जागी झाली आणि व्हिएतनाम-मधील भयकर प्रकाराविरुद्ध अमेरिकन जनमत प्रक्षुब्ध होऊ लागले. निदर्शने होऊ लागली.

संशयाचा कीडा सी. आय. ए. नेच १९६४ साली सोडला होता. खुद्द अमेरिकन सल्लागार तर गनिमी कारवायां-मध्ये १९६१ पासूनच मरू लागले होते. भू सैनिकांची पहिली तुकडी व्हिएत-नाममधे १९६५ मधे उतरली आणि मोठ्या संख्येने अमेरिकन मृत्यूमुखी पडू लागले. युद्धाच्या भयानकतेची अमेरिकेला प्रत्यक्ष जाणीव होऊ लागली. व्हिएतकाँगने १९६८ मधे एक नवाच आक्रमक पवित्रा घेतला. दक्षिण व्हिएत-नाममधे सर्व दूरवर सरकारी ठाण्यांवर, लष्करी तळांवर, विमानतळांवर जोर-दार हल्ले चढविले. या हल्ल्यांनी अमे-रिकन जनतेचे डोळे पूर्णपणे उघडले. आणि एवढे सैनिक पाठवूनही व्हिएत-नाममधील गनिमी कारवाया काही रोखल्या जात नाहीत याची खात्री पटली. लोकांमध्येही व्हिएतनाममधील खऱ्या परिस्थितीबद्दल शंका वाटू लागली. व्हिएतनाममधील व्हिएत-काँगच्या ताब्यात असलेल्या ग्रामीण भागाचा १९६० साली जो नकाशा होता त्यात मुळीच बदल झाला नव्हता. जो झाला असेल तो व्हिएतकाँगची व्याप्ती वाढण्यामधेच. खुद्द व्हिएतनाम-सैनिकांची लढण्याची जिद्द दिसत नव्हती. ज्यांच्या संरक्षणासाठी आपले तरुण हजारोंनी मृत्यूमुखी पडताहेत, तेच जर हातपाय गाळून स्वस्थ बसताहेत मग आपण तरी कशाला फुकट आपले रक्त सांडवावे असा विचार अमेरिकन जनतेत बळावू लागला आणि सैनिकांना परत बोलविण्याची मागणी अमेरिकेत बळावू लागली.

मार्च १९६८ मध्ये अखेर अनेक वर्षाच्या प्रयत्नानंतर व्हिएतनाममधील युद्ध संपवण्यासाठी बोलणी सुरू करण्याचे दोन्ही बाजूंनी मान्य केले. बोलणी करणाऱ्यांमधे कोणकोणत्या बाजूंनी

भाग घ्यावा येथपासून तो चर्चेच्या वेळचे टेबल कसे असावे अशा विषयां-वर रण माजले. उत्तर व्हिएतनाम व दक्षिण व्हिएतनामचे क्रांतीकारी सरकार एका पक्षाला तर अमेरिका व दक्षिणेचे गणराज्य दुसऱ्या अशी बोलणी पॅरीस मधे सुरू झाली. आणि त्यानिमित्ताने अमेरिकेने ऑक्टोबर अखेरपर्यंत उत्तरे-वरील हवाई हल्ले तात्पुरते स्थगित केले. आणि अध्यक्ष निक्सन यांनी गादी-वर आल्यावर १९६९ मध्ये व्हिएत-नाममधून अमेरिकन भूसैनिकांना क्रमा-क्रमाने परत बोलाविण्याची घोषणा केली. व्हिएतकाँगशी जमिनीवर लढण्या-साठी व्हिएतनामी सैनिकांना तयार करायचे आणि फक्त आवश्यक तेवढेच अमेरिकन सैनिक तिथे ठेवायचे. दक्षिण आणि उत्तर व्हिएतनामवरील अमेरिकन हवाई प्रभुत्व कायम ठेवायचे कारण हवाई ताकद कितीही वापरली तरी त्यामुळे भूसैनिकांपेक्षा मृत्यूचे प्रमाण कमीच राहते. असे हे धोरण होते. निक्सनने ही घोषणा केली तेव्हा व्हिएतनाममधील अमेरिकन भूसैनिकांची संख्या ५,४३,४०० येथपर्यंत पोचली होती.

परंतु अमेरिकन सैनिकांची संख्या कमी केल्याने युद्धाची तीव्रता कमी झाली नाही. उलट सैनिकांच्या ऐवजी हवाई सामर्थ्य अधिक मोठ्या प्रमाणात वापरले जात असल्याने लढाईची भया-नकता तर अधिकच वाढली. अमेरिकन सैन्य परतत असताना व्हिएतनाममधे पोकळी राहिलेली आहे, असे दिसता कामा नये म्हणून अमेरिकन सैनिक आणि दक्षिण व्हिएतनामी सैनिक यांनी मिळून एप्रिल १९७० मधे व्हिएतनाम आणि शेजारचा कांबोडिया यामधील कम्युनिस्टांच्या अड्यावर प्रचंड हल्ले चढविले. डिसेंबर १९७१ मधे व्हिएत-नाममधील अमेरिकन भूसैनिकांची संख्या अवघी १ लाख ५७ हजार एवढी उरली.

या गोष्टीचा फायदा घेण्यासाठी किंवा आणखी कशासाठी म्हणा, पण मार्च १९७२ मध्ये व्हिएतकाँग सैनि-कांनी आणि उत्तर व्हिएतनामी सैनिकांनी दक्षिणेत ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर हल्ले केले. आणि व्हिएत-नामी फौजांची दाणादाण केली. सतराव्या अक्षांशाला लागून असलेले क्वांग त्री हे शहर सात दिवसात कोसळले आणि दक्षिण व्हिएतनामी सैनिकांना पळता भुई थोडी झाली. कम्युनिस्ट सैनिकांनी थेट हे या जुन्या राजघराण्याच्या शहरापर्यंत मजल मारली. क्वांग त्री मधे तर क्रांती सरकारचा ध्वजही उभारला. अक्षरशः हजारो सैनिक घाबरून आपापली शस्त्रास्त्रे टाकून पळून आले. हे शहर सोडणाऱ्या सैनिकांना गोळ्या घालण्यात येतील असे सांगण्यात आल्यावरच तेथे दक्षिण व्हिएतनामी सैनिक टिकून राहिले. एरवी दक्षिण व्हिएतनामी सैनिकांना लढण्याची इच्छाच दिसत नाही हे उघड झाले. मग आतापर्यंत कोण लढत होते? अमेरिकन सैनिक? कुणासाठी? जिथून जिथून अमेरिकन

सल्लागार निघून जातील तिथे तिथे बारीकसा हल्ला होताच व्हिएतनामी सैन्य पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळू लागले. व्हिएतनामात अद्याप साठ ते सत्तर हजार अमेरिकन सैनिक उरले होते. व्हिएतकाँग आणि उत्तर व्हिएतनामी सैनिक असेच पुढे येत राहिले तर त्यांना धोका होता. एवढेच नव्हे तर सारे अमेरिकन धोरण धोक्यात आले होते.

यावर उपाय म्हणून अध्यक्ष निक्सन याने उत्तर व्हिएतनामी शहरांवर जोरदार हल्ले सुरू केले. आणि उत्तर व्हिएतनामी बंदरांमधे पाणसुरुंग पेरण्यास १९७२ मधे सुरुवात केली. लष्करी दृष्टया हा निर्णय भलताच धोक्याचा होता. कोणत्याही देशाच्या जहाजाने उत्तर व्हिएतनामला कोणत्याही प्रकारची मदत करू नये यासाठी हे पाणसुरुंग पेरण्यात येत होते. हा मोठा धोका होता. कारण उत्तर व्हिएतनामी बंदरांमध्ये सगळ्यात जास्त जा ये होती ती रशियन जहाजांची. रशिया प्रतिकार करणार नाही कशावरून ?

अमेरिकन जनतेला उद्देशून भाषण करताना निक्सनने सांगितले, ' उत्तरेच्या आक्रमणामुळे व्हिएतनाममधील सुमारे ६०,००० अमेरिकनांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. अमेरिकन जीवित आणि सन्मान यांच्या रक्षणासाठी आम्ही वाटेल ते करू. खरे म्हणजे या ६०,००० अमेरिकनांना ताबडतोब परत आणणे हा सगळ्यात सोपा उपाय आहे. परंतु अशी माघार घेणे म्हणजे अमेरिकेने पराभव पत्करण्यासारखे आहे. आणि हा पराभव पत्करला तर सर्व जगभर कम्युनिस्ट आक्रमणाला जोर येईल आणि स्वतंत्र जगाचे अस्तित्वच धोक्यात येईल."

आठवडाभर सर्व जगभर साधारण तणावाचे वातावरण होते. रशिया काय पाऊल टाकते याकडे सर्वांचे लक्ष होते. पण धमक्या, निर्भत्सना आणि इशारे या व्यतिरिक्त चीन आणि रशिया यांनी काहीही केले नाही. लवकरच उत्तर व्हिएतनामी फौजांचे दक्षिणेकडील मार्गक्रमण थांबले. निक्सनने टाकलेले धोक्याचे पाऊल यशस्वी ठरले.

नोव्हेंबर-डिसेंबर १९७२ मध्ये अमेरिका व उत्तर व्हिएतनाम अगदी "शांततेच्या टोकावर" पोचले होते. करार तयार होता. फक्त सह्या करायच्या तेवढ्या उरल्या होत्या. मे १९७२ च्या आणीबाणीच्या प्रसगाचाच हा परिपाक होता. जमिनीवर आणि हवेतून आपण कितीही लढलो तरी व्हिएतकाँगचा प्रश्न काही आपण कायमचा मिटवू शकत नाही हे अमेरिकेच्या ध्यानात आले होते. युद्धाची व्यर्थताही अमेरिकेच्या लक्षात आली होती. वर्षानुवर्षे एवढा खर्च सोसायचा, एवढे जीव बळी द्यायचे ते कशासाठी ? ज्या लोकांची लढण्याची इच्छा नाही त्यांच्यासाठी ?

पॅरीसमध्ये शांततेसाठी बोलणी करण्याचे नाटक १९६८ पासूनच चालू होते. या बोलण्यांना खरे वळण मिळाले

ते डॉ. हेन्री किसिंजरच्या आग्रहामुळे. बांगलादेश प्रकरणात डॉ. किसिंजर कितीही बदनाम झाला असला तरी रशिया आणि चीनशी अमेरिकेचे जुळवून घेण्यात त्याचा मोठा वाटा आहे. त्याचप्रमाणे व्हिएतनाममध्ये शांतता प्रस्थापित करण्याचे त्याचे प्रयत्नही कळकळीचे आणि मनापासूनचे आहेत हे उघड आहे. उत्तर व्हिएतनामचा ली डुस थो आणि डॉ. किसिंजर यांच्यात जेव्हा गुप्त वाटाघाटींना पॅरीसमध्ये प्रारंभ झाला तेव्हाच या शांततेच्या बोलण्यांना वास्तवतेचे वळण लाभले तोवर ही बोलणी हवेतच होत होती. आणि त्यातून काही निष्पन्न होईल यावर कुणाचा विश्वास नव्हता. परंतु नोव्हेंबरमध्ये डॉ. किसिंजरने "शांतता अगदी हाताशी आहे" असे जे विधान केले ते वेगळे होते. आतापर्यंत अनेकदा अशा आशा निर्माण झाल्या होत्या. पण यावेळी शांततेच्या कराराच्या प्रती तयार होत्या. त्यावर फक्त सह्याच तेवढ्या व्हायच्या राहिल्या होत्या. कराराच्या अटी अशा होत्या.

करारावर सह्या होताच चोवीस तासाच्या आत दक्षिणेत शस्त्रबंदी होईल आणि अमेरिका उत्तरेवरील हवाई हल्ले व उत्तरेतील बंदरात सुरुंग पेरणे थांबवेल. अमेरिकन सैन्य दक्षिण व्हिएतनाममधून साठ दिवसांच्या आत परत जाईल आणि अमेरिका दक्षिण व्हिएतनामच्या अंतर्गत कारभारात दखल घेणार नाही.

उत्तर व्हिएतनामने पकडलेले सर्व लष्करी व नागरी कैदी—अमेरिकनांसह—साठ दिवसांच्या आत मुक्त करण्यात येतील. व्हिएतकाँग व सायगाव सरकार हे आपापसात चर्चा करून दक्षिणेत अटकेत असलेल्या नागरी कैद्यांची सुटका करतील.

आंतरराष्ट्रीय देखरेखीखाली घेतलेल्या मुक्त निवडणुकामधून व्हिएतनामी लोक आपले राजकीय भवितव्य ठरवितील. व्हिएतकाँग आणि सायगाव सरकार आपापले लष्कर कुठे ठेवावे या बाबतीत आणि इतर सर्व अंतर्गत बाबीवर तीन महिन्याच्या आत करार करतील.

दोन लष्करी मंडळे निर्मिण्यात येतील. अमेरिका, हनोई, सायगाव आणि व्हिएतकाँग या चौघांचे एक. आणि सायगाव व व्हिएतकाँग या दोघांचे एक. आपापसातील लष्करी प्रश्न ही मंडळे सामोपचाराने सोडवितील.

लाओस आणि कांबोडियामधून या चारही शक्ती आपापली लष्करे काढून घेतील.

युद्धामुळे व्हिएतनाम, लाओस व कांबोडियामध्ये जी नासधूस झाली आहे ती भरून काढून पुनर्रचनेच्या कार्यात अमेरिका मदत करील.

उत्तर व दक्षिण व्हिएतनामचे एकी-

## कराराच्या अटी अशा होत्या...

करण शांततापूर्वक मार्गाने करण्यात येईल.

डॉ. किसिंजर आणि हनोई रेडियो या दोघांनीही या कराराच्या अटी जाहीर केल्या होत्या. त्यावरून त्यांचे यावर एकमत झाले होते हे स्पष्ट दिसते. दोन्ही बाजूंच्या घोषणामुळे व्हिएतनाम युद्धाचा शेवट खरोखरच नजीक आला असे सगळ्यांना वाटू लागले. सर्वच नव्या आशांचे अंकुर फुटले. ऑक्टोबर ३१ ही सह्या करण्याची तारीख ठरली होती.

परंतु मध्येच माशी कुठे शिंकली कुणास ठाऊक. ठरल्याप्रमाणे ३१ ऑक्टोबरला तर सह्या झाल्या नाहीतच पण एकामागून एक कारणे निघत सह्यांचा दिवस पुढेच ढकलला जात राहिला. अमेरिकन अध्यक्षाची निवडणूक होऊन गेली आणि अखेर डिसेंबरमध्ये तर निक्सनने पुन्हा उत्तर व्हिएतनामवर अधिक जोराने बॉंब हल्ले करण्याची आज्ञा सोडली.

कराराच्या बाबतीत एवढे एकमत होऊनही नेमके बिनसले कुठे याबाबतीत अजूनही जरा रहस्यच आहे. हनोईचा आरोप असा की अमेरिकेनेच माघार घेऊन विश्वासघात केला. अमेरिकेचे म्हणणे असे की कराराच्या साधारण अटी ठरल्या असल्या तरी–तरी अटींचा शेवटचा मसुदा अद्याप ठरायचा होता. काही बातम्या अशा की करार करताना आपल्याला विचारले नाही आणि करारात दक्षिण व्हिएतनामला पुरेसा वाटा नव्हता म्हणून दक्षिण व्हिएतनामी अध्यक्ष न् गुयेन व्हान थिऊ याने या कराराला कसून विरोध केला. या कराराची परिणती थिऊ सत्तेवरून भ्रष्ट होण्यात झाली असती हे उघड होते. आणखी काही बातम्यांप्रमाणे डॉ. किसींजरने उत्तर व्हिएतनामला या करारात ज्या मुबलक सवलती दिल्या त्या अध्यक्ष निक्सनला मान्य नव्हत्या आणि त्याचे पित्त खवळले. किसींजर आणि निक्सन यांचे या सुमारास बरेच फाटले असल्याच्याही वावड्या होत्या. ते काहीही असो. पण अशा रीतीने व्हिएतनाम शांततेचा करार असा अगदी हाताशी आला असताना पुन्हा एकदा प्रकरण विघडले आणि उत्तरेवरील सर्वात भयानक अशा हवाई हल्ल्यांना पुन्हा जोराने सुरुवात झाली.

या वेळी झालेल्या हवाई हल्ल्यांना खरोखर युद्धाच्या इतिहासात तोड नाही. लष्करी लक्ष्यावर हल्ले करीत असल्याचा बुरखाही यावेळी अमेरिकेने धारण केला नाही. अमेरिकन बी–५२ विमाने बिनदिक्कतपणे व्हिएतनामी शहरांवर अग्निवर्षाव करू लागली.

अमेरिकेच्या या अभूतपूर्व अमानुष हवाई हल्ल्यांचे प्रयोजन काय? तर पुन्हा वाटाघाटी करण्यास हनोईला भाग पाडणे; आणि वाटाघाटी करताना हनोईला जरा कमीच सवलती देणे. मागच्या कराराला हनोई तयार झाले होते ते अशा बॉंबिंगमुळेच आणि आताही या हल्ल्यांच्या दबावामुळे उत्तर व्हिएतनाम पुन्हा वाटाघाटी करण्यास तयार

होईल असा निक्सनचा अंदाज होता आणि शिवाय हवाई सामर्थ्य हे अमेरिकेचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे. हवाई सामर्थ्य वापरणे सोपे आहे. नेमके काय घडते आहे हे लोकांना कळत नाही. भूसैनिक वापरल्याने जेवढा गाजावाजा होतो तेवढा होत नाही. सैनिकी अत्याचाराचे फोटो प्रसिद्ध होत नाहीत की सनसनाटी कथा छापून येत नाहीत. शिवाय बी-५२ विमाने पस्तीस-चाळीस हजार फूट उंचीवरून बाँबहल्ले करतात आणि आतापर्यंत तर ही अजस्त्र बाँबफेकी विमाने जवळ जवळ अजिंक्य समजली जात होती. त्यामुळे अमेरिकनांची मृत्यूसंख्याही फारशी वाढत नव्हती. बरे, दक्षिण व्हिएतनामी सैनिकांचाही तसा या बाँबफेकीशी संबंध येत नाही. त्यामुळे त्यांच्या अकार्यक्षमतेचीही परीक्षा नको. जगभरचे लोकमत प्रक्षुब्ध होऊन बोंब मार मारून गप्प बसेल. रशिया प्रत्यक्ष युद्धात उतरणे शक्य नाही हे मागे पाणसुरुंग पेरले तेव्हाच उघड झाले. रशिया जास्तीत जास्त काय करील तर उत्तर व्हिएतनामला अधिकाधिक शस्त्रे, अस्त्रे, विमानवेधी क्षेपणास्त्रे पुरवील. विमाने पुरवील. अमेरिकेला हे हवेच आहे. त्यामुळे निदान रशियन शस्त्रास्त्रांचे सामर्थ्य आणि त्यांची कार्यक्षमता तरी पडताळून पाहता येईल. जोपर्यंत अमेरिका अण्वस्त्रे वापरीत नाही तोपर्यंत रशिया प्रत्यक्षपणे युद्धात उतरणार नाही. तोपर्यंत व्हिएतनाम म्हणजे या दोन्ही बडया राष्ट्रांच्या शस्त्रास्त्रांची क्रूर प्रयोगशाळा म्हणूनच वापरले जाईल. व्हिएतनाममध्ये नव्याने हवाई हल्ले सुरू झाले तेव्हा कम्युनिस्ट चीननेही शाब्दिक आकांडतांडव करण्यापलिकडे फारसे काही केले नाही. यावेळचा आणखी एक विशेष म्हणजे या हवाई हल्ल्यांबद्दल चीनने अमेरिकेचा जो निषेध केला आहे त्यात अध्यक्ष निक्सन यास चुकूनही दोष दिलेला नाही. कारण अमेरिकेशी जुळवून घेण्यास चीन उत्सुक झालेला आहे. देशातील दुष्काळ आणि जागतिक राजकारणाचा दबाव यामुळे चीनला अमेरिकेच्या मैत्रीची गरज आहे आणि इतर सर्व शाहण्या राष्ट्राप्रमाणे निखळ स्वार्थ हात चीनच्याही परराष्ट्र धोरणाचा केन्द्रबिन्दू आहे. त्यामुळे निक्सनला न दुखावता चीन सध्या अमेरिकेची लाजेकाजेस्तव निर्भत्सना करीत आहे. म्हणून निक्सन निर्धास्त आहे. कारण या जागतिक परिस्थितीत उत्तर व्हिएतनाम जवळ जवळ एकाकी आहे. हवाई हल्ल्याचा दाब वाढविला तर काही तडजोडी करण्यास उत्तर व्हिएतनाम तयार होईल अशी आशा अमेरिकेला वाटते ती त्यामुळेच. वाटाघाटीची दुसरी फेरी पॅरीसमध्ये सुरू झाली ती याच दडपणाखाली.

दुसऱ्या फेरीच्या वाटाघाटींचे फलित आता पुन्हा दृष्टीपथात आल्यासारखे दिसत आहे. अध्यक्ष निक्सनने १५ जानेवारी रोजी हवाई हल्ले थांबविण्याची तात्पुरती आज्ञा सोडली. व्हिएतनाम शांतता पुन्हा हाताशी

आल्याचे वातावरण सर्वत्र पसरले. परंतु अजून खात्री नाही. आधुनिक काळातील हे सर्वात लांब आणि भयानक युद्ध अद्याप चालूच आहे.

शांततेचा कयमचा पडदा या भयानक लढाईवर जेव्हा पडेल तेव्हा पडो. पण त्या आधीच लष्करी संहाराच्या बाबतीत हे युद्ध अभूतपूर्व ठरले आहे. उणे-पुरे तीस वर्षे हे युद्ध चालू आहे आणि जगाने कधीही अनुभवले नव्हते अशा प्रचंड प्रमाणावर गेली आठ वर्षे भयानक हवाई हल्ले उत्तर व्हिएतनामवर सतत चालू होते. जीवितहानी, खर्च आणि स्थानिक भूभागाचे बाँबवर्षामुळे विद्रूप झालेले स्वरूप हे आतापर्यंतच्या कोणत्याही युद्धापेक्षा अधिक भयावह आहे. जगातील सर्वात धनाढ्य आणि सर्वशक्तिमान असे अमेरिकन राष्ट्र आपल्या अत्याधुनिक शस्त्रांनीही एका गरीब, शेतकीप्रधान चिमुकल्या राष्ट्राला नमवू शकले नाही; हे कसे झाले यावर यापुढे अनेक वर्षे लोक आश्चर्य करीत बसतील.

या सबंध तीस वर्षांच्या युद्धात किती जीवितहानी झाली हे जरी नक्की सांगता येत नसले तरी १९६१ साली जेव्हा अमेरिकेने स्वतःला युद्धात गुंतवून घेतले तेव्हापासूनची, म्हणजे गेल्या अकरा वर्षांतली आकडेवारी मात्र उपलब्ध आहे. ती वाचून घेरी आल्याशिवाय राहणार नाही.

या गेल्या बारा वर्षामधे व्हिएतनामच्या युद्धात एकूण अकरा लाख पाच हजार माणसे सर्व बाजूंनी मृत्युमुखी पडली! जखमींचा आकडा एकवीस लाख बेचाळीस हजार एवढा आहे! आणि हे सगळे अधिकृत आकडे. मृतांचे आकडे कितीतरी जास्त असण्याची शक्यता आहे. केवढी भयानक ही जीवितहानी!

ठार झालेल्यांमधे अमेरिकन्स आहेत ४५,८५७; दक्षिण व्हिएतनामी १,८६,७०४; ऑस्ट्रेलियन्स आणि इतर: ५,१३०; आणि उत्तर व्हिएतनामी: ८,६७,८८१.

जखमी सैनिकांमधे अमेरिकन्स् आहेत: ३,०२,३२२; दक्षिण व्हिएतनामी: ४,७६,८५९; ऑस्ट्रेलियन्स व इतर: ११,८०७; उत्तर व्हिएतनामी: १३,५०,०००.

मृतांचे आणि जखमींचे आकडे लढाऊ सैनिकांच्या बाबतीतले आहेत. हवाई हल्ल्यांमधे, घातपातांच्या कृत्यांमधे आणि सैनिकी कारवायांमधे किती नागरी स्त्री, पुरुष, मुले बळी पडली याला गणतीच नाही.

आणि खर्च? एकट्या अमेरिकेने नोव्हेंबर १९७२ पर्यंत या युद्धावर ९८,९२० कोटी रुपये खर्च केले! इतरांच्या खर्चाचा अंदाज नाही.

किती कुटुंबे देशोधडीला लागली? अमेरिकन अधिकृत आकड्यांवर विश्वास ठेवायचा असला तर दक्षिण व्हिएतनामात सुमारे चौसष्ट लाख, कांबोडियात वीस लाख आणि लाओसमधे दहा लाख निर्वासित झाले.

एकूण किती स्फोटक बाँम्स् या युद्धात वापरले गेले याची तर खरीखुरी

गणती कधीच लागायची नाही. एका अंदाजाप्रमाणे एकट्या अमेरिकेने सबंध युद्धात हिरोशिमावर जो परमाणु बॉंब टाकला होता त्याच्या तीनशे पटीने स्फोटक द्रव्ये वापरली. दुसऱ्या महायुद्धात अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, रशिया आदी सर्व दोस्त राष्ट्रांनी मिळून १९४० ते १९४५ या पाच वर्षांच्या काळात जर्मनीवर जेवढे बॉम्ब्स् टाकले त्यांच्यापेक्षा जास्त बॉम्ब्स् एकट्या अमेरिकेच्या हवाई दलाने अवघ्या गेल्या दोन वर्षांत व्हिएतनामवर ओतले आहेत. अमेरिकन भूदलाने आणि नाविक दलाने गेल्या दोन वर्षांत सुमारे साडेआठ लाख टन दारुगोळा व्हिएतनाममध्ये ओतला तो वेगळाच. हे आकडे आहेत मे १९७२ पर्यंतचे आणि युद्धाची भयानकता तर मेनंतर कितीतरी पटीने वाढली आहे. एकट्या जूनमध्ये अमेरिकेने साडेपाच हिरोशिमा बॉंब एवढी स्फोटक द्रव्ये ओतली.

याव्यतिरिक्त गनिमी सैनिकांना हुडकून काढण्यासाठी अमेरिकनांनी कितीतरी जंगलांना आगी लावून दिल्या. जंगलांचे पट्टेच्या पट्टे वैराण करून टाकले. काही अमेरिकन शास्त्रज्ञांच्या मते वा वैराण झालेल्या पट्ट्यांवर पुनश्च वनसंपत्ती उगविण्यास शंभर वर्षांच्या वर वेळ लागेल.

हा भयंकर संहार खुद्द अमेरिकेत किंवा एखाद्या युरोपियन राष्ट्रांत झाला असता तर...आणि एवढ्या अभूतपूर्व संहारानंतरही अजून अमेरिकेत तर प्रश्न विचारला जात असे, 'हे युद्ध खरोखरच आवश्यक आहे?' कुणासाठी हे युद्ध? व्हिएतनामी जनतेसाठी? उलट सर्वांत जास्त सोसावे लागते ते तर व्हिएतनामी जनतेलाच. अमेरिकेपासून हे युद्ध घडते आहे सुमारे बारा हजार मैल अंतरावर. युद्धाची झळ पोचत असेल ती मृतांच्या किंवा जखमींच्या कुटुंबांना. टेलिव्हिजन किंवा वृत्तपत्रे यातून प्रतीत होणारी युद्धाची विदारकता अमेरिकन जनतेला फारशी भेडसावीत नसावी. कारण प्रतीकात्मक विरोधाची जी थोडीफार निदर्शने


# एका पराभवाची कहाणी

ले. : ब्रिगेडियर जे. पी. दळवी

अनुवाद : अनंत भावे

मूल्य : पंधरा रुपये

राजहंस प्रकाशन

केवडयाचा ओढा
पहारा
काळदरीचे काळीज
भास्करबुवा
चंदर
भवानबंकी
हिरा
बापू
सरकारवाडा

आगामी
कथासंग्रह

# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

राजहंस
प्रकाशन

अमेरिकेत होतात तेवढाच नव्याने सुरू झालेल्या बाँबिंगविषयीचा अमेरिकन संताप. एक न्यूयॉर्क टाईम्स सोडल्यास दुसऱ्या कोणत्याही मोठ्या अमेरिकन वृत्तपत्राने या अग्निवर्षावाविषयी निषेध नोंदविला नाही. बहुतेकांच्या प्रतिक्रिया याविषयी साधारणतः मलूलच आहेत. थोडक्यात म्हणजे अमेरिकन जनतेचा निक्सनच्या युद्धविषयक धोरणांना पाठिंबा होता. त्याशिवाय तो एवढ्या भरघोस मतांनी निवडून आलाच नसता. अमेरिकन जनतेच्या मानसिक संवेदनाक्षमतेवरच या युद्धाचा परिणाम होऊ लागला आहे की काय अशी भीती काही अमेरिकन तज्ञच व्यक्त करू लागले आहेत.

आणि व्हिएतनामी ? उभ्या व्हिएत-नाममध्ये (उत्तर व दक्षिण) अशी एकही व्यक्ती नसेल की जिला या युद्धाची प्रत्यक्ष झळ पोचलेली नाही. बाया-बापड्यांनी आपले नवरे, मुलं गमावली आहेत. मुला-बाळांनी त्यांचे बाप, काका, मामा कोणीतरी ठार होताना पाहिले आहे. याची झोपडी जळालेली तर त्याचे शेत नापामने उध्वस्त केलेले. याची म्हैस बाँबवर्षा-वात ठार झालेली तर त्याची आजी मेलेली. यातनांचे चटके साऱ्यांनाच बसले आहेत. अठरा ते पस्तीस वर्षे वयाच्या सर्वांनाच लष्करी सेवेत काही वर्षे घालवावी लागतात. असे हे सर्व-स्पर्शी युद्ध कधी संपते याची सर्वच वाट पाहत असणार. आणि तरीही जमिनीवर पाय घट्ट रोवून ताठ मानेने दक्षिणेतील व्हिएतकाँग आणि उत्तर व्हिएतनामी लढत आहेत कशासाठी ? मॉस्को किंवा पेकिंगच्या दावणीला बांधून घेण्यासाठी ? जे राष्ट्र तीस वर्षे एकाकीपणे एका अतिबलाढ्य राष्ट्राशी आपल्या केवळ जिद्दीच्या जोरावर झुंजीत राहिले तो देश काय तिसऱ्याच राष्ट्राचे उच्छिष्ट चाटून घेण्यास मान्यता देणार ? या युद्धातून व्हिएत-नाम एकसंघपणे बाहेर पडले तर सबंध आग्नेय आशियात त्याएवढे सामर्थ्यवान व चैतन्यशील राष्ट्र दुसरे नसेल. स्वकर्तृत्वाने संकटातून बाहेर पडलेले राष्ट्र नेहमीच वेगाने प्रगतीची शिखरे गाठते. तसेच व्हिएतनामचे होईल. तापलेल्या भट्टीतून बाहेर काढलेल्या सुवर्णाप्रमाणे व्हिएतनाम लखलख होईल. कारण या राष्ट्रासाठी अकरा लाख जवानांनी आपले रक्त सांडलेले आहे !

● ● ●

# हो ची मिन्ह मार्ग

चाचा हो ची मिन्ह हा स्वत: अत्यंत शिस्तबद्ध, प्रसिद्धी-पराङ्मुख आणि स्वत: मागे राहून इतरांना पुढे पुढे प्रसिद्धीच्या झोतात ढकलणारा. स्वत:च्या हयातीत त्याने उत्तर व्हिएतनामच्या कोणत्याही रस्त्याला, चौकाला वास्तूला अथवा उद्यानाला स्वत:चे नाव देऊ दिले नाही.

परंतु त्याच्या हयातीतच एका विलक्षण मार्गाला अमेरिकनांनी मात्र त्याचे नाव दिले – हो ची मिन्ह ट्रेल. हा काही राजमार्ग नव्हे; किंवा एखादा मोटर रस्ताही नव्हे. या विचित्र मार्गाला रस्ता म्हणणेच चुकीचे आहे. उत्तर व्हिएतनाममधून दक्षिणेकडील व्हिएतकाँगच्या सैनिकांना ज्या मार्गाने शस्त्रास्त्रे व दारुगोळ्यांचा पुरवठा होतो तो हा मार्ग. उत्तर व्हिएतनामी व्हिएत मिन्ह सैनिकही याच मार्गाने दक्षिणेत व्हिएतकाँगची संख्या फुगवण्यासाठी उत्तरेत असतात असा आरोप आहे. उत्तर-दक्षिण व्हिएतनामच्या आधुनिक इतिहासात या मार्गाला मोठे रोमहर्षक महत्व प्राप्त झाले आहे. जेव्हा कधी व्हिएतनाम एक होईल तेव्हा चिनी क्रांतिकारकांनी आपल्या लाँग मार्चचे जसे उदात्तीकरण केले तसे या मार्गाचेही होईल यात शकाच नाही.

हा काही एकच मार्ग नव्हे. अनेक मार्गांचे, उपमार्गांचे, भूमिगत बोगद्यांचे पायवाटांचे समांतर जाणारे जाळे म्हणजेच हो चि मिन्ह ट्रेल. हजारो व्हिएत मिन्ह सैनिक आणि प्रचंड शस्त्रास्त्रे व दारुगोळा आतापर्यंत दक्षिणेत आला आहे. उत्तर व्हिएतनामच्या दक्षिण भागातून अन्नामी पर्वताच्या तीन खिंडीतून काही वाटा लाओसमध्ये उतरतात. हा या ट्रेलचा पहिला भाग. तेथून कांबोडिया व व्हिएतनाममधील घनदाट जंगली आणि डोंगराळ टापूतून या वाटा दक्षिणेकडे सरकतात आणि अनेक ठिकाणाहून त्या दक्षिण व्हिएतनाममध्ये घुसतात. कुठे रस्ते पन्नास ते साठ फूट रुंद आहेत. कुठे भूमिगत आहेत. या वाटांवरून व्हिएत मिन्ह सैनिकाला दक्षिणेत पोचण्यासाठी तीन ते चार हजार मैलांचा प्रवास करावा लागतो.

हा प्रचंड मार्ग रोखण्यासाठी अमेरिकन हवाईदलाने आटोकाट प्रयत्न केले. पण वर्ष. १९६३–६४ पासून अमेरिकन बाँबर विमानांनी या मार्गावरचे आघात कधी थांबवले नाहीत. पण बोट घालून मुंग्यांची रांग तोडताच मुंग्या दुसरी रांग लगेच करतात तसेच या मार्गाचेही आहे. एक वाट बंद झाल्यास दुसरी, दुसरी झाल्यास तिसरी असा या वाटेवरील खडतर प्रवास चालूच असतो.

सैनिकांना जवळ जवळ सर्वच प्रवास पायी करावा लागतो. खांद्यावर स्वतःची शस्त्रे आणि अन्न वाहून न्यावे लागते. एका थांब्यापासून दुसऱ्या थांब्यापर्यंत अशी मजल दरमजल पायी चालत इष्ट स्थळी पोचायला तीन-चार महिने लागतात. थांबे म्हणजे गुहा. बहुतेक प्रवास रात्रीच्या मिट्ट काळोखात. कारण वर आकाशात अमेरिकन विमानांच्या घिरटया कधी थांबत नाहीत. या प्रवासातच अनेकजण मृत्यूमुखी पडतात. अमेरिकन अंदाजाप्रमाणे या वाटेवरचे देह ठेवणाऱ्या व्हिएत मिन्ह सैनिकांचे प्रमाण एक तृतियांश एवढे असावे.

दक्षिणेत पुरविला जाणारा दारूगोळा आणि मोठी शस्त्रे ट्रक्स्‌मधून नेण्यात येतात. पण थेट प्रवासाचा रस्ता नसल्याने या मार्गाचे अनेक भाग पाडू ट्रक्स्‌च्या तांडयांना हे भाग वाटून दिलेले असतात. एका थांब्यावरून सामान उचलून दुसऱ्या थांब्यांपर्यंत नेणे आणि परतणे एवढेच काम. दोन थांब्यांमधील अंतर कुठे पन्नास मैल तर कुठे दोनशे. दिवसा हे ट्रक्स् गुहांमधेच छपून असतात. रात्री हेडलाईट्स बंद करून निघतात. डोळे मिटून वाहन चालवायची ड्रायव्हर्सना सवय होते एवढा मिट्ट काळोख. रस्ताही तेवढा ओळखीचा व सरावाचा होतो.

ज्या दोन थांब्यांमधे ट्रक जात नाही नाही तिथे हे सामान सैनिक खांद्यावरून वाहून नेतात. नद्या, नाले, खिंडी अशा खडतर भागातून शेकडो मैल ही जड शस्त्रास्त्रे अंगावर वाहून न्यावी लागतात.

दक्षिण व्हिएतनाममधे व्हिएत कॉंग जी शस्त्रे वापरतात ज्या गोळया झाडतात त्यामागे असा दोन ते तीन महिन्याच्या प्रवासाचा इतिहास असतो. म्हणून ते दारूगोळा अतिशय काटकसरीने वापरतात. पावसाळयात हा मार्ग बंद पडल्यासारखा होतो. कारण दळणवळण कठीण होऊन बसते. पण महत्त्वाच्या गोष्टींची धीमे धीमे वाहतूक सुरू असतेच.

दक्षिण-उत्तर व्हिएतनाममध्ये हवाई हल्ले सुरू करण्यापूर्वी कितीतरी आधीपासून अमेरिकन हवाई दलाची विमाने गुपचूपपणे या मार्गावर बाँब वर्षाव करीत होती. भारत-पाक युद्धात भारतीय विमाने लढाईच्या आत्युच्च काळात दिवसाला तीनशे ते साडतीनशे सॉर्टीज करीत. अमेरिकन विमाने रोज कमीत कमी तेवढ्याच सॉर्टीज हो ची मिन्ह ट्रेलवर करीत होती. नेमका मार्ग कोणता हे कोणालाच माहित नव्हते. पण दिवसा या भागात कोणतीही वस्तू हालचाल करताना दिसली की वर घिरटया घालणाऱ्या विमानांनी घेतलीच झडप. रात्री दिवा दिसला की अमेरिकन विमानांनी दारूगोळयांचा खटका दाबलाच म्हणून समजा.

एवढे करूनही हा मार्ग बंद झाला नाहीच. अमेरिकन हवाई दलाने तर या मार्गापुढे हात टेकले होते आणि मार्ग बंद करायचा असेल तर जमिनीवरच तो काटणे आवश्यक आहे असा आग्रह हवाई दलाने धरला होता. अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राच्या सामर्थ्यवान व अत्याधुनिक हवाई दलाने मानवाच्या निखळ जिद्दीपुढे पत्करलेली ही शरणागतीच म्हणायची. ● ● ●

# जेन फोंडा आणि व्हिएतनाम युद्ध

श्रीकृष्ण हवालदार

गेली कित्येक वर्षे चालू असलेले व्हिएतनाम युद्ध नुकतेच समाप्त झालेले आहे. परंतु त्यापूर्वी, जगाच्या या भागामध्ये उगाच लष्करी हस्तक्षेप करून युद्धाचा विस्तार वाढविणाऱ्या अमेरिकेवर स्वातंत्र्यप्रेमी जगाने चौफेर निषेधाचा मारा केला. इतकेच नव्हे तर अलिकडच्या काही वर्षांत खुद्द अमेरिकेतही व्हिएतनाम युद्धाला कडाडून विरोध होऊ लागला. अर्थाअर्थी आपला काही संबंध नसताना कोट्यावधी डॉलर्स आणि लाखो तरुण अमेरिकन सैनिक यांना खाईत लोटणाऱ्या प्रस्थापित राजवटीबद्दल असंतोष वाढीला लागला होता. युद्धविरोधी मोर्चे निघत होते. मेळावे भरत होते. वृत्तपत्रांतून, सभांतून, युद्धपिपासू सरकारचा तीव्र धिक्कार करण्यात येत होता. अंतर्गत विरोधाचा प्रभाव असो की, आणखी काही राजकीय हेतू असोत, प्रे. निक्सन यांनी व्हिएतनामच्या कम्युनिस्ट मुक्ती सैनिकांशी चालू ठेवलेले युद्ध थांबवून शांतता करारावर स्वाक्षऱ्या घडविण्याचा पवित्रा टाकला, हे बाकी खरे! अजूनही व्हिएतनामची युद्धबंदी टिकाऊ आहे की काय, याबद्दल साशंकताच आहे. ते असो! पण अमेरिकेतील व्हिएतनाम युद्धविरोधी चळवळीत हॉलिवुडच्या एका प्रसिद्ध तरुण सिनेमा नटीने हिरीरीने भाग घ्यावा आणि एकटीच्या हिंमतीवर खळबळ माजवून सोडावी, निक्सन सरकारच्या नाकी दम आणावा, ही गोष्ट या संदर्भात अतिशय लक्षणीय ठरावी.

सिनेमाचा धंदा सोडून राजकारणात पडण्याचा उपद्व्याप करणाऱ्या या नटीचे नाव आहे–जेन फोंडा. हॉलिवुडच्या



निक्सन शासनाच्या
नाकात दम आणणारी
जेन

जुन्या जमान्यातील प्रसिद्ध नट हेन्री फोंडा याची जेन ही मुलगी. खरे तर सुरुवातीला ती चित्रपटातून 'मदनिका' म्हणून लोकांच्यापुढे आली. पुढे शरीर प्रदर्शनाऐवजी तिची अभिनय प्रदर्शनात प्रगती झाली आणि गतवर्षी तिच्या 'क्लूट' (Klute) या चित्रपटातील भूमिकेबद्दल तिला ऑस्कर हे बहुमानाचे पारितोषिक मिळून ती श्रेष्ठ अभिनेत्री ठरली. केवळ चमचमणारी 'तारका' राहिली नाही.

तर अशा या चित्रपटीय अभिनेत्रीपद मिळविणाऱ्या जेन फोंडाने राजकीय चळवळीत काही लभ्यांश नसताना का भाग घ्यावा, याचा अनेकांना संभ्रम झाला. कारण जेन ही अमेरिकेतील कुठल्याही राजकीय पक्षाची सभासद, कार्यकर्ती किंवा पुढारीण नाही! निवडणूक लढवून तिला अमेरिकन कॉंग्रेस किंवा सिनेटमध्ये जायचे नाही. सांगण्यासारखी गोष्ट अशी की, जेन फोंडा ही आपल्या चळवळीच्या खर्चासाठी म्हणूनच जणू चित्रपटात काम करीत असते. तिच्या या 'एकली चलो रे' चळवळीत नाही म्हणायला, तिने एकच सहकारी घेतलेला आहे. डोनाल्ड सदर्लंड. त्याने तिच्याबरोबर 'क्लूट' मध्ये काम केलेले आहे. युद्धविरोधी आंदोलनाच्या निमित्ताने त्यांची 'जोडी' पडद्यामागेही जमलेली असल्यामुळे, या दोघांचे प्रेमसंबंध जडल्याच्या अफवा यूरोप अमेरिकेतल्या फिल्मी नियतकालिकात फक्कत असतात. कारण स्वीकृत कामाच्या निमित्ताने जेन व डोनाल्ड दोघे प्रसंगी एखाद्या ट्रेलर-घरात राहतात... रात्रीची देखील वस्ती करतात.

पण दोघेही विवाहित आहेत. मुला-

बाळांचे आहेत. अर्थात अशा प्रेम-प्रकरणांना वैवाहिक बंधन आड येते, असे नव्हे! यूरोप अमेरिकेत तर ही बंधने पुष्कळच सैल असतात आणि लग्न व घटस्फोट (सिनेमा कलाकारांच्या बाबतीत तर हटकून!) या चक्रात तिथले लोक सदैव फिरत असतात. तथापि जेनच्या वैयक्तिक जीवनाची आपल्याला फारशी उठाठेव करण्याचे कारण नाही. तिचे सार्वजनिक आयुष्यच आपल्या दृष्टीने लक्षवेधी आहे. कारण आपल्याकडचे सिने-कलाकार (एखाद्या मद्रासी रामचंद्रन्चा अपवाद सोडला तर) राजकारणात किंवा प्रत्यक्ष युद्धात भाग घेताना दिसत नाहीत. काही कलाकार लोकसभा, राज्यसभा, विधान-सभा, विधानपरिषदेत जाऊन बसतात खरे, पण ते सरकार नियुक्त म्हणून! पद्मश्री, पद्मविभूषण अशा सरकारी किताबतीलाही काही नटनटया पात्र ठरलेल्या आहेत. अमेरिकेत मात्र असे आढळते की, ज्या ज्या वेळी देशाने युद्ध पुकारले, तेव्हा तेव्हा नामवंत सिनेमा नट प्रत्यक्ष युद्ध आघाडीवर जाऊन लढले. बॉब होप सारखे विनोदी नट तर म्हातारपणी सुद्धा (बॉब होप आता साठीत आलेला आहे.) रणांगणावर जाऊन सैनिकांचे मनोरंजन करण्याचे कार्य निष्ठेने करतात.

सिने कलाकारांच्या या परंपरेला जेन फोंडाने मात्र धक्का दिलेला आहे. व्हिएतनामी युद्धात भाग घेतल्याबद्दल ती प्रस्थापित शासनावरच टीका करून राहिली आहे. तिने सरकारविरोधी आंदोलन उभारले. सैनिकांमध्ये जाऊन 'व्हिएतनाम युद्धावर जाऊ नका' असा प्रचार केला. एका अर्थाने तिचे कृत्य राष्ट्रद्रोहातच जमा होण्यासारखे झाले! सरकारने तिची मुस्कटदाबी करण्याचा खूप प्रयत्न केला. पण तिने आपले आंदोलन मोठ्या जिद्दीने चालवले. सैनिकांच्या तळावर जाऊन प्रचाराचे फड रंगवले. आणि अमेरिकाभर दौरा काढून कित्येक विद्यापीठात व्याख्याने दिली. ज्यांची लष्करात भरती करण्यात येते – सक्तीने – (Drafting) त्यांना 'लष्करात जाऊ नका, निक्सन राजवटीच्या युद्धखोरीला हातभार लावू नका' अशी चेतावणी दिली. अखेर पाचसहा महिन्यापूर्वी तिने खुद्द व्हिएतनामच्या रणभूमीवर जाण्यात यश मिळवले. तिथल्या व्हिएतनाम सैनिकांशी संपर्क साधला. निर्वासितांना ती भेटली, – अमेरिकन विमानांनी बॉंब-हल्ले करून उद्ध्वस्त केलेल्या प्रदेशाची पाहणी केली आणि आपल्या या भेटीवर आधारित – किंबहुना भेटीचाच एक अनुबोधपट (Documentary) तयार करून तो अमेरिकेत येऊन पत्रकारांना दाखवला. चित्रपट-कलाकारांच्या (जे सामान्यतः विलासात रंगलेले भोगवादी असतात.) ज्वलंत राष्ट्रप्रेमाचे जेन फोंडासारखे उदाहरण जागतिक फिल्मी इतिहासात अभावानेच दाखवता येईल.

अमेरिकन शासनाच्या व्हिएतनाम युद्धाला (हो! शासनाचेच युद्ध. बहु-संख्य अमेरिकन जनतेने सतत या युद्धा-विरोधीच आवाज उठवलेला आहे.)

एवढा कडवा विरोध करण्यात जेन फोंडाची खरी राष्ट्रभक्ती प्रगट झालेली आहे. राष्ट्राचे हित डोळ्यासमोर ठेवून जेन – ज्ञिने नटीचे विलासी जीवन टाकून चळवळीच्या खडकाळ मार्गावरून वाटचाल करण्याचा हट्ट करून राहिलेली होती. अर्थात, परक्या राष्ट्राशी युद्ध पुकारल्यानंतरसुद्धा अमेरिकन नागरिकांना प्रस्थापित सरकारच्या युद्धाविरोधी चळवळ चालवता येते..... हे अमेरिकेतील नागरिक-स्वातंत्र्याचे आदर्श उदाहरण म्हणून दाखवता येण्यासारखे आहे, याचा आवर्जून उल्लेख करायला हवा.

गेल्या काही महिन्यात, अमेरिकन विमानांनी उत्तर व्हिएतनामवर बाँबहल्ल्यांचे जे सत्र चालू केले होते, त्यात वाढ केली होती. या बाँब हल्ल्यांचा 'अमानुष' म्हणून जगभर व अमेरिकेतही धिक्कार चालू होता. निक्सन सरकारला या भयानक बाँब-फेकीचे समर्थन करणे जड होऊन बसले होते. जागतिक चर्च मंडळाच्या चिटणीसांनी (डॉ. युजिन ब्लेक) उत्तर व्हिएतनाममधील बंधाऱ्यावर चालू असलेले बाँबहल्ले ताबडतोब थांबवावेत असे निक्सनना जे आवाहन केले होते, त्याला राष्ट्रसंघ सरचिटणीस कुर्त वाइल्डहॅम यांनी पाठिंबा दिला होता. या बड्यांच्या आवाजात जेन फोंडाने आपला आवाज मिसळला आणि ती हनोईचा दोन आठवड्यांचा दौरा करून आली.

जेनने व्हिएतनाममध्ये गेल्यावर तेथील अमेरिकन युद्धकैद्यांच्या मुलाखती घेतल्या (या युद्धकैद्यांची आता युद्धसमाप्ती करारानुसार लवकरच सुटका होईल.) हनोईच्या आग्नेयेस चाळीस मैलावर असलेल्या 'नाम साच' गावी अमेरिकन बाँबहल्ल्यांनी बंधाऱ्यांना जी भगदाडे पाडली होती ती पाहिली. 'नाम दिन्ह' या प्रांतिक राजधानीच्या शहराची जी नासधूस झाली आहे, तिचे चित्रिकरण केले. अमेरिकेत गेल्यावर पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीत जेन फोंडा म्हणाली – 'माझा स्वत:वर विश्वास आहे. माझं मन जे सांगतं ते मी खरं मानते. अमेरिकेने बंधाऱ्यावर केलेले बाँबहल्ले हेतूपुरस्सरच करण्यात येत आहेत.'

जेन फोंडाने उत्तर व्हिएतनाममध्ये स्थूल मानाने जी पाहणी केली व तिथल्या लोकांनी तिला जी चित्रे दाखवली, त्याआधारे तिने पत्रकारांना सांगितले की—'केवळ बांधबंधाऱ्यावर बॉम्बहल्ले होत नाहीत...पाणीपुरवठ्यावर, पंपींग स्टेशनावर व धरणांवर देखील हल्ले होत आहेत. बंधाऱ्यांचे पायेच कमकुवत होत आहेत.'

प्रे. निक्सन यांनी आपल्या बॉम्ब हल्ल्यांचे समर्थन करण्याचा यानंतर प्रयत्न केला. मुलकी नागरिकांना उपद्रव पोहोचू नये म्हणून बंधाऱ्यावर बाँबिंग करण्याचा पवित्रा घेतला, अशी सारवासारव केली. तथापि जेन फोंडाने आपल्या अनुबोधपटात समाविष्ट केलेल्या दृष्यांचे फोटो खूपच बोलके आहेत. विशेषत : तिने घेतलेल्या अमेरिकन युद्ध कैद्यांच्या (व्हिएतकाँग कम्युनिस्ट

मुक्तीफौजेच्या ताब्यातले) मुलाखती एकंदर प्रकरणावर बराच प्रकाश टाकतील असे मानले जाते.

जेन फोंडा आता राजकारणात आणि समाजकारणात चांगलीच गुरफटली आहे. 'सिनेमा नटीपेक्षा एक बंडखोर बाई' म्हणूनच तिचा बोलबाला झालेला आहे. मदनिकेपासून मर्दिनीपर्यंत जेन फोंडाची झालेली उत्क्रांती अभ्यसनीय व उद्‌बोधक आहे.

लहानपणापासूनच जेन फोंडा इतर मुलींहून वेगळी होती. तिचा बाप हेन्‍री फोंडा नेहमी My Alleged Daughter (नावं ठेवून घेणारी पोरगी !) अशी तिची संभावना करीत असतो. बापाचे व तिचे फारसे पटलेले नाही. प्रख्यात फ्रेंच मदनमंजरी ब्रिजी बार्दो हिचा माजी नवरा रॉजर व्हॅदिम (हा दिग्दर्शक आहे.) याच्याशी जेनने लग्न केलेले आहे. तिचे तत्पूर्वी अनेक 'बॉयफ्रेन्डस्' होते. बापाला अर्थातच हे आवडत नसे. पुढे...टिमी एव्हरेस्ट नामक एका पुरुषाशी तिने लग्न ठरवले. तेही बापाला नापसंतच होते. पुढे जाता...खुद्द जेनेच हे ठरलेले लग्न मोडून टाकले ही गोष्ट अलाहिदा !

हॉलिवुडच्या सिनेमा नटयांचे अनेकांशी प्रेमसंबंध जडतात, त्यांच्याशी लग्ने होतात आणि घटस्फोटही होतात. जेन अर्थातच याला अपवाद नाही. आंद्रियाज व्हाउस्टिनास नामक एका दिग्दर्शकाशीही तिचे सूत जमले होते. तो जेनला खाजगीरित्या अभिनयाचे धडे देत होता. खेराज, ली स्ट्रासबर्ग या प्रख्यात नाट्याभिनय शिक्षकाच्या स्टुडिओत ती शिक्षण घेत होतीच. दिग्दर्शक आंद्रियाज हा तिला गुरुस्थानी होता. ही शिष्या गुरुच्या प्रेमात पडली. गुरुशिष्याचे प्रेमसंबंध जडल्याच्या गोष्टी तशा काही नव्या नाहीत ! पण, मुलींच्या सर्व बापांप्रमाणेच...जेनच्या बापालाही मुलीचे प्रेमप्रकरण आवडत नव्हते. पण जेन आपल्या प्रेमाचे समर्थन करीत होती. लोकांना सांगत होती—'डॅडींना आंद्रियाजविषयी काय वाटते, त्याची मला पर्वा नाही. नसेल त्यांना तो आवडत तर त्यांनी फार तर त्याच्याकडून अभिनयाचे शिक्षण घेऊ नये !'

परंतु आपल्या या गुरुप्रियकराला सोडून जेन फोंडाने अखेर रॉजर व्हॅदीमशीच लग्न केले. त्याच्यापासून तिला एक मूलही झाले. तथापि जेन फोंडाला सिनेनटीची 'करियर' करायची होती. नवरा दिग्दर्शकच असल्यामुळे तिला हे लग्नबंधन साहाय्यक ठरले. दिग्दर्शक रॉजर व्हॅदीम रूपेरी पडद्यावरच नग्नतेचा पुरस्कार करण्याबाबत लौकिक पावलेला आहे. आपली पहिली बायको ब्रिजी बार्दो हिला 'अॅण्ड गॉड क्रिएटेड वूमन' या चित्रात भूमिका देऊन त्याने 'देवाने स्त्रीला पहिल्यांदा जन्माला घातलेल्या अवस्थेत' लोकांना दाखवले ! प्रसिद्धी मिळवून दिली. ब्रिजी बार्दोचा फ्रेंच मदनमंजिरी म्हणून जगभर गाजावाजा झाला. पुढे त्यांचे बिनसले. घटस्फोटात परिणती ! जेनशी लग्न करण्यापूर्वी व्हॅदिमने आणखी दोन स्त्रीयांशी लग्ने करून मोडलेली आहेत.

आपल्या या चौथ्या बायकोलाही व्हॅदिमने 'बार्बारेला' या काल्पनिक विज्ञानकथा चित्रपटात नायिकेची भूमिका देऊन धाडसी 'नग्नदृष्ये' करायला लावली. त्याचा बराच गवगवा झाला होता. आता मात्र श्रेष्ठ अभिनेत्रीपद आणि विशिष्ट सामाजिक स्थान लक्षात घेता जेन फोंडा रुपेरी पडद्यावर नंगानाच घालणाऱ्या भूमिका पत्करील असे वाटत नाही.

नवऱ्याशी–रॉजर व्हॅदिमशी–जेनचे तसे मोठे पटते, असे नाही. पण तिने अजून तरी त्याच्याशी जमवून घेतलेले आहे खरे. जेन आपली चळवळ व सिनेमाची कामे यातच गुंतलेली असल्यामुळे मुलाला सांभाळण्याचा भार बहुतांश नवऱ्यावरच पडलेला असतो. तशात रॉजर व्हॅदिम बायकांच्या बाबतीत जरा 'हा'च आहे. साहजिकच कुरबुरी चालू असणार. शिवाय जेनच्या वृत्तीत जन्मजातच बंडखोरी आहे. मागे एकदा 'लग्नसंस्था आवश्यक नाही... पण प्रेमाच्या माणसाबरोबर प्रतिष्ठितपणाने संसार करण्याचा तूर्त तरी दुसरा चांगला मार्ग दिसत नाही; म्हणूनच मी लग्न केले! एरवी प्रेमाचा अन् लग्नाचा संबंध काय?'...असे मत तिने व्यक्त केले होते.

अशी ही जेन फोंडा मोठी मनस्वी स्त्री असून, स्वतःच्या मनाचा कौल ती मानते. 'बोले तैसा चाले' या वचनाला जागण्याची तिची वृत्ती आहे. ती एखाद्या ध्येयनिष्ठ कट्टर पुढाऱ्याच्या अभिनिवेषात बोलत असते. ती पूर्वी स्वतःला उदारमतवादी (लिबरल) म्हणवून घेत होती. मी उदारमत–लोकशाहीवादी (लिबरल डेमोक्रॅट) आहे, असे सांगत होती. त्यामुळेच स्त्री-विमोचनासारख्या अनेक चळवळीत ती पुढाकार घेताना दिसते. तथापि अमेरिकन सरकारने लष्करी हस्तक्षेप करून व्हिएतनाममध्ये युद्धाचा जो डोंब पेटवला त्याविरोधी जोरदार आवाज उठवण्यावर तिने अधिक लक्ष केंद्रित केले. 'अमेरिकन राजवटीला युद्धज्वराची बाधा झालेली आहे, त्यापासून तिची मुक्तता केल्यावाचून देशाचे बिघडलेले आरोग्य सुधारणार नाही...' असे तिला प्रामाणिकपणे वाटते.

यासाठीच ती सैनिकांत जाऊन युद्धविरोधी प्रचार करू लागली. आपले प्रचार-पथक घेऊन आघाडीवर जाण्याची परवानगी तिने मागितली. पण त्यासाठी तिला फार झगडावे लागले. सरकारच्या काळ्या यादीत तिचे नाव दाखल झाले. तिला तुरुंगात डांबण्याचा प्रयत्न झाला. मादक पदार्थ विनापरवाना आयात केल्याच्या आरोपावरून तिला अटक करण्यात आली. खटला भरण्यात आला. पण आपण आणलेल्या गोळ्या मादक नव्हत्या...व्हिटॅमिनच्या होत्या असा पुरावा सादर करून ती सुटली. एरवी, दहा-पंधरा दिवस तुरुंगाची हवा तिला खावी लागली असती.

युद्धविरोधाखेरीज जेन फोंडाने दलितांच्या प्रश्नालाही हात घातला आहे. अमेरिकेतील रेडइंडियनांच्या हक्कलढ्याला ती मदत करीत आहे.

रेड इंडियनांनी, आपले मच्छीमारीचे हक्क हिरावून घेतले म्हणून आंदोलन उभारले आहे त्यांची समस्या समजावून घेण्यासाठी जेन वॉशिंग्टनला गेली. रेड इंडियन नेत्यांशी तिने बोलणी केली. पण आपल्या मुख्य कार्याकडे तिचे लक्ष होतेच. वॉशिंग्टनच्या शेजारी असलेल्या 'फोर्ट लुई' या किल्ल्यात व्हिएतनाम आघाडीकडे पाठवण्यासाठी जे सैनिक ठेवले होते, त्यांना तिने त्या दिवशी रात्री कॉफी हाऊसमध्ये येण्याचे आमंत्रण दिले. सैनिक आले. कॉफी घेता घेता ती त्यांच्याशी बोलत होती. पण पंधरा-वीस मिनिटातच पोलीस आले. त्यांनी जेनला अटक केली. आपल्या वकिलाशी संपर्क साधण्याची-तिला मुभा देण्यात आली नाही. तेव्हा ती हट्टाला पेटली आणि–'वकिलाला बोलावण्याची परवानगी दिल्याशिवाय मी येथून हलणार नाही...' असे सांगून ती चक्क त्या कॉफी हाऊसमध्येच मार्शलसमोर जमिनीवर झोपून राहिली.

रेड इंडियन नेत्यांशी बोलणी झाल्यावर जेन फोंडा, मुस्कटदाबी झालेल्या जनतेची प्रवक्तीच बनली. तिने रेड इंडियनांच्या निर्बंधित (रिझर्वेशन्स) वस्त्यांना भेटी दिल्या. ती अनेक लष्करी तळावर गेली. सैनिकांशी बोलली. राजकीयदृष्टया अनभवसंपन्न झाली. तिच्या शब्दात–' लिबरल म्हणून दौऱ्यावर निघाले आणि रॅडिकल म्हणून दौऱ्याची सांगता केली. याचा अर्थ असा की, भूकमारीचे अनेक प्रकार असून हा झगडा माझाही आहे, याची मला जाण आली.'

आपल्या अनुभवाचे सार सांगणारे जेन फोंडाचे खालील उद्गार, अमेरिकेचे अंतरंग कळण्याच्या दृष्टीने खरोखरीच उद्धृत करण्यासारखे आहेत–

'अमेरिकेसारख्या श्रीमंत, धनवान, मोठा प्रादेशिक विस्तार असलेल्या राष्ट्रातदेखील अजून उपाशी मरणारे लोक आहेत...त्यांच्यात मोठ्या प्रमाणावर निरक्षरता आहे... त्यांना जरूर ती वैद्यकीय मदत उपलब्ध होऊ शकत नाही...खोटेनाटे आरोप लादून त्यांना गोळ्या घालून मारले जाते... कित्येकांना राजकीय कारणावरून तुरुंगात डांबले जाते व उच्चवर्णीय गोऱ्यांचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो...'

एक सिनेनटी म्हणून जेन फोंडावर 'मदनिका' म्हणून जो छाप मारण्यात आलेला आहे त्याबद्दलचे तिचे विचार ऐकण्यासारखे आहेत. ती म्हणते– 'या गोऱ्यांच्या कळपातच मला ढकलण्यात आलेले आहे....मानवी प्राणी म्हणून नव्हे तर कामदेवता (सेक्स गॉडेस) किंवा मदनमूर्ती (सेक्स ऑब्जेक्ट) म्हणूनच मला ओळखले जात होते. जी परिस्थिती निर्माण करण्यात आलेली होती, ती मला जगण्याचे समाधान मिळू देत नव्हती. ज्या गोष्टी मला महत्त्वाच्या वाटतात त्या माझ्या कामाद्वारे व्यक्तच करता येत नव्हत्या. माझं सारं आयुष्यच आता पार बदलून गेलेलं आहे. पूर्वी मला पैसा, प्रॉपर्टी या गोष्टी महत्त्वाच्या

वाटायच्या. त्या तशा आता वाटत नाहीत. बोलायचे एक आणि करायचे दुसरेच, हे मला आता जमणार नाही.'

जेन फोंडाने सिनेमातले काम सोडलेले नाही. परंतु आता ती आपल्या भूमिका चोखंदळपणाने निवडते. सामाजिक, राजकीय क्षेत्रातले काम हा तिचा प्रसिद्धीचा 'स्टंट' नाही. मनोदेवता सांगते म्हणूनच ती हे कार्य करते. 'आतल्या आवाजा'चा आदेश ती पाळते. त्यात मानवतेबद्दलचे प्रेम व जगाच्या कल्याणाची तळमळ आहे. ती म्हणते– 'मला पटलेल्या गोष्टीची तड लावण्यासाठी मी संबंधीत चळवळीत स्वतःला तनमनधनाने झोकून देईन.'

आपल्या देशातील प्रस्थापित सरकारच्या अंतर्गत व परराष्ट्रीय चुकीच्या धोरणाविरोधी लढा उभारणारी पहिलीच क्रांतिकारक सिनेमानटी म्हणून जागतिक फिल्मी इतिहासात जेन फोंडाच्या नावाची नोंद होईल, यात काही शंका नाही!

• • •


# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखक : अरुण साधू

किंमत . चवदा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

# बारा जाहीर सवालांना उत्तर : पृष्ठ १ वरून

तात तेव्हा पत्रकाराची लेखणी ही सार्वजनिक असते हे त्यांच्या कानावर असेल असे धरून चालतो. व्यावसायिक पत्रकार म्हणून लेखणी चालवताना राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व या देशाचा इतिहास यांच्याशी थोडीफार तोंड ओळख असणे जरूर असते, ही पत्रकाराची व्यावसायिक जबाबदारी आहे हेही त्यांना ठाऊक असेल. खेदाची गोष्ट अशी की या आवश्यकतेची पुरेशी जाणीव ते आपल्या लेखनात बाळगीत नाहीत. त्यांचे ताजे 'बारा जाहीर सवाल' या बेजबाबदारीचे पुरेसे द्योतक आहेत.

या बारा जाहीर सवालात आहे तरी काय ? थोडीफार आत्मश्लाघा, पोलीस, न्यायखाते, सरकार यांची विसंगत निंदास्तुती व ज्या गोष्टींवर बर्वे यांची श्रद्धा नाही त्या गोष्टींच्या नावाने सरकारला घातलेल्या चलाख अशा कोंड्या. या सर्वांची उदाहरणे येथे देणे अर्थातच शक्य नाही. एकदा न्यायखात्याची बाजू घेऊन सरकारला दोष द्यावयाचा, नंतर न्यायखात्याच्या नावाने खडे फोडावयाचे, एकदा महात्मा गांधींचा वारसा काढावयाचा तर एकदा सर्व सरकारी यंत्रणेचा एक घटक असलेल्या एखाद्या न्यायाधीशाला रामशास्त्री म्हणावयाचे, गांधींनी जे कलम रद्द करण्याची खटपट केली ते कलम सरकार वापरते म्हणून नैतिक राग व्यक्त करावयाचा.

बर्वे महाशय या साऱ्या कोलांटयाच्या सहाय्याने कोणास बनवू पहात आहेत ? महात्मा गांधींचे तत्त्वज्ञान व नाव ते सोयीसाठी का वापरीत आहेत ? 'लोकशाही मूल्यांचे व परंपरांचे जतन झाले पाहिजे की नाही ?' असा प्रश्न विचारून बर्वे यांनी स्वतःचे फारच हसे करून घेतले आहे. जर या देशात लोकशाही नाहीच असे बर्वे यांचे म्हणणे तर ही मूल्ये व परंपरा आल्या कोठून ? त्यांचे जतन तरी कसले करावयाचे ?

खरी गोष्ट अशी दिसते की बर्वे यांचा लोकशाही, समाजवाद, साम्यवाद वगैरे राजकीय तत्त्वज्ञानाशी काडीचीही परिचय नाही. त्याचेही एकवेळ काही वाटले नसते. पण या बारा जाहीर सवालांमागे जे एक मध्यमवर्गीय, कच्रखाऊ पण टेंभा मिरवणारे मन दिसते त्याचा तिटकारा येतो. 'या लचांडातून सहीसलामत सुटलो बुवा एकदाचे' हा एक खोल आनंद त्यांच्या सर्वच निवेदनात दिसतो. त्याचबरोबर या सर्व प्रकरणाचा गैर फायदा घेऊन 'राजकीय हुतात्मा' बनण्याचाही बर्वे यांना कमालीचा लोभ सुटला आहे.

याच लोभाखातर त्यांनी या देशातील लोकशाहीची उठाठेव चालू केली आहे.

पोलीस खाते, न्यायखाते व सरकार यांच्या अकार्यक्षमतेमुळे नष्ट होण्याएवढी लोकशाही विचारधारा कमकुवत

नाही. त्याचप्रमाणे या एका निकषावरच लोकशाहीचे मोजमाप करणे अत्यंत बालीशपणाचे आहे. अशा कित्येक अकार्यक्षम, भ्रष्ट राजवटी पचवण्याचे सामर्थ्य भारतीय लोकशाहीत आहे, त्याचबरोबर त्यांना हुसकावण्याचे सामर्थ्यही भारतीय लोकशाहीत आहे याची खात्री बर्वे यांनी बाळगावी.

लोकशाही विचारधारेला जागतिक परंपरा आहे! असा काही प्रकार नाही, की गेल्या २५ वर्षातच लोकशाहीचा शोध लागला आहे. ती एक गतिमान जीवनपद्धती आहे. राजकीय समता, बहुसंख्यांचे राज्य, कायद्यांचा अंमल या आपल्या पूर्वसंचिताच्या जोडीला आज लोकशाही विचारधारा आर्थिक क्षेत्रातील परिवर्तनाचीही गरज ओळखीत आहे व त्यानुसार कायापालट करीत आहे. या तिच्या कायापालटालाच 'समाजवाद' असे नाव आहे. प्रथम लोकशाहीने मानवामानवातील संबंध कसे असावेत हे स्पष्ट केले, त्यांच्या प्रस्थापनेसाठी राजकीय क्षेत्रात एक पद्धती निर्माण केली व आता या पद्धतीच्या द्वारे 'आर्थिक लोकशाही' आणण्याचा प्रयत्न आहे.

ही सारी ऐतिहासिक परंपरा भारतीय लोकशाहीत बर्वे यांना दिसून येत नाही काय? या अवाढव्य, निरक्षर देशात प्रौढ मतदानाद्वारे पाच निवडणुका झाल्याचे त्यांच्या कानावर नाही काय? याच भारतीय लोकशाहीने सत्ताधाऱ्यांना १९६७ मध्ये मतपेटीच्या सहाय्याने धडा शिकवला नाही काय? त्यांना अधिक लोकाभिमुख केले नाही काय? या पंचवीस वर्षांच्या काळात भारताच्या आसपासच्या देशात किती व कशी सत्तांतरे झाली याची बर्वे यांना काही कल्पना आहे काय?

एक राजकीय जीवनपद्धती म्हणून भारतीय लोकशाहीत राजकीय क्षेत्रात उणीवा जरूर असतील. पण लोकशाही विचारधारेचा प्रधान संदेश येथील जनतेने अचूक ओळखला आहे व अंगी बाणवला आहे हे कोणाला नाकारता येणार नाही. सहिष्णुता, बहुमताचा मान व अल्पमताचे वाजवी संरक्षण हाच तो संदेश. येथे हिंसाचाराने कोणी कोणाचे मतपरिवर्तन करण्याचा व्यापक व सातत्याने प्रयत्न करीत नाही हाच येथे लोकशाही असल्याचा पुरावा!

व्यक्तिगत कडवट अनुभवांमुळे बर्वे यांना एवढाही विवेक राहिला नाही काय की 'लोकशाही ही केवळ सरकार राबवीत नसते तर जनता राबवीत असते. सरकार हे लोकशाहीचे अपत्य आहे. पालक नव्हे (सरकारची मातोश्री लोक आहेत हे येथे लोकहितवादींनी सुमारे १५० वर्षांपूर्वी म्हटले आहे. आपला लोकशाही विचारांचा वारसा असा पूर्णपणे स्वदेशी आहे) भारतीय जनता आपल्या अंगभूत शहाणपणाने येथे लोकशाही मनोभावे राबवीत आहे. 'या देशात लोकशाही आहे काय?' असा प्रश्न करून बर्वे सरकारचा अपमान करीत नाहीत तर या जनतेची अवहेलना करीत आहेत. सरकारे येतील आणि जातील, ती चांगला कारभार

करतील वा चुकतील. भारतीय लोकशाही या साऱ्याच्या वर आहे.

तथाकथित क्रांतिकारी, साम्यवादी वगैरे मंडळींस भारतीय जनतेच्या लोकशाही स्वरूपाची ओळख कधी पटलीच नाही. जनतेपासून दूर जाण्यात व खूप गुप्तपणे खलबते करण्यात सर्व क्रांतिकारत्व सामावले आहे असा त्यांचा भ्रम आहे. दिवसा ढवळ्या दिवाभीताप्रमाणे आयुष्य काढणारे, नव्या विचारांच्या प्रकाशाला घाबरणारे व जनतेच्या गतिमानतेपासून दूर पळणारे हे पढिक क्रांतीवादी म्हणजे जागतिक क्रांतीच्या इतिहासातील सर्वात केविलवाणा विनोद आहे. 'सत्ता बंदुकीच्या नळीतून जन्म पावते' असले मूर्ख सिद्धांत स्वीकारणारे हे लोक पाहून हसावे की रडावे हेच समजत नाही. आधुनिक जगाच्या इतिहासात सत्ता बंदुकीच्या नळीतून जन्म पावल्याचे एकही उदाहरण नाही. सत्ता जनतेच्या पाठिंब्यातून जन्म पावते व मग तिच्या हाती बंदूक येते. आणि त्या बंदुकीच्या जोरावरच केवळ विसंबून राहून कोणी सत्ता टिकवू पाहील तर त्याला जनता दूर फेकून देते. ज्याच्या हाती केवळ बंदुकीची नळीच असते त्याच्या हाती केवळ तेवढीच राहते — सत्ता दुसरीकडे निघून जाते.

'सोबत'मधील मुलाखतीत बर्वे यांनी 'सत्ता बंदुकीच्या नळीतून जन्म पावते' या सिद्धान्तावर आपला विश्वास असल्याचे मोठ्या आढ्यतेने सांगितले आहे व त्याला भीष्माचा हवाला दिला आहे. भीष्मानंतर, राजकीय विचारांत व परिस्थितीत काही बदल झाले आहेत हे त्यांच्या गावीही नसावे. आणि असा पुनरुज्जीवनवादी माणूस म्हणे क्रांतीकारक ! बंदुकीच्या नळीतून सत्ता जन्म पावते यावर विश्वास ठेवणाऱ्या बर्वे यांना लोकशाहीची उठाठेव कशाला हवी ?

केवळ शस्त्रावर समाज धारणा अवलंबून राहू नये यासाठी तर लोकशाही विचारधारेने पूर्वीच्या सर्व राजवटींशी यशस्वी मुकाबला केला व शस्त्राला लोकशक्तीचे दास बनविले. मानवी जीवनात लोकशाहीने परिवर्तन केले ते हे ! 'बळी तो कान पिळी' हा मोठा क्रांतिकारक विचार नसून आदिमानवी विचार आहे व आदिमानव व विसाव्या शतकातील मानव यात फार फरक आहे. हा फरक घडवून आणला लोकशाहीने ! हे विसरून लोकशाहीचा व भारतीय जनतेचा अवमान करण्याचा कोणाही आदिमानवी विचारसरणीच्या माणसास हक्क नाही.

वरील विचार फार कटू वाटण्याचा संभव आहे पण नाईलाज म्हणून हे करावे लागले. या देशात कोण हुतात्मा होईल याचा नेमच नाही. गर्दीत पाठीवर गोळी लागलेलाही हुतात्मा आणि सरहद्दीवर लढताना कामी आलेलाही हुतात्माच ! बर्वे हे गर्दीत पाठीवर गोळी लागलेले हुतात्मा आहेत. शिवाय खऱ्या खुऱ्या हुतात्म्यापेक्षा जिवंत हुतात्मा फार त्रासदायक ठरत असतो. बर्वे यांच्याबाबत हे घडण्याचा धोका

असल्याने जरा जास्त परखड लिहावे लागले.

बर्वे यांच्याविषयी व्यक्तिश: आकस नाही हे स्पष्ट करावयास नकोच. बर्वे तरुण आहेत, धडपडे आहेत. त्यांना थोडीफार सामाजिक जाणीव आहे. पत्रकाराचा पेशा त्यांनी जाणीवपूर्वक पत्करला आहे. तेव्हा त्यांना एक सहानुभूतीचा सल्ला असा द्यावासा वाटतो, की, त्यांनी आपले ज्ञान वाढवावे, जास्त चिंतन करावे, या देशाच्या जनतेत खुल्या दिलाने मिसळावे, जनतेच्या स्पंदनांचा कानोसा घ्यावा आणि मगच पत्रकाराची लेखणी उचलावी.

लोकशाही राजवटीत क्रांतीचे प्रमुख साधन पत्रकारिता हेच आहे. या क्रांतीच्या पवित्र हत्याराची बर्वे यांनी पोरकटपणे विटंबना करू नये हीच अपेक्षा !

या देशात न्यायालयीन आदेश मोठे की सत्ताधारी मंत्रिमंडळाची सूडबुद्धी मोठी ? असे बर्वे विचारतात. सत्ता बंदुकीच्या नळीतून जन्म पावते हे खरे मानणाऱ्या बर्व्यांना खरे म्हणजे हा प्रश्न तितकासा महत्त्वाचा वाटू नये. तरीसुद्धा त्यांना उत्तर देतो. 'सूडबुद्धी' हा शब्द वगळून टाकला तर बर्व्यांचा प्रश्न असा होतो की न्यायालय मोठे की सरकार मोठे ? या प्रश्नाचे उत्तर असे आहे की लोकशाही राजवटीत सरकार व संसद यांचा अधिकार न्यायालयापेक्षा मोठा आहे. न्यायालये केवळ व्यक्तिगत प्रकरणे हाताळतात व केलेल्या कायद्यांचा अर्थ लावतात. सरकार सर्वच देशावर प्रभाव टाकणारी धोरणे ठरवते व कायदे करते. राजकीय सत्तेचा व्यवच्छेदक विशेष जे सार्वभौमत्व ते फक्त सरकारच उपभोगू शकते कारण ते जनतेचे कायदेशीर व एकमेव प्रतिनिधी असते. न्यायसंस्था ही सरकारची एक सहाय्यभूत यंत्रणा आहे.

न्यायसंस्थेचे महत्त्व अवाच्या सवा वाढविण्याचा व तिच्या वतीने लोकशाही बद्दल गळा काढण्याचा उद्योग प्रतिगामी हितसंबंधी लोकांनी केला तर ते समजू शकेल. पण बर्वे असे का करीत आहेत ? लोकशाही न्यायालयांमुळे जिवंत राहते असे म्हणणे म्हणजे कार्यकारण उलटेसुलटे करण्यासारखे आहे. लोकशाहीमुळे

---

माणूस

रंगतरंग स्पर्धेला
वाचकांकडून खूपच
प्रतिसाद मिळाला.
स्पर्धापत्रकांच्या तपासणीचे
किचकट काम योजलेल्या
कालावधीत पूर्ण होऊ शकलेले
नाही.
काम साधारणत: एप्रिल अखेर
पूर्ण व्हावे असे वाटते.
क्षमस्व.

—संपादक

---

न्यायसंस्था या जिवंत राहतात.

या प्रश्नावर जे हळवी भूमिका घेतात त्यांनी विसरू नये की, एक शतक-भर याच न्यायसंस्थेने अनेक देशभक्त व क्रांतीकारक यांना अत्यंत 'निःपक्ष-पाती 'पणेच जन्मठेप व फाशी या शिक्षा सुनावल्या होत्या. राजकीय सत्तेच्या स्वरूपाशी न्यायसंस्थेचे बरे वाईट सामर्थ्य निगडीत असते असे म्हणणे अधिक वास्तववादी ठरेल. आज तर असे दिसते की सामाजिक न्याय, जन-तेच्या आशा-आकांक्षा हे काही ध्यानात न घेता न्यायसंस्था शब्द व कायदा यांचा कीस काढून सरकारच्या प्रगति-शील धोरणांना खीळ घालीत आहे. त्यांचे ते कामच आहे – पण तेवढेच त्यांचे काम आहे – लोकशाहीचे रक्षक वगैरे बिरुदाची हाव त्यांना धरता येणार नाही. समाजाच्या कल्पना व संकेत अधिक घासूनपुसून पुन्हा बदला-साठी समाजासमोर ठेवणे हे न्याय-संस्थेचे खरे काम, राजकीय क्षेत्रापुरते ठरते, यापेक्षा जास्त भिस्त त्या संस्थेवर ठेवणे म्हणजे पुन्हा शब्द प्रामाण्याच्या मानसिक गुलामगिरीच्या युगात जाणे होय. शस्त्रप्रामाण्य आणि शब्दप्रामाण्य सारखेच त्याज्य आहे.

बर्व्यांना न्यायालयाने निर्दोष सोडले म्हणून ते, न्यायालय मोठे असे म्हणत असतील कदाचित ! नाहीतर 'बंदुकीची नळी' श्रेष्ठ मानणाऱ्या बर्व्यांना न्याया-लयाचा एवढा पुळका कोठून आला ! त्यांच्या दृष्टीने 'पोलीस' हीच सर्वोच्च सत्ता ठरते कारण पोलीसांजवळ बंदु-कीची नळी असते. पोलिसांच्या मते बर्वे दोषी होते तेव्हा बंदुकीच्या नळीचा हा कौल बर्वे यांनी स्वीकारणे अधिक निष्ठेचे ठरले असते.

ज्या मूल्यावर आपली श्रद्धा नाही त्या मूल्यांचा अडचणीचे वेळी उपयोग करून घेण्याचा मोह कोणालही होतो. कारण 'बचाव प्रेरणा' ही तशीच सर्वं-कष असते व ती सर्व विसंगत मार्गांचाही उपयोग करीत असते. हे करताना 'बचाव प्रेरणा' काही 'अंतर्गत सुसं-गति' साधण्याचा (कॉग्निटिव्ह डिसो-नन्स) अतार्किक प्रयत्न करते. त्या दृष्टीने एक व्यक्ती म्हणून बर्वे यांच्या सर्व प्रतिक्रिया नैसर्गिक आहेत. विसंगत मुद्यांच्या आधारे सरकारला दोष देणे एवढीच सुसंगती त्यांच्या भूमिकेत दिसते व या नैसर्गिक बचाव प्रेरणेला ते सार्व-जनिक स्वरूप देण्याचा वृथा प्रयत्न करीत आहेत.

या साऱ्या हातचलाखीने काही हताश कोवळी मने झपाटली जाण्याची शक्यता वाटली म्हणून बर्वे यांच्या तथाकथित जाहीर सवालांना हे खुलासेवार उत्तर देणे आवश्यक वाटले. महान पत्रकार व क्रांतिकारक बर्वे ! कोर्टात जे मिळते त्याला न्याय म्हणत असले तरी त्याला अजून क्रांती म्हणत नाहीत !

—चंद्रशेखर मराठे

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH-649

महाराष्ट्र राज्य नाट्यमहोत्सव

मुंबई येथील
अंतिम फेरीतील
बारा
नाटकांचे
सविस्तर
परीक्षण
पुष्पा भावे
पुढील अंकी